CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/18

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G1
69/18

Provincial Museum,
LUCKNOW.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद

G-1
69/18

१८

छत्रपति शाहू आणि पेशवे.

खाजगी पत्रव्यवहार.

[किंमत—१ रुपया ४ आणे किंवा २ शिलिंग ३ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

R54.03

PRIVATE LIFE OF SHAHU AND THE PESHWAS

One important function of the historian is to depict the exact character of important persons, a task which it is difficult to perform adequately owing to lack of sufficient personal details. The Peshwa's Daftar supplies this want in a great measure as it provides numerous valuable papers containing remarks and reflections about various historical personalities. This section brings together a large number of short but useful papers bearing firstly on the relations of Bajirao with Shahu and secondly on the private life of the Peshwa Balaji Bajirao. For convenience of study the latter is divided into the following sub-heads :—

1. Birth, thread and marriage ceremonies.
2. Games, amusements and life in general.
3. Hunting and care of domesticated animals.
4. Books and study.
5. Correspondence of friends and relations depicting domestic life.
6. Religious and astrological matters.
7. Pilgrimages.
8. Illness and death.
9. Private jewellery and precious objects.
10. Buildings at the Parvati hill and elsewhere.
11. Obsequies of Raja Shahu.

Thus divided, the papers will, it is hoped, be found interesting and instructive and will yield a wealth of detail much appreciated by historians although there is no one political thread running through them.

The last point referring to the obsequies of Raja Shahu contains papers mostly in Peshwa Balajirao's own hand, describing the funeral ceremonies of Raja Shahu which were performed at Satara after his death on December 14th, 1749. Many similar bits exist in the Daftar of which only a few have been selected here in order to convey an idea how minutely the Peshwa personally attended to these ceremonies. The notes appear to have been written by the Peshwa from the Satara fort to his agents in the city of Shahu Nagar. The ceremonies were carried out under the orders of Tarabai by the Peshwa.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 56



Facsimile of the handwriting of Jiwaji Ganesh Khasgiwale. (D. 1766)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of a letter from Samsher Bahadar. (1734–61)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [*4-1-1735*

पा छ ८ रमजान

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शकें ६१ आनंद संवत्सरे पौष्य बहुल सप्तमी मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्हांकारणें संक्रमणप्रयुक्त तिलगूल पाठविला असे. घेणें. जाणिजे. बहुत लिहिणें तरी सूज्ञ असा.

मर्यादेयं
राजते.

बार बार बार बार बार.

¶*King Shahu sends Sankranta greetings to the Peshwa Bajirao Ballal.*

No. 2]

पा छ २९ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. सौ राजसबाई प्रसूत जाली. कन्यारत्न जालें. छ २३ मोहरमी इंदुवारी बारसे जालें. अवघ्या सरकारकुनाच्या वाइकानी जाऊन सिष्टाचार विध संपादिले. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa about Rajasbai giving birth to a daughter.*

No. 3] [*7-12-1727*

श्री

राजमान्य राजश्री गोविंद कृष्ण मुतालीक देसमुख
गोसावी यांसी

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार. सुहुर सन समान असरीन मयां व अलफ. चिरंजीव राजश्री नानाचे मुंजीचे लग्न माघ शुध येकादसीस नेमस्त केले आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
तरी तुम्ही व राजश्री विस्वनाथभट मेहंदले ऐसे खान आजम याजकडे जाऊन त्यांस शृत करणे आणि त्याची आज्ञा घेऊन आगरपैकी सामान

पाने विडेयाची सुमार	नारल उतम पिकले
२०००००	२००

पाने वेलीची दोन लाख व नारल दोनसें वगैरा ऐसे तयार करून गलबतावरी घालून माहाडास रवाना करणें आणि हुजूर लेहून पाठवणें. येथून बैल पाठऊन सदरहू सामान आणविलें जाईल. याखेरीज कापड जिनस इकडे मिलत नाही याकरितां तेथें खरिदी करून पाठवणें बिा

पातलें सुसी ४० ताा	गजन्या सुमार २५ पंचवीस
२० प्राा दर ४॥ प्राा	दर रुपये सा आगर सात.
२० प्राा दर ५ प्राा	

येणेप्राा सनगें घेऊन त्वरेने पाठवणें. सदरहू कापडाची किमती रुपये होतील ते देसमुखीचे ऐवजी देऊन सनगे सामानाबाा माहाडास रवाना करणे. तेथून आणविलीं जातील. अवकाश मुहूर्तास थोडका उरला याकरितां दिवसगतीवरी घालितां येत नाही. तरी त्वरा करून तुम्हीच सामान घेऊन हुजूर येणें. जाणिजे छ ४ जमादिलौवल

लेखन
सीमा.

¶Chimaji Appa asks his Mutalik at Shrivardhan to send some articles for the thread ceremony of Nana (Balaji Bajirao).

No. 4] *[12-2-1736*

श्री

राजमान्य राजश्री चिमणाजी बलाल यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंतीपत्र पाठविले तें प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान विदित जाहाले. आपले चिरंजिवाचा वृतबंध फालगुन शुध द्वादसीचा निश्चय केला आहे म्हणोन लिहिले व येविसीची विनंती राजश्री माहादाजी आबाजी याणीहि केली. तरी तुम्ही कार्यसिधी करणे. वरकड आज्ञा कर्तव्य ते मशारनिलेस केली आहे. ते तुम्हास सांगतील, त्यावरून कलेल. जाणिजे. सूदन असा.

¶King Shahu sends his greetings on the occasion of the thread ceremony of Chimaji's son, Sadashivrao.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 5]

श्रीमंगलमूर्ति

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक त्रिंबकराव माणकेस्वर धायेगुडे कृतानेक सा नमस्कार विनती. येथील वर्तमान वैशाख वदी त्रयोदसीपरयेत स्वामीचे दयेकरून येथास्तीत असे. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले ते पावोन संतोष पावलो. लिहिले वर्तमान विदित जाहले. तेथे सेवकास दूषण लाऊन लिहिले की बहुत दिवस तुम्हाकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी स्वामीची पत्रे काही सातारियास येत नाही अगर येथूनहि कोणी माणसे जात नाहीत, त्यामुले सेवकापासून सेवेसी आंतर पडले. येरवी सेवक पत्र न लेहिल यैसे आहे की काये? दरबारीचे नवल विसेश वर्तमान तरी राजश्री दादा लिहितच आहेत, अम्ही काये ल्याहावे? त्याहिमध्ये न ल्याहावेस काय? याप्राा वैशाखमासी माहाराजाचे घरी लग्ने दोनी जाहली. सिरकियाचे घरी येक मुली दिली तिचे पहिले लग्न जाहाले. श्रीमत राजश्री संभाजी माहाराजहि लग्नास आणिले आहेत त्याची रवानगीहि होईल. दरबारीचे वर्तमान तरी राजश्री खुशाल आहेत. श्रीपतरायानी माहुलीसंगमी देवाल्य बाधले तेथे लिंगस्थापना केली. कोटीहोमहि केला. त्याचे चिरजीव गगाधरपतहि विशालगडाहून आले. अबृतराऊ त्यानी काही अठपडीप्रांते धामधूम करून उपद्रव केला त्यामुले राजश्री राऊप्रतिनिधि त्यास आणावयास जात होते. मग माहाराजानी जाऊन राहविले आणि आपले हुजरे आबृतरावास आणावयास पाठऊन तेहि आणिले. राजश्री येसवतराऊ प्रभू[१] यावरी काही विशयेसंगाचा दोशारोपण येऊन त्यास दरबार मना जाहाल आहे. तूर्त त्याकडे राग आहे. कोणे वेलेस कृपावत होतील तेव्हा न कले. तूर्त त्याकडे क्रोध आहे. बहुत काये लिहू? कृपालोभ असो दिल्हा पाहिजे. मी सेवक असे ही विनंती.

¶*Trimbakrao Dhaygude to the Peshwa, giving news from Satara about the marriages of the two daughters of the King, the arrival of Sambhaji of Kolhapur for the ceremony, the performance of a sacrifice at the new temple which the Pratinidhi had erected at Mahuli, and the King's disfavour which Yeshvantrao brought on him by his vicious conduct.*

---

१ पोतनीस?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 6]

छ १ साबान

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी

प्रति सौभाग्यादिसंपन्न उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करणे विषेस. सातारा माहालातील मुदबखचे घर तुम्हाकडून बांधिवले होत. प्रस्तुत सोप्याचे खांब जागाजागा ढलले व काही किडीने ज़ाया जालें. मोहाव्या कोठ जाया जाहाल्या व काही पडिल्या. यास्तव नीट करावे लागते. तरी तुम्ही राजश्री माहादाजी अंबाजी व राजश्री दादोपंता सांगोन मुदबखचे घर सोपा नीट करवणे. दिवसगतीवर न घालणे. अविलंबे तयार करविले पाहिजे. जाणिजे छ १९ रजब. बहुत काये लिहिणें ?

¶*Bajirao is asked by Virubai (?) to arrange for the repairs of the kitchen at Satara.*

No. 7]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. सौभाग्यादि-संपन्न मातुश्री बाईसाहेब यांस शरीरीं सावकास नव्हतें, त्याचें वर्तमान पूर्वी लिहिलेंच आहे. थैशास मानेचे रग्त काढिलें होते तेथें गुल्म जालें तें फुटलें. त्यास प्रस्तुत उतार पडिला. सूजहि थोडीबहुत उतरली. त्यामुलें शरीरास कांही सावकाश आहे. राजश्री स्वामीहि समाधानरूप आहेत. स्वामीस कलावें म्हणून लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare informs Chimaji Appa of the illness of Shahu's queen.*

No. 8] [*29-11-1730*

श्रीज्ञानेस्वर

श्रियासहश्रायु चिरजीव विजईभव राजश्री बाजीराऊ यास प्रती मातुश्री राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता मार्गेसीर्ष सुध प्रतिपदा रविवार जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे. विशेष. तुमची आज्ञा घेऊन स्वार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जालो ते सुखरूप पुणियास पावलो विशेष. मौजे काळूस ता। चाकण येथे आलो. श्री आलदीस उमाबाई व नारबा सेणवई व रा। आबाजीपंत यैसे यात्रेस आले. रा। आबाजीपंती आम्हास लेहून पा। की तुम्ही अलंदीस येणे. त्याजवरून अलंदीस गेलो. उमाबाईची भेटी जाली नाही. रा। नारबा व आबाजीपंत भेटले. वरकडे वर्तमान बोली काये जाली ते कलली नाही. रा। आबाजीपंत याणी आम्हास सांगितले की, उबरजे जाणे. मग त्यासी पुणियात राहातो यैसे उतर दिल्हे. तुम्हास कलावे म्हणून लिहिले असे. तुम्ही अपणाकडील वर्तमान हरघडी लिहीत जाणे बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद. चिरंजीव सदासिवास बरें वाटतें. काही चिता न करणे. बहुत काय लिहिणे हा असीर्वाद. बराबरी स्वार दिल्हे त्यास आबाजीपती उबरेजेस जाणे म्हणून सागितले. तुम्हास कलावे म्हणून लिहिले. बहुत काय लिहिणे हा असीर्वाद. बा। कृष्ण भवानी असीर्वाद सागितला आहे हे आसीर्वाद.

¶*Radhabai to Bajirao communicating details of her pilgrimage and her visits with Narba and Ambaji Purandare.*

No. 9]

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना यांसी सौभाग्यवती कासीबाईचे आसीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणून तुम्ही आपणाकडील क्षेमसमाचार लिहित जाणें. चिरंजीव रघुनाथ सुखरूप आहे. तुम्ही शाहाणपणे राहून कुशलवृत निरंतर येणारासमागमे लिहीत जाणें. बहुत काये लिहिणें हा आसीर्वाद.

¶*Kashibai asks her son Nanasaheb to write to her about his health.*

No. 10] [*13-4-1737*

श्रीशंकर

श्रीमंत राजेश्री आपा स्वामीचे शेवेशी

पोश्यें बाबूजी जोशी सा। नमस्कार विनंती. उपरी. येथील वर्तमान स्वामीचे आशीर्वादेंकरून चैत्र वदी १० बुधवारपावेतों सुखरूप असों. शरीरास थोडें-बहुत आरोग्य आहे. परंतु आठांचौं दिवसांनी गंगातीरास जावें लागेल. येथें राहिल्यानें अंनाचा परिपाक होत नाहीं. याकरितां ज्वर दूर जालियावर जाऊं. परंतु स्वामीची आज्ञा असावी याकरितां विनंती लिहिली आहे. स्वामी आज्ञा लिहितील त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल गणेश वैद्य व मनपा नाईक स्वामीचे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शेवेशी पाठविले आहेत; पावतील. स्वामीकडे लशकरचें वर्तमान येईल तें वरचेवर कृपा करून लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Babuji Naik writes about his health to Chimaji Appa.*

No. 11]

श्री

पुा राजश्री पंत प्रधान
गोसांवी यांसी

विनंती उपरी. आम्हाकारणे येक शालाची जोडी सात हाती लांब व येक उंठ घेऊन आलें पाहिजे. विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao (?) to Bajirao asking for a shawl being sent to him.*

No. 12] [*27-11-1737*

श्री

विनंती. सेवक बाबूराव राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल वर्तमान तागाईत छ १३ रजब पावेतों येथास्थित असें विशेष. येथील वर्तमान जासुदाबराबर गुळ्याबरोबर पाठविले आहे त्यावरून विदित होईल. हल्लीं येथें दसरेयाआदले दिवशीं मलहारबा, राणबा व येशवंतराऊ, तुकोजी, जिवाजी पवार व बांडे व उदाजी पवार ऐसे सारे सरदार जमा जाले. मालवे प्रांतीचे माहाल समाईक होते ते सरकारांत घेतले. त्यांचा येकंदर मक्ता तेच करितील अथवा दुसरा कोण्ही करील ऐसा इत्यर्थ जाला आहे. काय होईल पाहावें.....मालहि आले. देवजी यास रेमिरखान वगैरे लोक जमा जाहले.....विशीचाहि थोडा थोडा निकाल पडावा ऐसें आहे. आजी छ मजकुरीं हुजरें यास तीनशें रुपये देऊन रवानगी केली, येऊन पावतील. हा कागद स्वामींनीं ठेऊं नयें फाडून टाकावा ही माझी विनंती मान्य करावी. औषधाची बहुतकरून मुख्याकडे नुन्यंता जाली. सौभाग्यवती काशीबाई व मस्तानीं यांकडे नुन्यता होत नाहीं. दिवसें दिवस अधिकताच आहे. प्रत्यह राऊ आपां प्रातःकाळचे येतात. दीड प्रहर दिवसपर्यंत कारभार करितात. संध्याकाळीं संध्या केलियावर जातात. घटिकां दोन दोन असतात, मग निद्रेस जातात. असें प्रतिदिनीं होतें. वरकड अधिकोत्तर वर्तमान लिहिणेंसें नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Baburao Ram Fadnis, in a confidential letter, writes about the settlement of some Mahals in Malwa and further adds a few lines about the daily behaviour of the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 13]

पौ छ ११ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी विनंती. आज्ञाधारक नागोजी राला दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १० जिल्हेजपावेतो साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. मतवालीची सिंगीस आजार होता, त्यास उपाये करितां काही उतार पडिला आहे. पांचसात रोज पिठाचा रजहि पोटात गेला नवता. त्यास कालीपासून हरभरेचे पीठ साकर ऐसी दिली ते पावसेर आदसेर खाऊ लागली. साहेबाचे पुन्य पदरी आहे तरी बरी सत्वरीच होईल. गुणसागर घोडीचा पाय दुखवला आहे. त्यास, तेथे कोणी जाणता आढलेल तरी दाखऊन उपाये करवावा. नाहीतरी, साहेबी घोडी येथे पाठऊन द्यावी. वोषधउपाये करून बरी करून. तरी राऊत काल गेले आहेत त्याबा घोडी पाठविली पाहिजे. बहुत काये लिहू हे विनंती.

¶*Nagoji Rala writes to Chimaji Appa news about the illness of a mare.*

No. 14]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. भोपत पांयेदामी यास आम्ही विचारिलें कीं, कडुसांत कोणत्या पाटलाचे घरीं बदकाचा जोडा आहे त्याचें नांव सांगणे. तो बोलिला कीं, पाटलाचें नांव ठावकें नाहीं. पाटलाचा आहे कीं आणखी कोणाचा आहे हें न कळे. परंतु त्या गांवात आहे म्हणून बोलिला. तरी, स्वामीनी कडुसच्या पाटलाचे घरीं अगर गांवात ज्याचे घरीं असेल त्याची तहकीकात करून आणविला पाहिजे. बदकांच्या जोड्यांस बुरडी करंडे करून चारापाणी वाटेने घालऊन निगेने रवाना करावे. तीर्थरूप राजश्री राऊ कुलाबियाहून स्वार जाले. पुणियास येताती म्हणून लोक बोलताती. तरी, स्वामीनी त्यांजकडील तत्वता वर्तमान लेहून पाठविले पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Chimaji Appa is asked to secure a pair of ducks from Kadus for the King.*

---

१ जाळ्यानें पक्षी धरणारा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 15]

छ १ रजब

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दरबारीचे वर्तमान तरी राजश्री स्वामीनी हातीणी २ दोन माघाऱ्या परतोन दिल्हा ते समई राजश्री फतेसिंग बावा व राजश्री येसाजी भोसले व राजश्री नारबावा मंत्री आणिक बहुत लोक होते. ते समई राजश्री स्वामीनी राजश्री नारबावा यास आज्ञा केली राजश्री चंद्रसेन जाधवराऊ यास पत्र पाठवणे की दोन हतिणी उतम खरिदी करून पाठऊन देणे. राा देवराऊ यासी आज्ञा लिा पाच हजार रुपये शाहराज (स) पाठऊन उतम दोन हतिणी घेऊन येणे. लिंगोजी हवालदार यासी आज्ञा केली की या प्रांते हतिणी विकत मिलाली तर घेणे. त्यावर लिगोजी हवालदार याने अर्ज केला की राा खंडोजी जगथाप वेलापुरकर याचे घरी हातीण उतम आहे. दिल्ही तर रवाना करूं. त्यावर राजश्री रानोराम दिा सुमत यासी आज्ञा केली की येवजखान याच्या पुत्रास लेहून शाहारीहून दोन हतिणी उतम विकत घेऊन आणाव्यां. याप्रमाणे च्यार घटिका मजकूर जाला. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Bajirao and his brother are informed of the discussion at Shahu's Darbar about purchasing elephants.*

No. 16]

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवियांसी

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रेहांकित पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें, प्रविष्ट जाहालें. पत्रीं आज्ञा केली कीं, राजश्री स्वामीनी लावणीबदल नारंगीची रोपें सुमार ५० पनास आणविली आहेत. लावणीचा हंगाम हाच आहे म्हणोन आज्ञा. यैसियांसी, आमचे बागात नारंगीची रोपे नाहीत. जवलपास आणखी कोण्हाकडील बागात मिलावयाचे कठीण. याकरितां मुजरद जासुदांची जोडी शहरास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नारंगीची रोपे आणावयास पाठविली आहे. रोपे येतांच पाठऊन देऊन. विदित जाहाले पाहिजे. आपलें पत्र येतांच जासूद रवाना केले आहेत. विशेष काये लिहिणें? कृपा केली पाहिजे, हे विनंती

मोर्तब
सुद.

श्री
श्रीपांडुरंग-
चरणी दृढभाव
चांगोजीसुत
पिलाजी जाधव ॥

¶*Pilaji Jadhao to the Peshwa informing him that he has sent men to fetch some sweet lemon plants for the King.*

No. 17] [पो *2-2-1739*?

पा छ २ जिल्हेज

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री राऊ
तथा आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामी बोलिले कीं, साल दरसाल सिवापूरच्या अंब्याच्या कोया लावावयास वीस हजार नेतां त्या पुणें देसांत कोणे गांवी किती झाडें लाविलीं आहेत त्याची तहकीकात करून गांवे गांवच्या पाटलांच्या अर्दासा व येक जाविता करून आणवणे. पुणे देसांत अंबराया नाहींत. ताकीद करून गांवोगांव अबराया होत ती गोष्ट करवणे म्हणून आज्ञा केली आहे, तरी स्वामीनी गांवगना ताकीद करून राजश्री बापूजीपंतास आज्ञा करून तहकीकात करून पाटलांच्या अर्दासा व कोणे गांवी किती झाडें नवीं लागलीं आहेत त्याचा जाबता करून पाठविला पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is asked to give information about the progress of mango plantations in the Poona district for which he received annually twenty thousand mango-stones from Shivapur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 18]

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ २७ माहे रमजान जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी वेदमूर्ती कृष्णभट करवे याणीं यादी भांडियाची दिल्ही होती त्यास त्या यादीप्रमाणे भांडी करऊन पाठविली आहेत. येणेप्रमाणे वजन पके वोझी येकूण वजन पके—

८५८८	किता वोझे १ येकूण वजन.		
	८८५। ३	वेळण्या	४
	८८९।।।५	तपेलिया	३
		८८३।।। किता.	
		८८२।५ किा	
		८८३।।। कि	
		८८९।।।५	
	८।५८८		७
८।.।।	किता वोझे		
	८८४८६	बहुगुणी	३
	८८६।५	तपेली	३
		८८१।।।४।। किा	
		८८२।७ किा	
		८८२८४।। कि	
		८८६।५	
	८।.।।		६
८।।५।।८			

येकूण वजन साडेपंचवीस सेर आठ पैसे भार, येकूण दागिने १३ तेरा, येकूण वोझी २ दोन पाठविली असेत. घेऊन पावलियाचे उतर पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे. लोभ केला पाहिजे हे विनंती. याखेरीज तूप वेठे ६ येकूण तूप

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वजन पके ८१।।।७।।। पावणेदोन मण पावणेआठ सेर पाठविले असे उतर पाठविले पाहिजे. या वेळ्यास तिकडून येते समई तिरोजा अडिसेरी दिल्ही पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*This letter contains a list of utensils sent for the Peshwa's household from Kalyan.*

No. 19]

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती. स्वामीचे कृपेकरून ता पौश्य शुध सतमी वर्तमान यथास्थित असे विशेश. स्वामीनी पत्र पाठविलें ते पावलें. हस्तिदंताचा मजकूर लिहिला व रा शंकराजी केशव याणी दांताविसीं आपणास पत्र लिहिलें त्याची तालीक पाहावयास पाठविली ते पावली. आपल्या लिहिल्यावरून सविस्तर अर्थ कलला. यैसियास आपण आजीता दांताचा उदीम केला नाही. रा अंतोबा नाईक भिडे व बालाजी दादाजी मागत होते. त्यांत सरकारची नुकसानी दिसोन आली यास्तव आणखी दोघेजण तकसीमदार व आम्ही यैसे तिघा जणानी दात खरीदी केला. सनदपत्र येऊन तकसीमदार व चिरंजीव गंगाधर जोसी वसईस रवाना केले. त्याणी दांत फ्रौ करावयाची बोलीचाली मुबैस वगैरे जागा पेंठेच्या सांवकारांसी केली. आतां संकराजीपंतांच्या पत्रावरून आपण अर्थ लिहिला. तरी आपल्या वचनावरून तकसीमदार मेलऊन पेठेच्या सावकारांसी बोली केली. तेथें आमची सचवटी कैसी राहेल हा अर्थ स्वामीने चितांत आणावा. सावकारी धंदा. आम्हास तोटा आला तरी सुटेल कीं काये? संकराजीपंती विकिला तऱ्हीं माल आमचा, तोटा नफा आमचा आहें. वचनास अंतर पडल्याने पेठेच्या सावकांरासी तकसीमदारांसी आमचे बोलीची प्रामाणिकता राहात नाही. विस्तारें ल्याहावें तरी सर्वजाण आपण आहेत. आम्ही दांताच्या धंद्यात मन घातलेच नवतें. सरकारची नुकसानी न व्हावी याकरितां अंतोबा नाईक बालाजी दादाजी करीत होते ते मोडून धंदा केला. तोटा येता तरी आम्हास सुटता कीं कायें? आमचे वचन सावकारासी गुंतलें आहे त्यास अंतर न पडावे. यैसे चितात आणून करणें ते करावें. आपण लिहिले कीं संकराजीपंती सावकारास वचन दिल्हें आहे. त्याची सचवटी राहिली पाहिजे म्हणून लिहिलें तरी त्याणी केली ते आम्हीच केली. दाहा पांच खंडीची बोली केली असिली तरी दांताचे माप चिरंजीव गंगाधर जोसी याचे विद्यमाने घालून पैका येईल त्याचे पदरी घालावी. त्याहिमध्ये संकराजी-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पंताच्या लिहिल्याचप्रमाणें करावे येसें आपल्या चितात आले तरी आमचा उजूर कांही नाही. स्वामी सर्वज्ञ आहेत करणें ते करावें. बहुत काय लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to Chimaji Appa about the dealings in Ivory-tusks. The writer is much anxious to keep his credit in the bazar of Bombay.*

No. 20]

श्री

शेवेसी विज्ञापना स्वामींनी लिहिले की गुलाबदान्याचे प्रयोजन आहे. तरी अर(का)टच्या गुलाबदान्या आहेत त्याखेरीजकरून आणिखी गुलाबदान्या आमचे जामदारखान्यात अगर तीर्थरूप राजश्री रायाच्या जामदारखानियांत असतील, त्यापैकी दोन गुलाबदान्या पत्रदर्शनी पाठऊन देणे; म्हणोन आज्ञा. यैसियास स्वामीचे जामदारखानातून दोन गुलाबदान्या, येक नक्षी मिनेदार व येक जालीदार मुलामे सोनेरी, येकून दोन गुलाबदान्या, भोगाजी देवरा दिा बालोजी पवार याजबराबर शेवेसी पाठविल्या आहेत. तीर्थरूप राजश्री रायाचे जामदारखान्यात गुलाबदाणेया येकदर नाहीत. सेवेसी कलावे म्हणून लिहिले असे. सेवेसी श्रुत होये. हे विज्ञापना.

¶*The writer sends two rose-water sprinclers to Chimaji Appa as per instructions.*

No. 21]

श्री

श्रीसकलतीर्थस्वरूप श्रीमत्परमहंस श्रीस्वामीचे शेवेसी

आपत्यासमान शाहूजी राजे कृतानेक दंडवत विनंती येथील कुशल स्वामीचे कृपाकटाक्षे येथास्थित असे विशेष स्वा द्य होऊन आसीर्वाद पत्र पाठविले प्रविष्ट होऊन अक्षरशा लेखनाभिप्राय विदित जाला. विरमाडे आनेवाडी धावडशी येथे बावाजी सिवदेव व राजश्री येमाजी सिवदेव व भवानी शंकर हे वेठबिगारीचा उपद्रव आजीवर करितात. यैसियास कोकण प्रांत त्याग करून येथे आलो. येथे हे उपद्रव करितात या मुळे आपले राहाणें होत नाहीं म्हणून चितात उदासीनता आणून विस्तारे लेख केला त्यावरून राजश्री येमाजी सिवदेव व भवानी शंकर यास स्वमुखे रुबरु आज्ञा करणे ते केली या उपरी त्याकडून कांहीं उपसर्ग होणार नाही. स्वामीनी चित्त स्वस्थ करावे. उदासीनता सर्वथा न

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आणावी. स्वामीपेक्षा दुसरे अधिकोतर आहे असे नाही. स्वामी देवालये वापी कूप तटाके झाडझडोरा लावितात हे कीर्ति अक्षय करिजेती यापेक्षा उत्तम काय आहे? आम्हासहि या गोष्टीचा बहुतसा संतोष आहे. स्वामीनी आणनासे व कण्याचे रोप पाठविले तेहि पावले. वरकड विचार लिहिला तर जे होणे ते स्वामीच्या आसीर्वादप्रतापें होईल. ते गोष्टीचे अगाध आहे असे नाहीं. सेवेसी श्रुत होये विनंती.

¶King Shahu assures Brahmendra Swami that, in future, Yemaji Shivdev and others will not create any trouble for him as they have been warned accordingly.

No. 22]

श्री

श्रीमत परमहस स्वामी याहीं

अपत्य बालक पेशवे प्रधान यास आज्ञा. नानाबाबत उदमदत साडे तीन हजार रुा येणे आहेत त्यास बहुत दिवस जाले. त्यात ग्रहण, वितिपात, माहापर्वे गेली आहेत. आम्हासहि गरज आहे. त्यास तुम्हास अनकूल होईल तर, आम्हावर दया करून रुपये द्यावे. जसे नारदाने धुरूस उपदेसिले तैसें माहागणपतीने तुम्हास उपदेसिले, पुरश्चरण केले ते फलास आले. आवघे शत्रू पादाक्रांत जाले. राजा वश्य जाला. आझून कां तुझ्या चितात येईना? याजउपरी मजला राग आणिला म्हणजे इतके टाकून तुजवर जाईन. नानाबाबत ... ... पैकी काही पाठऊ ... ... मजला पैक्याची गरज आहे. जिनस रवाना करावा लागतो. माझे गरज राखिली म्हणजे सर्व तुझे मनोरथ गणपती सिधीते पावील. हाली पंचवीस केली पिकली नानास पाठविली आहेत; हे पुण्यास पावती करणे. जाणिजे हे आज्ञा.

¶Brahmendra Swami presses the Peshwa to pay back the sum of Rs. 3,500 lent long ago to Balaji Vishvanath, and at the same time showering on him his choicest benedictions.

No. 23] [*About 1737?*

श्रीभार्गव परिब्रह्म

श्रीमत् परमहौस स्वामी याहीं

मननिर्मलगंगाजल येकवचनी येकनिष्ठ चिमाजी यासी आज्ञा यैसीजे दोन हजार रुपये व पासोड्या दोन दो दोशा रुपयाच्या व दुशाला दोन दो दोशा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रुपयाच्या यैसी पूजावस्त्र खडोजीने श्रीस अर्पिली. याखेरीज अवघयांस वस्त्र दिली हे वर्तमान तुजला कलावे म्हणून लिहिले असे. बनसोड आंबा आला आहे त्याचे आबे सुमार १०० व त्याखेरीज आणखी इरसाल आंबे १०० सभर येकून दोनसे आबे धावडोसीस पाठवावे. बहिरंभटाने आम्हास माहालुंग भेटीस ठेविले, त्याचे झाड कोणे ठिकाणी आहे त्याचे ठिकाण लावणे; आम्ही धावडोसीस जाऊन तेव्हां त्याचे डाहाल्यासी माणूस पाठऊन. दुभती म्हैस न पाठवणे. गाभणी म्हैस व गाई सत्वर विईल यैसी सिरा दो दो वेताची उतम पाठवणे हे आज्ञा. चिचवडचे देवानी बहुत प्रकारे सनमान केला. रुपये संभर दिल्हे. उतम येक वस्त्र दिल्हे हे आज्ञा.

¶*Brahmendra Swami to Chimaji Appa, asking for milch cows and other things.*

No. 24] [*9-12-1735?*

पा छ ९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. चाकरमान्या पाटलाचा निजध्यास बहुत राजश्री स्वामीस लागला आहे तरी सत्वर पाठऊन द्यावे. आले की नाही अहिर्णीसी पुसतांत. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*King Shahu wants the Chakarmane Patil to accompany him in his hunting expeditions.*

No. 25] [*Prior to 1749*

श्री

समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री बालाजी बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली यैसीजे. तुम्हीं विनंतीपत्र पाठविले ते पावले. सविस्तर लिहिले वर्तमान अवगत जाहाले व राजश्री शेषो नारायेण यास पाठऊ द्यावयाविसी विनंती लिहिली. यैसियास तुमच्या लिहिल्यावरून माारनिलेची रवानगी करावी हे अगत्य जाहाले; परंतु तुम्हाकडून हरयेकविसीचे निदर्शन आले न आले हे तुमच्याच चितात पाहाणे. वरकड सविस्तर जे लिहिणे ते राणीवास वाडा चौथा याजपासी आज्ञा केली आहे तेथून लिहितील. त्याप्रमाणे चितात आणून स्वामीच्या निदर्शनास ये यैसे घडवणे हे तुम्हाकडेच आहे वरकड कितेक आज्ञा शेषो नारायण यासी केली आहे. सविस्तर सांगतील त्याजवरून कलेल. जाणिजे सुज्ञ अष.

¶*The King intimates the Peshwa that Shesho Narayan has been sent to him as requested.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 26] [*15-4-1736*

श्री

विनंती[१] उपरी. गुलजारखानाच्या साहित्यपत्रांत मसाला रुा १०० येकसे लेहून माणसे दिंा आतोजी डावरे पाटविले. याची आज्ञा राजश्री स्वामीनी केली आहे तर मसाला भरून माणसे लेहून सनदा पाटवणे हे विनती.

१ (पत्राचे पाठीमागें) राजश्री बसतराव खोजे.

छ ९ ताा १४ जिल्हेज सुरू सन सीत सलासीन मया व अलफ.

¶*These are two disconnected bits of information which are written on the two sides of the same paper. Basavantrao Khoje was the trusted servant of Shahu whose date mentioned here is found for the first time. Who the Guljar Khan of the first entry is, cannot be ascertained.*

No. 27]

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत आपा स्वामीचे
सेवेसी

सेवक केसो सहदेऊ साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ७ राखर जाणून स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री सरखेली-कडील कापड व पैका व बराबर लोक ३० तीस व येसाजी पवार जासूद रोज गुदस्ता कसबे पुणियास हाजीर जाले. यैवजाची रवानगी राजश्री सरखेलीच्या पत्रावरून विदित होईल. राजश्री पंतप्रधान स्वामीचे मुकाम जेजुरीस आहे म्हणून लिहिले होते. मागती दुर्गोजी भोईटे आले त्याणी सांगितले जे, राजश्री छत्रपति स्वामी व सौभाग्यवती मातुश्री विरूबाई व राजश्री पंतप्रधान स्वामी घाटाखाले उतरले नाही. परभारे कूच करून मजल दरमजल तुलजापुरास गेले. व आंगरियाकडील तीस माणूस बराबर आहे. अडसेरी मागतात. राजश्री सरखेलीने अडिसेरी पुणियांपावेतो दिल्ही. आपा कुलाबियापावेतो अडिसेरी पाहिजे यैसे म्हणतात. तरी यैवजाची व अडिसेरींची आज्ञा करावया स्वामी समर्थ आहेत. वरकड वर्तमान जासूद जबानी सांगता विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*News letter to Chimaji Appa, informing him of the departure of Bajirao and the King to Tuljapur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 28] [12-2-1735 ?

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनती. नवाब निजामनमुलुक याच्या लस्करातून छ २९ रमजानी सध्याकाली राजश्री माहिपतराऊ याचे पत्र आले त्याची नक्कल करून पाठविली आहे त्यावरून वर्तमान विदित होईल. सौ राजसबाई यासी प्रतापगडास देवीच्या दर्शनास जावयाचा नवस आहे यास्तव राजश्री स्वामी खासा व सौ राजसबाई+ यैसी मात्र जाणार. वरकड सौ बाईसाहेब वरकड माहाल अगदी वाईत राहतात. प्रस्तुत सौ राजसबाईचे धाकटे कन्नेस समाधान नाही. यास्तव येक दोन दिवस गुता आहे. चतुर्थी पचमीस येथून स्वार होऊन प्रतापगडास जातील. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The news about the King and Rajasbai proceeding to Pratapgad is communicated to Chimaji Appa by Mahadoba Purandare.*

No. 29] [About 12-2-1735 ?

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून छ २ सवाल परियेत कुषल आसो विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन सासवडास आलो. तेथून त्रितीया मगलवारी दो प्रहरा वाईस आलो. विदित जाले पाहिजे. तीर्थरूप राजश्री राऊ यांजकडील वर्तमान आलीकडे आले आसिले तर लेहून पाठविले पाहिजे. प्रतापगडास राजश्री स्वामीसमागमे जाऊन. विदित जाले पाहिजे, सेवेसी विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo reports to Chimaji Appa his arrival at Wai and further intimates him that he would accompany the King to Pratapgad.*

No. 30]

श्री

विनंती सेवक तुबाजी अनंत सा नमस्कार विनंती. सेवेसी प्रार्थना यैसीजे. काली सनिवारी आणाजी कासी व डाकेचा कागद दोनी प्रहर रात्री येऊन पोहचला. त्याचे उतर तेच क्षणी सेवेसी डाकेबराबरी रवाना केले. आजी रविवारी पाहाटे माहाराज मातुश्री आईसाहेबाकडे वाडियात गेलो. स्वामीचे

+ Shahu's daughter from Virubai.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पत्राप्रमाणे विनंती केली. त्याही रो पुराणिकबावास बोलाऊन आणिले. हे वर्तमान सांगितले. ते बोलिले की आजी चंद्रबल आपणास नाही; उदईक चंद्रबल अकरावा चंद्र आहे. आजी अवघी तयारी करा; उदइक चौ घटिका रात्री कूच करू म्हणौन निःस्छये जाहाला. सेवेसी विदित होये. स्वामीनी आज्ञा लिहिली होती(कीं) ग्रहस्त मंडली घोडी उंठ वगैरे कोणाचा किती आहेत तो लिहिणे. त्याची तहकियात दोन प्रहरा सेवेसी लेहून पाठवितो. उदईक कुचाचा अगर च्यार घटिका राऊताबराबरी कुचाचा प्रसंग लेहून पाठवितो. उंठ २० व घोडी २१ बैल १५ कामाठी पनास पाठविले त्यापैकी कामाठी आले नाहीत. येक पालखीया आली. आजी मुकाम जाहला. दोनप्रहरपावेतो अवघी येतील. आणिक घोडी पाहिजेत ते सिवापुरी सांगितली आहेत. आता सरंजाम इतकाच पुरे. बहुत काय लिहिणे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant to the Peshwa communicating news about the Rani and the auspicious times for certain undertakings of hers.*

No. 31] [*1-8-1738*

छ ७ जालौवल

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

अपत्यें मल्हार तुकदेऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २५ रबिलाखर मुकाम कसबे म्हैसाल स्वामीच्या असीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. येथील सविस्तर वर्तमान अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिले आहे त्यावरून विदित होईल. स्वामीचे येणे राजदर्शनास कधी होईल त्याचा इत्यर्थ स्वामीनी आगोधर लेहून पाठविला पाहिजे. सत्वरच यावे. पुढे पितृपक्ष, त्यापुढे अधिकमास; याकरिता सत्वर यावयाचा विचार केला पाहिजे. उतरेकडील साप्रत वर्तमान आले असिले तर राजश्री स्वामीस लेहून पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo enquires of Chimaji Appa and Bajirao as to when they should come for an interview of the King. He further requests them to supply the King with the news from North if they have got any.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 32] [?

पौ छ २० शौवाल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनंती उपरी. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यानी पैदास्तीच्या तेरांडिया[1]-पैकीं काहीं जिनस राजश्री स्वामीस पाठविला होता. तो थोडा काहीं कार्याचा नाहीं म्हणून राजश्री स्वामीना खुश होऊन गुलाल वगैरे पहिलें राजश्री कान्होजी अंगरे पाठवीत होते, त्याप्रमाणे गुलाल व मासे ठेऊन वरकड जिनस माघारा परतोन पाठविला. स्वामीस कलावें याकरितां लिहिले आहे. जिनसाचे यादीची नकल पाठविली आहे. त्यावरून विदित होईल. गुलाल व मासे ठेऊन घेतले. वरकड जिनस माघारा पाठविला. राजश्री रामाजी दामोदर बहुत आग्रह करीत होते की जिनस ठेवावा, माघारा पाठऊ नये; परंतु राजश्री स्वामीनी जिनस ठेविला नाही आणि बोलिले की या उपरी त्यानी जिनस विशेष पाठविला तन्ही घेणार नाही. विदित जालें पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Chimaji is informed that Shahu was displeased with the presents sent by Sambhaji Angria and sent them back retaining only fish and red powder.*

No. 33] [*13-1-1733*

छ १९ साबान

श्री

पुरवणी राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामी श्रीचे यात्रेस जेजुरीस माही पुर्णमेस जाताती तरी तुम्ही राजश्री स्वामीच्या दर्शनास निरेच्या काठास येणे म्हणून राजश्री तात्यानी दोन च्यार पत्रे आम्हास पाठविली त्यावरून आम्ही माघ सुध सप्तमीस पुणाहून स्वार जालो ते सासवडास येऊन मुकाम केला. तेथून दुसरे दिवसी वालई येथे येऊन राहिलो. नवमी शनवारी राजश्री स्वामीचा मुकाम मौजे खेड पा सिरवल येथे जाला. ते दिवसी त्रितीये प्रहरी राजश्री स्वामीची भेटी जाऊन घेतली. समागमे राजश्री बापूजी श्रीपत होतें. आम्ही राजश्री स्वामीस नजर

---

१ जहाजाचा प्रकार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पांच मोहरा केल्या व सतैका[1] रुपये पाच केले. राजश्री स्वामीनी जरी चादर आम्हास दिल्ही. संध्याकाल जालियावर राजश्री स्वामीनी आज्ञा दिल्ही. तेथून वाडियांत गेलो सौभाग्यादिसंपन वज्रचुडेमंडित मातुश्री विरुबाईसाहेब याची भेटी घेतली. नजर दोन मोहरा केल्या. त्यानी विडे देऊन आज्ञा दिल्ही. मग डेरियास आलो. विदित जाले पाहिजे. सेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Nanasaheb (?) to Bajirao informing him that he has left Poona and gone to Khed to meet the King and Virubai on their way to Jejuri.*

No. 34]

श्रीजयति.

अपत्यें नानानें सा नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ येथास्थित असे विनंती. स्वामीचें व नवाबाचें दर्शन सन्मानपुरःसर जालियाचे वर्तमान लेहून आसीर्वादपत्र पाठविलें ते पावोन सविस्तर कलले व राजश्री जानबास स्वामीचे पत्र तपसीलवार आले तेंच त्याणीं येथे पाठविले. त्यावरून तों आद्यंत कललें. तेणेंकडून संतोषावाप्ति जाली. पुढेहि वरचेवरी वर्तमानलेखन कराया आज्ञा केली पाहिजे. राजश्री स्वामी श्रीस येणार आहेत ते माघ शुध प्रतिपदा-द्वितीयेस स्वार होऊन येणार. तेथील साहित्यास सर्वांस बोलाऊन वेठे जमा करून जपणें, यैसीं पत्रें पूर्वी स्वामीचीं आलीं व राजश्री तात्याची वरचेवरी येतात. त्याजवरून सर्वास येथून लिहिले लिहितों. परंतु गोविंद कृष्ण याचें पत्र आलें तेंच सेवेसी पाठविलें आहे. त्याणीं तात्यासहि तैसेंच लिहिलें. आम्ही त्यास फिरोन प्रतिउतर लिहिणे ते लिहिलें. परंतु हे वर्तमान सेवेसी शृत व्हावे म्हणून लिहिलें असे. मुख्य गोष्टी चौघानीं च्यार तपसील लिहिल्यानें येथे राजश्री आलियावरी फजिती होऊं शकें. येविसीं जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. चाकणेचा किलेदाराचे वर्तमानहि गोविंद कृष्णाचे पत्रावरून विदित होईल. वरकड वर्तमान वरचेवरी लेहून सेवेसी पाठविलें आहे त्यावरून विदित जालेच असेल. स्वामीचें आगमन लौकर होइलसी आज्ञा लिहिली. परंतु तेथे गुंता किती दिवस, काये वर्तमान, तेंहि ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Nanasaheb says probably to Chimaji Appa that he has written to Jejuri to make proper arrangements for the visit of the King to the temple.*

---

१ ओवाळणी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 35] [*1727?*

श्री

श्रीमन्महाराज राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता॥ छ १८ सफर मु॥ पाटस स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित असे विशेष. आपले आज्ञापत्र आले ते छ १७ सफरी प्रविष्ट जाले. तेथे आज्ञा की पर्जिन्यवृष्टीनिमित्य श्री स अनुष्ठानास ब्राम्हण घालणे. त्या वरून आज्ञेप्रमाणे अनुष्ठान चालीस लाविले. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञप्ती.

No. 36]

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री बाजीरावजी व चिमाजी आपा स्वामीस स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासिव नाईक जोसी सास्टाग नमस्कार विनती उपरी. येथील क्षेम आस्विन शुध १० पावेतो सहकुटुंब सुखरूप असो. उपरी माहाराजेही कृपाकरून पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. येथील वर्तमान येक महिना मजवरी बहुत उपाधी जाहाली. माहा(रा)जाचे पुण्यकरून राजश्री केशवरावजी व नारायेणरावजी याही तेथील तेथेंच वारून मजला अभयेपत्र पाठविले त्यावरून फोजदार व गावातील सावकाराजास (?) सर्वास सुख जाहले. कदाचित दाहापाच दुस्ट असतील यास दुख जाहले तरी स्वामीने उभयतांस याजविसी समाधानपत्रे पाठविली पाहिजेत. आम्ही त्यास प्रविस्ट करून. याविसी पूर्वी येक दोन पत्री सविस्तर वर्तमान लिहिले आहे. माहाराजाही लिहिले घाटाविसी व अकरा ब्रम्हपुऱ्याविसी लिहिले तरी रावजी! मजवी (सी?)श्री आयुष्य देईल तरी तुमची सेवा (परलोकीची) करावी हा हेत बहुत आहे, तो विषये माहाराजाही लिहिला तेणे करून संतोष जाहाला तो पत्री काये ल्याहावा? हे धर्मवासना या वयांत धरणे हे पुण्य वडिलाचे आहे! ईश्वर तुम्हास हेच बुधी सर्वकाल देऊ. मी सेवक सिध आहे घाटाचा व ब्राम्हपुऱ्याचे ठिकाण * * * * नागेशाचे देवलापासून आग्नेस्वराच्या घाटापावेतो स्थल आहे त्यामध्ये तिसरी तक्षम स्थल आजी हातास येते. बाकी राहिले तेहि काम लागल्याउपरी हातास येईल. सर्व स्थल हातास आल्याउपरी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अकरा ब्रम्हपुऱ्या होतील. सन्यांशास स्थले होतील. परंतु ते स्थल बाधावे, ब्रम्हपुऱ्या कराव्या, सन्यांशास मठ करावे, त्यास रुपये लक्षाहून दाहावीस अधिक लागतील. संहा(बा ? दा ?)लीचे स्थल आहे परंतु श्रीमनकर्णिकेचे समीप आहे. श्रीमनकर्णिका समीप टाकून येक घाटी स्नान कोणी करणार नाही. यैसे असोन तेहि प्रस्तुत हातास येत नाही. रघुनाथभट पटवर्धन याचे सिष्याही थोडेसे घेतले होते ते आजी दोन आडीच वरसे दिलीत आहेत. रुपये माहारा(जा)ही पर्ण्यास दिले ते कासीत येऊन फिरोन येथील तेथें गेले. नाना स्वामीचे पुण्य कसे आहे ! श्रीमनकर्णिका घाट सिध होऊन आजी पाच वरसे कार्तिकी पुर्णिमेस दीप लागती तेव्हां श्रीकैलास होऊन जातो! पनास हजार माणूस मज धंन्य धन्य म्हणतात. आणि मी नानास्वामीस धन्य म्हणतो. त्यांचे पुण्य तसेंच आहे. माहाराजांचे पुण्य तसेच आहे. जे मनी धराल ते सिधीस पावेल. जरी माहाराजाचे चितास नागेशाचे स्थल मनास येईल तरी हे मोहीम (?) आहे. साल दरसाल वीस रुपये यैवज करून घ्यावा. यक साल द्रव्य आल्याउपरी काम सुरू * * * होणे ते ईस्वरइछेने होईल. चितास न ये तरी माझे-विचारे घाट तरी आणखी चितांत यत नाही. अकरा ब्रम्हपुऱ्या हरकोठे ठिकाण पाहोन बांधो रुपये २५ लागती. दोन वरसामध्ये सिध होतील. या उपरी जे आज्ञा करितील ते होईल. फोजदार येथे भला आहे तोवरी काही चिंता नाही. निजामाचा तुमचा स्नेह असेल तरी त्याकडून अर्जी सारवभोमास व त्याचे बंधु दिवाण आहेत त्यासी पत्र यक चोपदार यैसा दिलीस येऊन कासीमध्ये अमीनाकडे दोन तीन सेवा आहेत त्या होतील तर येथे सर्व प्रकारे अभये होईल. काही सता असिल्याने कामहि लवकर होईल. रावजी ! हे काम माहाजनीने करावे तरी पाच माणसे लागतील. जरी माहाराज कोणास लिहोन हुकूम पादशाही येईल तरी सत्वर काम होईल. * * * * होईल. मनकर्णिका घाट सिध जाहाला सर्व लोक येथील तुमचे द्रव्य म्हणतेत. परंतु आम्ही आपल्या मुखे म्हणत नाही. देशाहून यात्रकरू येतात व आपले माहारास्ट आहेत याजवली म्हणतों, घाट घरे धर्म सर्व बाजीरावजीचा आहे. परंतु गंगापुत्र व येथील अवंरद (?) याजपासी म्हणत नाही. परंतु ते म्हणतेत. याकरिता पादशाही लिहिले अले तरी स्वामीचें नाव प्रशस्तपणे होईल. याचा उपाये जो होईल तो करणे. अनछत्र स्वामीने पाठविले ते चालीस आजीच लाविले. ब्राम्हणाची वरसासने देऊन त्याची आसीरवादपत्रे पूर्वीच पाठविली आहेत. पावलीच असतील. नारायेण दिक्षितांचे रुपये पाच हजार जमा केले त्यापैकी विस्वभरभट माहाडकर यासी देविले. भटजीनी ते दिले. बाकी अठेतालीसे रुपये जमा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहेत ते आल्या उपरी घर घेऊं. आम्ही घ्यावे तरी ते क्रोधी आहेत. त्याच्या मनास न ये तरी मी काये करावे ? श्रीधर जोसी याचे हजार रुपये जमा आहेत त्यास बिदा (?) करावे. तो आल्या उपरी त्याचे विचारे घर घेऊं. अग्निहोत्रास घर पाहिजे, तरी हजार रुपयात होणार नाही. (करितां) आणखी पाचसे रुपये लावील तरी अग्निहोत्रास घर होईल. प्राणनाथभट गाडगील यासी रुपये दिले. नरहरीभट सफरे यासी रुपये दिले. विश्वंभरभट माहाडकर यासी रुपये ३०० दिले. नारायण दिक्षिताही रुपये दोनसे देविले. येकून पाचसे रुपयामध्ये माघमासी आग्निहोत्र व येज्ञ करावितो. फालगुनमासी स्वामीजवल येतील. उपरी दिनानाथीही लिहिले. सिधेस्वराचे उजवेबाजूकडे घाट आहे तरी तेथे घाट नाही. सन्याशाची स्थले आहेत. तेथे घाट होऊन लोक येतील जातील यैसे नाही. ब्राम्हणाली म्हणजे गंगेमध्ये आहे. लांबी गज पनाससाठी आहे. ते त्यामध्ये निमस्थल पाण्यामध्ये धसले आहे. तेथे बाधावे तरी लक्ष रुपये गंगेमध्ये टाकून द्यावे तेव्हा पनास पाउणसे गज पातालाहून बांधोन काढावे. ते आपणा योग्य नवे. दशामध व आलीकडे पलीकडे घाटा हावा तरी लक्षशा रुपये * * * ब्राम्हण स्नान करीत तेहि गोस्ट कामाची नाही. याकारितां नागेशाचे स्थल आहे आणखी आपणा योग्य नाही. कासीद अजुरदार करून पाठविला आहे. त्यासी येथे रुपये १० दिले आहेत. बाकी रुपये १५ चिरजिवाकडू(न) देविले पाहिजे. उतर येईल त्याप्राा वर्तणुक(क)रू हे विनती सुपारी खापा आवरगाबादेत मिलता ते पाचसेर पाठविणे हे विनती चुकौन (?)

मातुश्रीस साष्टाग नमस्कार सागणे. हे विनंती.

¶*Sadashiv Naik Joshi to Bajirao and Chimaji Appa. This is a very interesting letter, although it cannot be dated, shewing in detail the works of piety and religion which the Peshwas undertook to effect at Benares, such as ghats, temples, feeding of Brahmans and other items of worship and merit. The idea seems to have originated with the first Peshwa and continued to be carried into effect throughout the Peshwa regime. This letter explains why the third Peshwa was so anxious to release Benares from the possession of Mussalman Rule. The whole letter is in the hand of the writer.*

No. 37]

श्रीसंकर

वृधकाल

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री

बाजीरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासीव जोसी साष्टाग नमस्कार विनती उपरी. माघ सुध १५ पावेतो श्री विस्वेस्वरनगरीत सुखरूप असो विशेष. रावजी ! सरीरद्वारा पीडा विशेष

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाहली. स्वामीपासून ब्राम्हण नरहरीभट सप्रे व प्राणनाथभट गाडगील व विस्वंभरभट मा वगैरे ब्राम्हण आले. त्यानी महाराजाचा येस कीर्ति प्रताप उदारत्व श्रुत केले, तेच मात्रा, कर्णद्वारे प्रासन करून आरोग्य थोडे बहुत जाहले. चिरंजीव बाबूजीचे पत्र आले त्यांत लिहिले की श्री तीर्थ येजमान सेवन करितात. आणखीहि ब्राम्हणद्वारा पाठऊन देणे. त्या पत्रावरून तीर्थ कावडी ३ गंगाजल कावडी १ येकून कावडी ४ पाठविल्या आहेत त्या पावतील. रावजी ! गतवरसी श्रीतीर्थ सेवन करून माहाराजाचा कर्जपरिहार व्हावा आणि मजसरीरी आरोग्य व्हावे; त्यासी मज आरोग्य तरी तीन वरसे वाचिवलें. स्वामीचे कर्जाविसई चिंताग्रस्त होतो त्यासी तीर्थ पाठविणे यैसी आज्ञा जाहली. त्यावरून माहाराजास तीर्थ पाठविले त्यासी स्वामीनी अलक्ष्य केले असेल, परंतु मज येथे संतोष जाहला. माहाराज ऋणापासून मुक्त जाहले ऐसी चिरंजीवाने येथे येवून सांगितले. अणखी ब्राम्हणद्वारा जपजाप्य बहुत करविला. त्याही ब्राम्हणाची दक्षणा देवून उतीर्ण जाहलो. श्री तीर्थस्थली आठादिवसा रविवारा सेपनास ब्राम्हणभोजन करितेत, परंतु उतीर्णता मनामध्ये येत नाही. माहाराज समर्थ आहेत. सदैव सेदोनसे ब्राम्हण तीर्थस्थली होत तरी येक संवत्सरपरियंत तरी मनाची उतीर्णता होईल हे स्वामी करिणार समर्थ आहेत. उपरी चिरजीव बाबूजीने लिहिले की कासीकर ब्राम्हणास वरसासने केली हे गोष्ट आपल्यास उचित आहे. उभयेता चिरंजिवावर बहुत लोभ करिता यैसी ब्राम्हण आले त्यानी सांगितले. तरी रावजी ! तुमचे अनुष्ठानाचे सोबती तेच आहेत. मीहि तुमचा थोड्या दिवसाचा सोबती आहे. मजवरी लोभ कराल तो अधिक आहे. पत्र स्वहस्ताक्षरे पाठविले पाहिजे. राजश्री अंबाजीपंत लोभ मजवरी फार करितेत यैसियासी त्यासी गंगाजलाची कावडी पाठविली आहे. माहाराजांचा चितास येईल तरी चिरंजिवासी आज्ञा करून त्यासी प्रविष्ट केले पाहिजे. बहुत ल्याहावे तरी आपण सर्वज्ञ आहेत हे विनती.

पोष्ये गोविंद जोसी नमस्कार सविस्तर वर्तमान तीर्थरूपाचे लिहिलियावरून विदित होईल. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनति.

¶*Sadashiv Naik, father of Babuji Naik Joshi, to Bajirao from Benares. The writer is old and wishes good luck to the Peshwa to whom he sends holy water of the Ganges.*

1681

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 38] [*12-2-1736*

छ १० सवाल

श्री

विनंती उपरी. मातुश्रीकडील वर्तमान लेहून पाठवीत जाणे म्हणून आज्ञा; तरी प्रस्तुत त्याकडून कागदपत्र येत नाहीं. राजश्री आबाजी नाईक श्री यात्रेहून आले. येतां बुंधेल्याच्या मुलकांतून आले. उभयेता राज्याजवल रा॥ गोविंद बलाल होते त्याणी उभयेतास सांगोन नाइकाच्या डेऱ्यास भेटीस आणून भेट करविली. बहुमान केला. तेथून स्वार होऊन परभारेच सुरोजेस गेले. त्यांची आमची भेट जाहाली नाहीं. गोविंद बलाल यांची त्याची जाहाली होती. त्याणी वर्तमान सांगितले कीं मातुश्रीचे गयेस जाणे जाले. सौ भिऊबाई रा॥ आबाजी नाईक यासमागमे आली नाहीं. श्रीवाराणसीमध्येंच राहिली आहेत. मातुश्री येतील त्यांसमागमें येतील. ऐकिलें वर्तमान कळावें म्हणून लिहिलें असे. हे विनंती.

¶*News about the pilgrimage of Radhabai and Abaji Naik Joshi is communicated to the Peshwa.*

No. 39] [*27-10-1739*

श्रीमंत राजश्री राऊजी स्वामीचें शेवेसी

विनंती. शेवक रामचंद्र बल्लाल कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता॥ छ ५ साबान पावेतो मु॥ किले विसापुर स्वामीच्या कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विज्ञापना यैसीजे. येथील वृत्त देखिल्याप्रा॥ बयानबार राजश्री येशवंतराऊ याणी सेवेसी लिा॥ आहे त्यावरून निवेदन होईल. सारांश अर्थ कीं थोर अमलाचे अथवा येका घराचे वडीलपण ज्याचे ठायीं त्याची अमर्यादा वरकड मनुष्यैंपैकीं येकाने केली अथवा दुसरियाने केली म्हणजे भंड वाढोन देखां-देखी लहान मोठे सर्वांस तोच सांप्रदाय लागोन मर्यादा परागंदा होत्ये; तेव्हां कोण गुरू कोण चेला सर्व सारिखे म्हणजे घर फुटणें अशक्य काये? कळीचा वास जेथें तेथें श्रीचा अभाव. मनुष्य मनुष्यास खाऊं म्हणते. जे मूर्ख ते मूर्खच. त्यांत शाहाणाहि कोणी जो, त्याजवरहि तोच रंग चढतो. कसा तर उदक गोड व स्वच्छ

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हि त्यासारिखें तेंच. परंतु रंगांत पडेल तो रंग चढोन मूळ नांव उदक व स्वछता हें बुडालें तेव्हां रंगावभास उदकीं म्हणून प्राशनविषये उडालाच तैसे शाहाणपण मूर्खत्व पावलें. त्याचा उपाय सभ्यानुमतें इनसाफहि करितां कोळसा उदकें उगाळितां सारें उदकच काळें, तेव्हां उदक व रंग निवडूं जातां कसें घडेल? अकलेच्या भरें क्षीरनीर वेगळें करिणार यैसा क्वचित्. भाग्यानसार स्वामीसारिखे सर्वी गोष्टीने * * * जे ते चितावर धरितील. तेव्हां या जाग्याचें व * * * जित होईल. येके बाइकोस दोन भ्रतार तेहि श्नेहें चालतात हें कसें घडेल? कोणाचा गुणदोष भिन्नत्वें काये लिहावा व मारनिलेही देखिला वृतांत गोशवारा लिहिला तोहि विस्तारे म्हणून वा चितांत स्वामी कांटाळतील. दुहीमुळें या जाग्याचें भंड जाहालें हा लौकिक सर्वत्र जाहाला व सरकारची नुकसानी लोक सर्व उदास त्यांस काय तोटा हा कदाचित आक्षेप तर दुहीमुळें हरयेकविषीं बदलामी येतां टळेचना. येकाधे समयीं संकट सारिखें होऊन वा जर ते कचा प्रसंग घडणार म्हणून भयाभीत सर्वी(न)करितां जनावर कृपाळुपणें दोंघांतून येक जोहारून स्वामीकार्याजोगा सर्व कामाचा बंदोबस्तें जागा सुशोभित करी आणि जन त्याजवर सुखी तो जनावर संतोषे राहून खावंदापासीं इतबारपणें जनसहवर्तमान आपली व जाग्याची उर्जा वाढवी यैसी दिसेल तो करार आणि ज्याचे योगें नाश, अकर्ता, अल्पबुद्धि त्यातें पदच्युत यैसे होणें हें या जाग्याचा भाग्योदय उभा राहील तेव्हां खावंद करतील. आमचें लिहिणें कीं मात्र कळहोनदी-प्रवाही जन पडिलों जे त्यांस येकहि थडी हातास न ये. त्यास तरणोपाय ईश्वररूप खावंद म्हणून विज्ञापना लिा असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer gives in a figurative language a moral sermon discussing particularly the genesis of internal dissentions. Is the letter addressed to Bajirao I?*

No. 40]

श्री

राजमान्य राजश्री रघुनाथ बाजीराव यासीं आज्ञा केली ऐसीजे. तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहाले. राजश्री बालाजी पंडित प्रधान यासीं पुत्र जाहाला म्हणून लिहिलें तें श्रवण होऊन स्वामीस परम संतोश जाहाला. सुज्ञ असा.

¶*King Shahu expresses his joy at the news of a son being born to Peshwa Nanasaheb.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 41] [*September 1742*

श्री

राजश्री माहादाजीपंत गोसावी
यासी

ऽ अखडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्री मलारजी होलकर दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशष. आपण शतोषाचे वर्तमान लिहिले की, श्रीमंत् राजश्री नाना साहेबास श्रावण सुध द्वितीयेस चद्रदर्शनी पुत्र जाला. हे वर्तमान छ ८ रजबी दर्शाचे वर्तमान येथे आले. हे तुम्हास कलावे व लस्करास शर्करा वाटणे म्हणऊन लिहिले. हे छ १७ रजबी वर्तमान कलोन बहुत शतोष जाला. वरकड वर्तमान श्रीमंतास लिहिले आहे त्याजवरून अवगत होईल. आपण सदैव पत्र पाठऊन परामृश करीत असावे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे. हे विनंती.

श्रीम्हांळसाकांत-
चरणीं तत्पर खडोजी-
सुत मलहारजी
होलकर.

मोर्तब
सुद.

¶*Malharrao Holker to Mahadajipant Purandare, expressing his joy at the news of the birth of a son to the Peshwa. It refers to the birth of Vishwasrao (22-7-1742).*

No. 42] [*11-3-1749*

श्री.

राजश्री पंतप्रधान गोसावियांसी

ऽ सकलगुणालंकरर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रेहांकित उदाजी पवार दंडवत विनंती. येथील कुशल चैत्र शुध्ध चतुर्थी जाणोन स्वकीये स्वानंदवैभवादिलेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. बहुता दिवसी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कृपा करून पत्र पाठविले तें उतम समई प्रविष्ट जाले. लेखनार्थश्रवणे परम संतोष जाहाला. याच अन्वये सदैव पत्रद्वारे सांभाल केला पाहिजे. यानंतर पत्री आज्ञा की, राजश्री विस्वासराव याचा वृतबंध चैत्र शुध्ध द्वितीयेस आहे; तरी उस्छाहास येऊन मंडप शोभिवंत करणे. अशास, लक्ष प्रकारे आम्ही येतो परंतु वृतबंधाची तीथ जालियावरी पत्र पावले, यास्तव अंतर पडिले. येरवी अवश्यमेव येतो. पूर्वीपासून आम्ही आपल्या पदरीचेच आहो, तेथे विशेष काये लिहिणे? कृपा असों दिल्ही पाहिजे हे विनंती.

श्रीशिवचरणीं
दृढभाव संभाजीसुत
उदाजी पवारराव.

¶Udaji Pawar most humbly acknowledges the invitation from the Peshwa to attend the thread-ceremony of Vishwasrao. He, however, received it after the date of celebration.

No. 43] [*24-1-1752*

श्री

राजश्री विस्वासराऊ गोसांवी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्यें श्रो मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयेकुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण कुंकुममंडित पत्रे पाठविले, राजश्री माधवराऊ यांचा वृतबंध फाल्गुन सुध्ध येकादसींस योजिला आहे म्हणोन लेहून पाठविलें त्याजवरून येथून सिस्टाचाराचा सिधसहवर्तमान राजश्री रामाजी अनंत सरसबनीस यांची रवानगी करून

श्री०
शाहुकार्यधुरधर्नु,
कान्होजीतनुजन्मना
मुद्रावजारतमावस्यस्यत
सिन्हस्य राजीते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाठविले आहेत. सविस्तर सांगता कलो येईल. वस्त्रांची यादीदास्त आलाहिदा असे त्यावरून कलेल. रा छ १७ माहे रौवल बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶Manaji Angria sends dress of honour to Vishwasrao on the occasion of the thread-ceremony of Madhaorao.

No. 44] *[4-2-1752*

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे कृतानेक विज्ञापना. ता छ २८ माहे रबिलौवल पावेतो सेवकाचे व मामले मारचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, व्रतबंधाचे सामान बाकी राहिले ते पाठवणे. भोपले, कोहले, दाल मुगाची, दाल उडदाची, पोहे, येणेप्रा पत्रदर्शनी पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास, पोहे दाहा मण रा केले आहेत. सेवेसी येऊन पोहचतील. व दाल मुगाची व उडदाची ४३॥१ आंबवणियासी जमा जाली आहे. तांदूल न्यावयासी गाडे येतील त्याजवर दाल न्यावयाची आज्ञा केली पाहिजे. वरकड राहिले सामान रा करावे; त्यास, मुलूक बेचिराख जाला यामुले माणूस मुलुकात भेटत नाही. त्याहिमधे तरतूद होता होईल त्याप्रो करून सेवेसी रा करितो. कोहले, भोपले तो किमपि मिलत नाही. त्याहिमधे तरतुदीस अंतर होणार नाही. जे मिलता मिलतील ते सेवेसी रवाना करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶Ranoji Balkavade requests the Peshwa to arrange to take away the grain brought at Ambvani intended for the thread-ceremony.

No. 45] *[1752*

श्री.

पुा श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विज्ञापना. आंबवणियाचे फडावर तांदूल वीस खंडीपर्यंत जमा जाले आहत, येविसी व्रतबंधसमई सेवेसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विनंती लिहिली होती. परंतु गाडे येऊन तांदूल गेले नाहीत. यास्तव स्वामीनी कृपालु होऊन गाडे रा॥ करून तांदूल नेवविले पाहिजेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to take away the rice bags from Ambvani collected for the thread-ceremony.*

No. 46]

श्री.

यादी स्मरणार्थ कलमें—

नवऱ्यामुली आठ वर्षांपासून दाहा वर्षेपर्यंत ऐश्या पाहाव्या. कोकणस्ताच्या अगर देशस्ताच्या याप्रो॥ तीन च्यार आणाव्या. १

स्वारी माघारी फिरली तर येऊ नये. स्वारी हिकडेच राहिल्यास लस्करांत मुली घेऊन यावे.

पेढगांवास लस्करचा मुकाम जाला होता. ती जागा नीट करून ठेवावी. कडबा लाकडे नारो आपाजीच्या विद्यमाने चौकसीने खरेदी करून ठेवावी. १

संभरपर्यंत छपरे दुपाखी सरंजाम सुधा तयार करून ठेवावी. १

(हा मजकूर लिहून खोडला आहे.)

¶*This is a list of marriageable girls, apparently brought for the Peshwa's inspection.*

No. 47]

श्री

तीर्थस्वरूप राजश्री पंतप्रधान स्वामी वडिलाचे

सेवेंसी

अपत्येंसमान नारों रामचंद्र सां॥ नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता॥ छ ५ जिल्कादपर्यंत येथास्थित असें विशेष. आपलें पत्र सादर जाहाले तेथें आज्ञा की, बुरूडकाम राजश्री स्वामीकडील लग्नास पाहिजे. येविसी राजश्री अंताजीपंत लिहितील त्याप्रो॥ बुरूडकाम पाठवणे म्हणोन आज्ञा. यैसियासी इकडें बुरूड नाहीत. येक दोंन का॥ नाणे येथे आहेत व येक बुरुड का॥ पौड येथें आहें. वरकड खालिसा गावी बुरूड नाहीत. बुरूड असते तरी आज्ञेप्रमाणें रवाना करितों. पौडास बुरूड आहे तो सिर्कियाकडे आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Ramchandra regrets his inability to send some articles of bamboo-work, required in connection with a wedding at Shahu's palace, as it was not available.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 48] *[16-3-1744*

श्री

राजमान्य राजश्री चितो अनत कमा-
वीसदार पा धुळकोट सोरेगाऊ गो-
सावी यांसी.

सेवक सदासिव चिमणाजी नमस्कार * * *. (सु)हूर सन आर्बा आर्बैन मयां अलफ. चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यांचे लग्न वैशाखमांसी आहे. तरी गंगेरी पाने सुमार ५०००० पंनास हजार, बैलावरी घालून, बा माणसे देऊन, मार्गी निगेनिसी, वैशाख शुध्ध प्रतिपदेस पुण्यास येऊन पोहचत, यैसी पाठऊन देणें. या कामास सुस्ती जालिया मुलाहिजा होणार नाहीं. हे पष्ट जाणोन लिहिल्याप्रमाणें पानें येथें पावत तें करणें. जाणिजे छ १२ सफर.

लेखन
सीमा.

¶*Sadashivrao orders the Kamavisdar of Dhulkot to send 50,000 betal leaves for the marriage ceremony of Janardan.*

No. 49] *[2-5-1750*

श्रीवरद

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचें सेवेसीं.

विनंती सेवक मल्हार गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञप्ति; येथील कुशल वैशाख बहुल प्रतिपदा आपलें प्रतापेकरून येथास्तित असें विशेष. कृपा करून लग्नचिटी पाठविलीं. श्रीमंत राजश्री विस्वासराऊ यांचे लग्नसमारंभास येणें म्हणऊन आज्ञा केली, तेणें करून बहुत संतोष जाला. दर्शनाचा लाभ होईल तो सुदीन आम्हांस आहे, येंतद्विषई विस्तार काय लिंहावा? बहुत काय लिहिणें? कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Malhar Govind acknowledges to Nanasaheb the receipt of an invitation for the marriage of Vishwasrao.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 50]

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक जनार्दन बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ कार्तिक वद्य त्रयोदशीपावेतों स्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. चिरंजीव बालाचे लग्न मार्गसीर्ष शुध अष्टमीस योजिलें आहे. शरीरसंमंध राजश्री विस्णुपंत गदरे यांची कन्या नेमस्त केली आहे. कार्य सिधी पावविणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Ballal informs the Peshwa of the forthcoming marriage of his son Bal (Nana Fadnis) with the daughter of Vishnupant Gadre.*

No. 51] [*8-2-1758* ?

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार ता॥ छ २८ जमादिलावल पर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. चिरजीव गोविंदरायाच्या[1] कन्येचे लग्न माघ वद्य प्रतिपदेस नेमस्त केले आहे तरी राजश्री नाना[2] व आबा[2] व कृष्णराव[3] व नारो आपाजी[4] व महिपतराव[5] यास लग्नास यावयाविसी कृपा करून आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Jivaji Ganesh (Khasgivale) requests the Peshwa to allow the Purandares and Parasnis and Naro Appaji and Mahipatrao Chitnis to attend the marriage of Govindrao's daughter.*

No. 52] [*1761* ?

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री महिपतरावजी गोसावी
यांसी

श्री॥ बाजीराव हरी कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे. विशेष चिरंजीव आनंदरावाचे लग्न

---

१ खासगीवाले. २ पुरंदरे. ३ पारसनीस. ४ तुळशीबागवाले ५ पानसे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वैशाख वद्ये दशमी नेमस्त केले आहे. शरीरसंमध राजश्री येशवंतराव पोतेनीस दिा राजश्री जानबा निंबालकर यासी केला आहे. लग्नाकरिता करमलियासी जावे लागते; तर आपण सहपरिवारे लग्नास येऊन मंडप शोभिवंत केला पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Baji Hari Subhedar Supekar (Deshastha Brahman) sends invitation to Mahipatrao Chitnis for the marriage of Anandrao (Gopal ?). Baji Hari died at Panipat.*

No. 53]

श्री

श्रीमंत् राजश्री माहादाजीपंत
बाबा स्वामीचे सेवेसी

पो शामराऊ अंबाजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १० मोहरमपर्येंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. सासवडास जाऊन लग्नाचे साहित्य उतम प्रकारें करणे म्हणून आपलें पत्र आले. त्यावरून सासवडास अलो. लग्नाचे साहित्य उतम प्रकारे जालें. लग्न सिधीस गेलें. समारंभ उतम जाला. पुणाहून ब्राह्मण काली च्यार पांच हजार आले. त्याचे साहित्य भोजनाचे काली उतम जाले. आजी द्याकार त्यास जाला. सोयरे कालीच गेलें. उदैक गांवकरी याचें जेवण होणार आहे. ते जाले म्हणजे आमचा गुंता येथील उरकला. याउपरी स्वामीची आज्ञा येईल त्याप्रा। वर्तणूक करून. बहुत काय लिहिणे, कृपा आसो दीजे, हे विनंती.

¶*Shamrav Ambaji writes to Mahadajipant Baba about a marriage ceremony, celebrated at Saswad, on which occasion about five thousand Brahmins from Poona were treated to a grand feast.*

No. 54]

श्री

श्रियांसह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत भाद्रपद वद्य त्रितीया पावेतो जाणून स्वकीये लेखन करणे विशेष. पत्र पाठविले ते पावले. यात्रेचा मजकूर लिहिला तो कलला. चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस अष्टमांगल्याकरिता घेऊन येणे, सवेच घेऊन जावे, यैसे कितेक प्रकारे लिहिले. ऐशास, अष्टम मास लागला; आता घेऊन यावे तो मार्गी नद्या; प्रजन्य तिकडे फार पडतो. याजकरिता, येथे येऊन मागती फिरोन यावें यैसे अनकूल पडत नाही. याजकरिता, चिरंजीव सदोबास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठऊन देणे. सहंस्कार करून फिरोन तुम्हाजवल येतील. तुम्ही तेथें असतां राजकारभार चिरंजीवावर आहे यसे नाही. काम कारभार तों तुम्ही करीतच आहा. तरी तुम्ही राजेश्रीपासी आज्ञा मागोन निरोप देवणे. कदाचित तुम्हास माहाराजास हटकावयासी भीड वाटत असेल तरी आमचे नावे सौभाग्यवती थोरले राणीस पत्र लिहून द्यावे. येथून आम्ही पाठविले आहे म्हणौन सांगावे. पत्रात तेरीख च्यार दिवस मागी(ल) घालावी आणि पत्र द्यावे. निरोप घेऊन पाठवणे. फिरोन मागती विजयादसमीस सातारियास येतील अष्टमांगल्य करून. तुम्ही सदोवास वडील असता काये चिंता आहे ? त्याचे सर्व गोष्टीनी कौतुक तुम्ही करावे. तरी चिरंजीवास अगत्य पाठऊन देणे. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

¶Radhabai writes to Nanasaheb to send Sadashivrao Bhau to Poona for the ceremony (Ashthamangalya) as she could not send his wife Umabai to Satara owing to her advanced pregnancy. Permission may be sought from the King or the senior Queen to whom a letter may be delivered as having been received from her (Radhabai).

No. 55] *[2-2-1749 ?*

श्रीशंकर

चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यासी रघुनाथ बाजीराव अशिर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. खंडाईत घोडा फेरला. आम्ही दुरून वर्तमान आइकतो तुम्ही आम्हांस न लिहिलें म्हणोन सविस्तर लिहिले. त्यास खंडाईत फेरला व अरास पळवला देखील. मीहि याचसाठीं न लिहिलें. येथें नाना म्हणतील कीं फुशारकीच्या गोष्टी लिहितात. यास्तवच न लिहिले. तुम्ही लिहिला तो भाव यथार्थच आहे. वरकड सिकारीचे वगैरे मजकूर भेटीनंतर सांगूं. ल्याहावेसें नाहीत. बहुत काय लिहिणे? महंमदहुसेन याची व ढोल्याची झोंबी लावावी. आज नानापासी मी बोललो की महंमद हुसेन पाडील त्यास तीर्थरूप राजश्री भाऊस सांगून झोंबी लाऊन कोण पाडतो कसे होते ते सविस्तर ल्याहावें. सत्वर झोंबी लाववावी. तीर्थरूपास कागद वाचून दाखवून लवकर लाऊन कसे होते ते लिहिणें. जाणिजे छ २४ सफर हे आशीर्वाद+

¶Raghunathrao to his brother Janardan. Letter evinces what a keen horseman young Raghunath was even when a boy of mere fifteen.

+ जनार्दन बाजीरावास वडील बंधु रघुनाथरावाचें पत्र. जनार्दनपंत ता. २१-९-१७४९ रोजीं १४ वर्षें वयाचा वारला. त्या वेळीं रघुनाथरावाचें वय १५ वर्षाचें. या पत्रांत पेशव्यांचे लहानपणचे व्यवसाय दिसतात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 56]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे
सवेसी

विनंती सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ १२ सवाल-पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीनी गणेश पर्वताचे चित्राची आज्ञा केली होती ते तयार करून पाठविलें आहे. देवसभेच्या चित्राची आज्ञा होती त्यावरून गणेशपर्वताचे चित्र जाल्यावर त्याचे काम लाविले होते. त्यास स्वामीनी लिहिले की त्याचा निमोना पाठउन देणे. त्यावरून देवसभेच्या चित्राचा निमोना पाठविला आहे. त्याचे कारेगार आहेत त्यास कोणत्या कामावर लावावे ते आज्ञा केली पाहिजे. तिघां कारगारानी चित्र तयार केले. राघो व तान्हाजी चितारी व अनुपराव तिघेजणहि उतम कारगार चित्र तातडीनें तयार केले. बारीक कामाची मेहनत बहुत आहे. चित्र उतम काढिले आहे. स्वामीस पसंद जालियावर पुढे आज्ञा होईल त्याप्रा। वर्तणूक करितील. हे कारेगार भस्म्याचे काम व रोगणी रंगाचे व अर्गज्याचे काम व चित्रांचे इमारतीच्या च्यारी कामे करितात. केवल येकच काम करून बसावयाचे नव्हेत. सेवेसी विदित आसावे याजकरिता लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh Khasgiwale to the Peshwa about the paintings that were finished as per orders from the Peshwa.*

No. 57]

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वमीचे सेवेसी

विनंती. सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १ रबिलावलपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. चित्रांची दफ्तनी[1] तयार जाली म्हणौन पूर्वी सेवेसी विनंती लिहिली होती, तिचे उतर न आले याजकरिता प्रस्तुत सेवेसी लिहिले असे. आज्ञा होईल तरी दफ्तनी पाठऊन देऊं. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh asks for orders from the Peshwa regarding the pictures that he had collected.*

---

1 Bundle.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 58]

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २९ सवाल मुा सागर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं, गुलाबपाण्याचे प्रयोजन आहे. तरी दोन मण ब्राम्हणोदक श्रीभागिरथीचे उदकाचें करऊन ब्राम्हणांसमागमे पाठवणें म्हणोन. यैशियास, आज्ञेप्रो गुलाब करविला आहे. मागाहून पाठऊन देऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Govind from Bundelkhand informs the Peshwa that, as directed, he has prepared the rose-water which would shortly be sent to him.*

No. 59]

श्री.

सेवेसी जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंत राजश्री नाना स्वामीकडे गुलाबाची फुले पाठवावयास बाबूराव सिंदे याचें रावताची डांक बसविली आहे; त्यास मागाहून कारकून व कोठे कोठे डांक बसली आहे त्याची याद पाठविली जाईल; फुले पाठवित जाणे म्हणोन स्वामीनी आज्ञा केली होती. त्यास, अद्यापि कारकून येथे त्याचा आला नाही. डाक बसली न बसली कलत नाही. तरी येविसीं आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter refers to the arrangements made for the daily despatch of roses to the Peshwa.*

No. 60]

श्री

पुरवणी राजश्री अंताजी नारायेण

स्वामी गोसावियांसी

विनंती उपरी. सुप्याचे बागात वाला नाही. आंबीचे बागातील अदसेर वाला व येथील बागातील सासातसेर वाला निघाला आहे. त्याचे पडदे व पंखे काय जे होतील ते करऊन पाठवितो म्हणौन लिहिले ते कलले. यैशास वाला तेथे सापडला आहे त्याचे पडदे व पंखे होतील ते तयार करून पाठवणे व भेलशाचे स्वारीचे पंखे व पडदे जे वाल्याचे असतील ते कुल पाठऊन देणे. जाणिजे. रा। छ १२ सफर हे विनंति.

¶*Antaji Narayan is asked to prepare and send fans of* Vala *(a fragrant shrub) and also those fans which were received from the Bhelsa expedition.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 61] [*1740-41*

छ २९ मोहरम

श्री

राजश्रियांविराजित राजमान्य राजश्री अंताजी
नारायेण स्वामी गोसांवी यासी

पोष्य बालाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. चिकाचे पडदे थोर व लाहान करावयाविषई पूर्वी लेहून पाठविलें होतें, त्यावरून तयार केलेच असतील. त्यापैकीं तीन पडदे थोर पाहून पाठऊन देणें. जाणिजे. रा छ २८ मोहरम. राउताची डाक बसविली आहे, याजबराबर फुले बागेपैकीं दररोज पाठवीत जाणें. लौकर येथें येऊन पोंहचत ऐसी डाकेचे राउतास ताकीद करणें. वाल्याचे पडदे दोन पाठवणे व अणखी वाला आणून दोनतीन पंखे उतम करून पाठवणे. छ २८ मोहरम. हे विनंती.

¶*The Peshwa asks Antaji Narayan Phadnis to send some curtains and fans made of fragrant grass. He further expresses his desire that flowers should be sent to him daily with the postal-runners.*

No. 62]

छ २३ शाबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना
ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आरल्याच्या बागात काय काय फुलझाडे लाविली ते लिहिणे म्हणून आज्ञा. त्यास जाई व मोगर, शेवंती, जासुदीची झाडे; याप्रमाणे आरल्याच्या बागांत लाविली. नुन्याच्या बागात साखरनिंबे व नारगे व पेरू येणेप्रमाणे लाविले. धावडसीच्या बागपैकी लाहान गुलाबी जाबाची रोपे आसली तर पाटीमधे घालून माफजतीने पाठवणे आगर कुडाल्यात घालून पाठऊन देणे म्हणून आज्ञा. त्यास धावडसीस माणूस पाठऊन गुलाबी जाबाची रोपे आणून लिहिल्याप्रमाणे पाठवितो. पेरूची रोपेहि पंचवीस नुन्यात लाविली. वरच्यावर कलमे आणून लावणी होतच आहे. हे विज्ञापना.

¶*Nana Purandare submits to the Peshwa a list of flower-trees and creepers in the various gardens round about Satara.*

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 63]

छ १९ रजब

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीची आज्ञापत्रे पाच सात आलीं की दिलीतील गाणार नाचणार चांगली पाच सात हजार खर्च जाला तरी करून घेऊन येणे. त्यावरून प्रेत्न करून दोन ताफे आणिले आहेत. पसंद पडतील तेव्हां प्रमाण. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer informs that two singing parties have been brought from Delhi as per orders.*

No. 64]

श्री

सेवेसी जिवाजी गणेश सास्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २९ सफर वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री नारो शंकर याणी सिरोंजेहून तिघी पोरी पाठविल्या आहेत म्हणोन वर्तमान कलले. त्यास तूर्त येथे नाइकाच्या वाड्यांत ठेविल्या आहेत. त्याजबराबर सिवाजी गायेकवाड व भगवानदास ऐसे दिल्हे आहेत. श्रीमंतास पत्रे त्याची आहेत. त्यास येथे ठेवावे किंवा काये? कोण स्थली ठेवावे येविसी काये आज्ञा ते केली पाहिजे. श्रीमंताकडे पत्रें रवाना करावयाची असिली तरी आज्ञा करावी. पाठऊन देऊ. अथवा स्वामीकडे रवाना करू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh seeks orders from the addressee as to where he should keep the three dancing girls sent, presumably, for the Peshwa's entertainment by Naro Shankar from Sironj.*

No. 65]

श्री

जयापा देसाई प्रात नरगुद यासी पत्र की तुम्ही सरकारात फिर्गी वीणा व उतम जातीच्या बायका दोन पाठविल्या त्या प्रविष्ट जाहाल्या म्हणून पत्र लिहून दिल्हे म्हणजे मी येथे सिका करऊन रवाना करीन. ज्या बरोबरी हा जिनस आला त्याचे नाव लिहिणे या प्रा श्रीमताची आज्ञा जाहली आहे.

¶*The writer on behalf of the Peshwa acknowledges the receipt of a foreign guitar and two dancing girls (of the best type).*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 66]

श्री

तीर्थरूप राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

अपत्ये कृष्णाजी गोविंद गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ता॥ छ १४ रजबूपावेतो सुखे असे विशेष. पुण्यांत प्रस्तुत हाती आहेत ता॥

नर	हतिणी
१ फतेलस्कर: मस्त.	१ आंधली हातीण.
१ फतेजंग: मस्त.	१ कोकिला बा॥ कृष्णराव.
१ रुस्तुम गज: मस्त.	१ तख्तरावा हतीण बा॥ राणबा.
१ वेकटपंती: नंवा.	१ बचेवाली बा॥ नरसिंगराव विठल.
१ माहासुंदर.	१ सिसफूल बची बा॥ नरसिंगराव
१ कृष्णगज.	५
१ बालसुंदर.	
१ ममोक.	
१ फते मुबारक.	
१ कुवरगज.	
१०	

येणे (प्र)माणे आहेत. त्यामधी रुस्तम गजाचे मस्तीचा जोहर फारच चांगला दिसतो. वरकड फतेलस्कर व फतेजग हे तो सर्वदा मस्तच असतात विदित जाहले पाहिजे. हाली वेकटपंतीस पेडोल लावावयासी मौजे हडपसर येथे घेतला आहे. येका दो दिवसा लावितील. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Krishnaji Govind Gore submits to the Peshwa a list of state elephants in Poona and further adds that some of them are in rut.*

No. 67]

श्री

सेवेसी विज्ञापना. जठार राजश्री सटवोजी जाधवराऊ याजकडे आहेत. त्याजपासून घोडी कर्डी, दुवेद[1] आहे, आमची चंद्रभागा घोडी होती तिजयेवढी

---

१ दुवेत; दोनदा व्यालेली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे, घोडी थोर आणि कोवली आहे, ते साडे सतरासे रुपयास खरिदी हुजूर पागेस करून आम्ही आपणास बसावयासी ठेविली आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Nana Purandare writes to the Peshwa that he has purchased a fine mare for Rs. 1,750 from Satwaji Jadhavrav.*

No. 68]

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक सिदो उधव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ २२ जिलकाद स्वामीच्या कृपादृष्टीकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून सांभालपत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, राजहंस, चंदन, सुग्रीव ताजे जाहाले आहेत आणि होतहि आहेत. परंतु सुग्रीवावर बसावयासी कोणाचे मर्जीस येत नाहीं. यास्तव तेथेच न्यावा. त्यावरून श्रीमंत राजश्री नाना स्वामीस विनंती करून हुसेनभाई तेथें पाठऊन देणे म्हणोन आज्ञा जाहली आहे. त्यासी उदैक सेवेसी पाठऊन देऊं. त्याज-समागमे सुग्रीवास पाठवावा. राजहंस व खंडाईत आपण व श्रीमंत राजश्री दादानी फेरावे म्हणोन श्रीमंतानी सांगितले आहे. तेथे स्वारीत दोन घोड्या व येक घोडा यैसी तीन आली. त्यापैकी बोर घोडी गाढवेबाबत आहे. ते गंगेपेक्षा कांही सरस आहे. परतु आलड आहे. जर्दी धायेगुड्याबाा आहे. ते सिंगी आहे. उतम होईल. निला रोहीक बाबत तुरकी आहे. सेवेसी कलावे. यानंतर येथे खास जीन व खोगरे वगैरा सामान आणविले आहे. त्यासी कामाठी द्यावयाची आज्ञा करून, सत्वर रवानगी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Sidho Udhao to Bhausaheb discussing the qualities of some of the horses in the stables of the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 69] [*20-11-1760*

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य रा लक्षुमण
कोनेर स्वामी गोसावी यांसी

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशष. हेणम गाईचे प्रयोजन हुजूर आहे. तर हणम गाई तरण्या देखण्या चांगल्या ५०० पाचसे पत्र पावताच पाठऊन देणे. विलंब न लावणे. जाणिजे छ ११ रालाखर सुा ईहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders Laxman Koner to send immediately five hundred cows of excellent breed.*

No. 70] [*8-8-1749*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वमीचे सेवेसी

विनंती. सेवक लक्ष्मण शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वृत ता अधिक भाद्रपद शुा ६ मुा वरणगांव प्रा खानदेश. स्वामीच्या कृपाकटाक्षेकरून येथास्थित आसे विशेष. कुत्र्याच्या जोड्या ताजी व लूत दो जातीच्या दाहा बारा दोही राजाकडून प्रयेत्नपूर्वक मागून घेऊन पाठवणें; माहाराज राजश्री स्वामीस द्यावयासी पाहिजेत, म्हणौन मुजरद कासीदजोडी बराबरी आज्ञापत्र आलें तें बऱ्हाणपुरायैलीकडे येक मजलीवरी पावोन बहुत समाधान जाहलें. आज्ञेप्रमाणें उभयेता राजे बुंधेले यास व आवंतर येक दोन मातबरी स्थलीं लेहून मुजरद माणसे पाठविलीं आहेत. कुत्र्याच्या जोड्या आल्यानंतर सेवेसी प्रविष्ट होतील. आम्ही सत्वरच सेवेसी येऊन पोंहचतों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa had written to Laxman Shankar to send about 24 dogs of good breed as they were required to be presented to Shahu. Laxman Shankar replies that he is trying his best to procure the dogs and hopes to send them soon.*

---

१ मोठाड; लांब व सरळ शिंगाच्या.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 71] [*31-12-1742*

राजमंडळ रोजकीर्द.

स्वारी राजश्री पंत प्रधान सुा सलास अर्बैन मया व अलफ
छ १४ जिल्काद.

कुत्री रवाना सातारा तसलमात कुतेवान सुमार

२ गोपड कुतेवान सबज जोडा १

२ आली कुतेवान
  १ कुत्री सबज.
  १ कुत्रा सबज.
  —
  २

२ सीतर
  १ कुत्रा हिरा
  १ कुत्री पसमी
  —
  २

२ बसंता.
  १ अबलख कुत्री
  १ अबलख कुत्रा.
  —
  २

२ बंटा कुतेवान.
  १ कुतरा पसमी.
  १ कुत्री पसमी.

२ बंधु कुतेवान.
  १ कुत्री अबलख.
  १ कुत्रा भवार.

२ मिठू
  १ कुत्री अबलख.
  १ कुत्रा अबलख.
  ——
  १४.

श्री

¶*This is a list of dogs of the King at Satara in 1742.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 72]

श्री

पुा राजश्री अंताजी नारायेण स्वामी गोसावी यासी विनंती उपरी. हरणाच्या झुली बादलीच्या सुमार २ दोन व मोहरकिया रुपियाच्या २ दोन जुन्या सिलकी जामदारखानियांत आहेत त्या पाठवणें. या खेरीज शाला उणाख[1] जोड्या साठ आखापासू (न) शंभर आख पावेतों व जुन्या शाला कसर लागलेल्या जामदारखान्यांत होत्या त्यास रफू केलेल्या त्याप्रो उणाख व मध्यम शालजोड्या पाहून निवडून पनास जोड्या पावेतो पाठऊन देणें. हे विनती.

¶*Antaji Narayan is asked to send, among other things, a pair of body-cloths for the deer.*

No. 73] [*29-9-1758*

पौ छ २७ मोहरम उर्फ
भाद्रपद सन तिसा

श्री.

श्रीमंत् राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मुधोजी भोसले हवालदार व कारकून किले चंदनगड कृतानेक दंडवत व अनुक्रमे साष्टांग नमस्कार विज्ञापना. सुहूर सन तिसां खमसैन मयां आलफ ताा छ २९ मोहरम पावेतों किले मजकूरचें व सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विज्ञापना यैसीजे, स्वामीचें आज्ञापत्र सादर जालें तेथे आज्ञा जे, किले मजकुरी खबुतरें चांगली तऱ्हेतऱ्हेची आहेत ती पाठऊन देणे म्हणऊन आज्ञा. त्यास, माहाराज कैलासवासी स्वामीनी किलां खबुतरे ठेविली होतीं. त्यास, किल्यावरी मोरेंग्याचा[2] उपद्रव फार व बारा बहुत याजकरिता माहाराजांचे आज्ञेनें किल्याखालें गडकरी याचे वाडीस ठेविली होती, ती दीडसे जोडी जाहली होती. त्यांतून माहाराजानें खेडच्या मुकामी चांगली खबुतरें निवडून सेंभर जोडी घेतली. बाकी पनास जोडी राहिली ती वाडीस ठेविलीं होती. त्यास अलीकडे राजश्री दमाजी गायेकवाड सातारियास

---

१ हलक्या प्रतीच्या.

२ मोरांगी, धारीची एक जात.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गेले. त्यांचे पाठीवर राजश्री त्रिंबकराव नाना होते. त्या दंग्यांत वाडी वाटेवरी होती ते लुटली गेली. ते समई खबुतरें दंग्यांत गेली. खबुतरें असती तरी आज्ञेप्रमाणें सेवेसी रवाना करितों. आहे वर्तमान सेवेसी विज्ञापना लिहिली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

[शिक्का अस्पष्ट.]

हे विज्ञापना.

¶*The Havaldar of fort Chandan regrets that, as desired by the Peshwa, he is unable to send the pigeons of different varieties as all of them were lost in the trouble caused by Damaji Gaikwad's march on Satara.*

No. 74]

श्री

तीर्थरूप श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

आपत्ये राणोजी शिंदे चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत विज्ञापना. ता छ २ सवाल पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ २७ रमजानचे सादर जाले तेथें आज्ञा की आलेगावचे पागेस खबुतरें आहेत त्यापैकी २५ जोडे चांगले रंगील पाहून पाठवणे म्हणून; त्यास आज्ञेप्रमाणे येथें खबुतरें आहेत त्यांतून चांगली पाहून पंचवीस जोडे पाठविले आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia sends to Bhausaheb some 25 pairs of good pigeons.*

No. 75]

श्री

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे शेवेसी

अपत्ये त्रिंबक सदासिव कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १० रौवल पावेतो कुशल असो विशेष. येथे कबुतरे होती त्यांची आबाल होऊ लागली, यास्तव सेवेसी पाठविली आहेत. तरी आज्ञा करून गजात घालावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv is sending to Bhausaheb some pigeons from Satara.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 76]

श्री

राजश्री सदाशिवपंत भाऊ
गोसांवी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हास बालगावयास बदकाच्या जोड्या दोन सरकारातून पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. तल्यात सोडून. विदित होये. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhavrav requests Bhausaheb that two pairs of ducks should be ordered to be given to him.*

No. 77]

भाई बालाजी पंडत नाना
दाम मोहबतहूं

ऽ मेहरबान दोस्तां बादज शौकमुलाकात मशहुद आंकी येथील खैरसला जाणून आपली खैरखुशी हमेशा कलमी करून दिल ताजा करीत जाणे. दिगर बहिरीविशई आज्ञा केली होती त्यास बाहिरी दोन पाठविले आहेत, ते पोहचतील. वरकड जे ज्यानवरे सिकारी आम्हापासी आहेत ते आवघी आपलीच आहेत. सर्व प्रकारे आम्ही आपले असो. हरयेकविशी मेहरबानगी करीत असिले पाहिजे. कितेक वर्तमान रघुनाथरायाजी जबानी निवेदन करतील, त्याजवरून विदित होईल. ज्यादा काये लिहिणे; प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

¶*As desired by the Peshwa, two falcons are sent to him.*

No. 78]

श्री

तीर्थरूप मातुश्री राधाबाई
वडिलांचे शेवेसी

अपत्येंसमान संभाजी जाधव दंडवत विनंती उपरी. येथील जाणून स्वकीये लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. वडिलीं पत्र पाठविले व आदिपर्व पुस्तक पाठविले ते पावलें. दोन पर्वे राहिलीं ते पंधरा दिवसां पाठवितों म्हणून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लिा तरी बरें; श्रवण करून सावकाश पाठविलीं पाहिजेत. आणखी पर्वे लागतील ते आज्ञा करावी. पाठऊन देऊन. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे+ विनती.

¶*Sambhaji Jadhav writes to Radhabai, the Peshwa's grandmother, acknowledging the receipt of the Book "Adiparva."*

No. 79] [पौ *6-4-1758*

पौ छ २७ रजब सुा समान खमसैन

मया अलफ

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. आज्ञापत्र सांडणीस्वाराबरोबर आले तेथे आज्ञा कीं ब्राह्मवैवर्तपुराण तलास करून पाठवणे. त्यावरून शोध केला. तों येक पुस्तक आहे तें आमचे हातास न येसे आहे. व दुसरे तलास करिता येक ब्राह्मण याचे घरीं दोन औषं निघाले. येक औश आवसिष्ट आहे तो त्याने कोणास दिल्हा आहे तो ब्राह्मण श्रीत्र्यंबकेश्वरीच आहे. आज्ञा जाली तरी त्यास येथे बोलाऊन त्रितीय औशहि तलास करून पाठऊ. पाठविले पुस्तक त्यातच चरितार्थ जाला तरी कार्यासिध्दि जालिया पुस्तक पाठऊन द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत रो दादासाहेबाकडील पत्रे आली आहेत ती समक्ष प्रविष्ट करू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Shankar promises to send the Peshwa a copy of Brahma Vaivarta Purana.*

No. 80]

श्री

श्रीमंत राजश्री दादा
साहेबाचे शेवेसी

विनंती. शेवक बालाजी गोविंद मोडक च्यरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता श्रावण वद्य नवमीपरियेंत यथास्तित असे. यानंतर स्वामीनी यादी लस्करातून पोथ्या आणावयाच्या पाठविल्या त्याप्रमाणे सर्व पोथ्या पाठविल्या व श्रीमंत् राजश्री भाऊसाहेबीहि पोथ्या पाठविल्या आहेत

+ येथून पुढील मजकूर खाशाच्या हातचा, बालबोधींत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याच्या यादी व आमच्या यादी यैशा चित्राचे पोथीमध्ये घातल्या आहेत, त्यावरून सकल अर्थ निवेदन होतील. वरकडहि कागद त्याजमध्येच असेत तेहि पावतील. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Govind Modak writes to Raghoba, in camp, that he has despatched the books (manuscripts) as per his list.*

No. 81]

पो छ ८ जावल

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पुणेयाहून रामायणाची पोथी प्रती करावयासी आणविली होती. त्यास श्रीमाहुलीस ब्राह्मणास वाचावयासी दिल्ही आहे. आली म्हणजे पाठऊन देऊ. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Preparation of more copies of the manuscript of "Râmâyana" is referred to in this paper.*

No. 82]

श्री.

पुा राजश्री अंताजी नारायेण
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी : समश्लोकी गीतेची टीका वामनी जामदारखानियात आहे; तरी तिचा शोध करून पाठऊन देणे. टीका गीतेसहवर्तमान आहे. जाणिजे, छ ६ सफर हे विनंती.

¶*Antaji Narayan is asked to send the Gita with a metrical translation.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 83] [*1750 ?*

श्री

पुरवणी राजश्री अंताजी नारायेण
स्वामी गोसावी यांसी

विनंति उपरी. पद्मपुराणाचे पत्राचा झाडा रा॥ कृष्णाजी विस्वनाथ यांणी सांगितला. पत्रें

२४७ सरकारांत. श्रृष्टीखंड
२४३ राजश्री महादाजीपंत याजकडे

४९०

येणे प्रमाणे पत्रे आहेत. खंडे किती आहेत हे कलत नाहीं म्हणौन सांगितले तो मजकूर तुम्ही लेहून पाठविला तो कलला. यैशा आमाणापंत लेखक याजवल प्रति त्याहावयासी पद्मपुराणाची पत्रे दिली आहेत ती किती आहेत व खंड कोणते ते मनास आणून लेहून पाठवणे. जाणिजे. रवाना छ १२ सफर हे विनती.

¶*Antaji Narayan Phadnis is asked to explain how many pages and chapters of the Padmapuran were given for copying.*

No. 84] [*1750 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव राम
स्वामी गोसावियासी

पो सदासिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले व पोथ्या पाठविल्या त्या पावल्या. माहाभारताचे पोथ्यांपो विराटपर्व चिरंजीव राजश्री विश्वासराव याजवल आहे म्हणून लिहिले परंतु मना आणिता येथे त्याजपासी नाहीं. आम्हाकडेहि नाही. यास्तव त्याचा शोध करून कोणी येईल त्याजबरोबर मजबुदीने बांधून पाठविणे. वरकड मागाहून ज्योतिर्निधाची पोथी व सरकारची नारायेण भटीची पोथी पाठऊन देणें. नारायेणभटी वानवडीचे मुकामी आम्ही आणविली परंतु येथे आली नाही. सदासिव पालद्यास आणू(न) पोथ्याचे ठिकाण लाऊन पाठऊन देणें. हरिवंशाची तीस पत्रें तीर्थस्वरूप राजश्री नानासाहेबासमागमे आहेत ती पुणियास येतील, आलियाउपरी तीं तीस पत्रें विराटपर्वाचे पोथीत बाधून पाठवणें. वरकड पोथ्या आल्याची याद अलाहिदा आहे त्यांवरून कलेल. विज्ञानेश्वराचे पुस्तक पो॥ येक आध्या(य) येथे तुम्ही पाठविला तो पावला. दोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहिला त्यांचा शोध सदासिव माहा(दे)व पालंदे यास पुसोन ठि(का)णी लाऊन ते दोनी अध्याय पाठवणें. येथे आले नाहीं. तेथेंच शोध करणें. रा छ १९ रमजान बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Sadashivrao requests Baburao Phadnis to send immediately Viratparva and certain other books.*

No. 85] [*3-10-1746*

श्री

पुा राजश्री रामचंद्रबावा
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. दरबारचा मजकूर तर नवीन कांहीं लिहिजेसा नाहीं. राजश्री स्वामी दोही महालच्या कजियामुळें व दोहीकडील खर्चवेचाच्या तगादिया(मुळें) राजश्री स्वामीची मर्जी दिक आहे. आपला खानगी हिशेब किते व ऐवज मालवज तरता बुडता पहात असतांत. बंदोबस्त घरचा करावा ऐसे इच्छितात परंतु घडेल ते खरे. होईल मजकूर तो मागाहून लिहिला जाईल. आठादिवसाआड एकगोष्ट काढितात. निरंतर दिक दोही वाडियातील भीड मोडत नाहीं याजमुळें बंदोबस्त होत नाहीं. या गरीफदारीत सा महिने गेले आणखी किती दिवस जातील पाहावे. छ २८ रमजान हे विनंती.

¶*The letter describes how Shahu was in monetary difficulties on account of the extravagant expenses of his two queens.*

No. 86] [*1746-47*

श्री

पुरवणी राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. दरबारचा मजकूर तर जो आहे तोच आहे. दोही महालची बोलीचाली करून गुता उरकिला स्वछ्यता केली. राजश्री स्वामीचा गुता राहिला आहे. राजश्री स्वामीस लग्नामुळे व संसाराकृत्ये दोही माहालचे खर्च विशिष्ट वाढले तेणे करून कर्ज मबलग जाहले आहे. त्याचा परिहार जाला पाहिजे. आपले कर्ज तुम्हाविना वारील कोण? जे आहा ते तुम्हीच माझे आहा म्हणोन आम्हाजवळ एक वेळ बोलले. पुढे बोली आहेच. आम्ही कांही उत्तर प्रत्यो(त)र केले नाहीं. निरोपाची नेहटणी आम्ही केलियावर राजश्री स्वामी आपले कर्जाचा मजकूर

+ येथून हस्ताक्षर खुद्दांचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करतील त्यास तूर्त आम्ही स्वस्थचिते करून आहो. पुढे विचार कसकसा होतो तो पाहून कर्तव्य ते करून तुम्हासहि लेहून पाठऊन. नाईकाकडील कर्णाटकाबाबत पाच लाख यावे ते राहून उफराटे विष्णुपंताचे कर्ज त्याजकडे त्याजमुळे धाकटे वाड्यांतील पक्ष धरून नाइकाचे दारी चौकी बसविली. एक महिना चौकी होती. पहिल्याने दोन तीन उपासहि जाहले. अखेर अखेर राजश्रीनी थोरले वाड्याचे उपरोधामुळे त्या कर्जाचा हवाला आपण नाइकाकडून घेऊन विष्णुपंतास रुपये आम्हाकडील वगैरे दरमहाचे लोकाकडील ऐवज देविला. नाईक तो कर्जदार. दिवाळे निघणे जवळ दिवस आले ऐसे दिसते. याजमुळे सांप्रतचे हवाल्याचे रोहि राजश्रीचे आंगावर पडले याजमुळे दिक आहेत. दोही माहालचा नेहमी तनखा पाच सात लाख तोडून द्यावा. रोज उठोन बोलणे नसावें. बाई खानगी कारभार करितात. सारांश या कारभारातच गिरीफदार याजमुळे अर्ज करणे फावत नाही. केला तर जाबसाल ढालढकलीचा करितात. दसरापर्यंत तो परिछिन राहणे होईल ऐसे दिसते. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Nanasaheb describes how Shahu was much involved in debts on account of his marriage and other domestic expenses, and how he relied on the Peshwa for their repayment. He further writes that the King had posted guards at Babuji Naik's residence for the recovery of the dues to Vishnupant but removed them and himself stood surety on account of the intercession of the senior queen.*

No. 87] [*1747 ?*

पौ छ १८ साबान

श्रीशंकर

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ता
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीच्या समाचारास राजश्रीनी भिवजी लोढा व सेटी मु(ली)क पाठविले आहेत. सविस्तर वर्तमान नानाचे शरीर प्रकृतीचें व स्थितरीत तूर्त कसी आहे, कारभार विचार कसा काय आहे हे वर्तमान अणणे म्हणून हे दोघे स्वामीकडे पाठविले आहेत येऊन पोहचतील. भिवजी आपले मायेचा आहे यासी बोलणे चालणे ते बोलावे. इनाम काही देणे तो द्यावा. हे येथील चर्चा स्वामीची कसकसी होत होती हे सांगतील. आपणहि यासी बोलावे समाधान राखावे म्हणजे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हे उभयेता मग येथे राजश्रीजवल बाईजवल येथास्थित वर्तमान सांगतील म्हणजे राजश्रीस बाईस खरे वाटेल. नाना प्रकारच्या चर्चा यैकत होतो ह्या लटक्या होतील. कलले पा हे विज्ञापना.+

¶*Purandare's letter to Bhau and Nana, giving them previous warning of Shahu's confidential messengers going to Poona to find correct information about the Peshwa's conduct and habits.*

No. 88]

श्री दत्तात्रेय

विनंती उपरी. येथील कुशल ता। छ माहे जिल्काद मुकाम खेड जाणून स्वकीयें लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपणाकडून रा। भिकाजी प्रभु आले व त्यावरी येक दोनी पत्रें आली त्यावरून वर्तमान अवगत जाहलें. येथील वर्तमान तरी तीर्थरूप राजश्री बाबासाहेब[1] निरोप घेऊन इंदापुरास गेले. येजमानानी जाते-वेलेस बहुतसे समाधान केले. सरंजामाविसी तीर्थरूपाच्या गल्यावरी हात ठेविला. नव महिने तुम्ही रात्रंदिवस माझे देवढीस श्रम फार केले. तुम्हास सरंजाम देणे यात अतर नाही, सत्वर येणे येविसी बहुत बेजीदी[2] केली. अगावरील चौशाला[3] दोन जोडिया होत्या त्या कृपा करून अंगावरी टाकिल्या. तेव्हांच तीर्थरूप साहेबानी साडणीस्वार श्रीमंताकडे व आपणाकडे पत्रे देऊन रवाना केला होता. ती पत्रें पावली असतील व रा। मल्हारराव बाडें आणावयाविसीची पत्रें श्रीमंतास येजमानाचीं होती ती पावलींच असतील. त्यास बांडियांकडें कोणांची रवानगी केलीं की नाही हे आपण लिहिले नाहीं. त्यावरी दरबारचे वर्तमान (तर) राजश्री भिकाजी प्रभु खांमगावकरांस घेऊन आलें. धाकटे देवढीचा जफ्त कदाचित कमी होईल, प्रतिनिधी व प्रधान व आणिख कोणी येतील धरतील हा अर्थ चितांत आणून खांमगावकरास सा जण काव्याखाले मारावयासी लाविलें. दोघे पाटील मारून तहदम[4] केलें. राजश्री यशवंतरावजी[5] दिपवालीचे दिवसीं मुजऱ्यास आले, ते दिवसी नजर करून वरचेवर गेलें. आम्हीं विनंती करून वस्त्रें देविलीं. आता प्रत्यही एकदा त्रितीय प्रहरी आले तरी येतात. नाहीं तर अस्तमानी

+ (संदर्भ—म. वि. २, पृ. ११७, व भारतवर्ष पु. १ ले. ६४).

१ देवराव मेघश्याम. तीर्थरूप बाबासाहेब म्हणजे देवराव मेघश्याम लपाटे. विष्णुपंत व महादजी साळुंके हे कारभारी सगुणाबाईचे. श्रीदत्तात्रेय असें देवराव मेघश्याम व त्याचा बंधु लिहितो. नागोराव मेघश्याम याचा मुळगा बळवंतराव नागनाथ.

२ आग्रह. ३ ?

४ बेजार ? ५ पोतनीस.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दरबारचे समयी येतात. दरबारची मर्जी बहुत नाजुक जाली आहे. फार माणुस सोसत नाहीं. आमची मंडली आपा व मल्हारराऊ यैसें वाढवेल[1] टिकत नाहींत. त्यावरी राऊ व आम्हीं व सुकानद निरोप घेतो. मग बाई मात्र असती. प्रस्तुत बाई असिलीया कोणी बोलाविलियावेगलें अवर्जून जावें यैसे नाहीं. राजश्री उदाजी चवाण याजकडील कारकुनानी अर्ज केला होता की मुलें माणसें ठेवावयास येक स्थळ द्यावें म्हणजे आज्ञा घेऊं. त्यास उतर जाले कीं तुह्मी मातभपुरसीसीस[2] आलेंत, त्यामध्यें कारभाराचा मजकूर तुम्हीं करू नये आणि आम्ही बोलू नये. कारभारास येणें तर पुढे सुखरुप यावें. थोरलिया वाडियांत बाबासाहेब होते तो वर जातच होते. आगत्याआगत्य तेथील मार येथे करीत होतें. त्यावरी रा सुखानद जात होते. त्यासहि येजमान उपरोधीक बोलू लागले त्यावरून त्याणीहि जाणें येणें सोडिलेसें आलें. काली आम्हांस व रायांस वाडियातील सात आठ बोलावणीं जालीं. आपासुद्धां त्रिवर्ग गेलो. वाडियांत बहुतच प्रलाप केला. यावज्जन्माचा परोचा बोललीं. निदानी पचवीस लाख रुा माझे राज्यावरी आहेत. गुा दोन लक्ष रुा, सालमारचें साडेतीन लक्ष रुा ऐशा आम्ही वराता देत होतों त्या घेतल्या नाहींत. रुा रोकडें देणें. जे चिठ्या घेऊन कर्जवाम करून कारभार चालवीत होते ते गेले. आता मी चिठिया घेऊन काये करु व प्रतापगडास जावयाचा सिद्धांत करणें म्हणूनहि मातुश्रीची आज्ञा. दुसरे प्रतिनिधीकडील कायें खेडीपाडीं आहेत ते घ्या. माझी सिबंदीचा पैका द्या, व अंगरियाच्या मनसब्यास पाच लक्ष रुा बुडाले त्यापासून रुा यावा तो तुम्हीं सावत त्याजवरी पाठवून त्याचा नाश केला, तरी तो ऐवज द्यावा व हजाराचा ऐवज पाचा वरसांचा व येसूबाबा दरम्यान येऊन दोन लक्ष रुा कबूल केले यैसें अवघे मिलोन पचवीस लक्ष रुा राजेश्रीवरी केले. त्यास आम्ही त्रिवर्ग येऊन विनंती त्याणी सांगितली त्या प्रा केली. त्यास सिबंदीचा मजकूर झाला कीं काये निमित्य याणीं ठेविली ? ज्याची खेडी घेतली असतील तें तोडावरी देऊन घेतील. सिबंदी धाकटे वाडियाकरितां ठेविली होतीं हें मी जाणतों. अगऱ्याकडीलहि जाब तैसाच. वरकडहि जाब वारापाणी केलें. नेमणुकेचा तीन लक्ष पसतीस हजारचा ऐवज रास्ती द्यावा व येसूबाबाबाबत करार दोन लक्ष रास्ती द्यावे यैसे बोललें. दोन लक्षां वाट पहिलें दाभाडीचे ऐवजी केली. आणीकहि वरात

---

१ वाढोळ=फार वेळ, २ दुखवट्यास,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

द्यावी, नेमणुकेचा ऐवज त्याणी घेतला तरी बरें, नाहींतर रोख द्यावा. तेव्हां राव बोलले आम्ही रोख कोठून द्यावी ? दीड लक्ष पेशवे देत नाहीत. राजश्री प्रतिनिधीहि हिसेब करीत नाहीत. विठोबा नाईक दोन वरसे रुा देत नाहीत; तैसेच आहे. अद्याप दिल पेंचच आहेत * * धी नाही. लग्नाची योजना चितात फार आहे. विसोबा वैद्य पाठविलें आहेत. रा देवजी सिर्के यासी रवाना करावे आणि बावासाहेबाचा व रघोजीबावांची गाठी करारप्रा घालावी या कारभारास पाठविलें. त्यामध्यें देवजीबावास पाठवावयांची ताकीद फारच केली आहे. आणिख मोहिते घाटगे सोइरिका ठिकाणी लाविल्या आहेत. लग्ने दोन अगत्यरूप करितात. धाकटे देवढीकडील मार कुल कारभार राजश्री विष्णुपंतावरी सोपिले. महादजी सालोखी यांनी कामकाजात हरगीज न यावें हे मानस फार. त्याकडील खेडीपाडी कुली दूर करविली. खेडियाचा ऐवज व मोइनी पूर्ववतप्रमाणे कुलीं डौल विष्णुपंताचे जिमेस लाविलें. थडें[१] माहुलीस बांधावयास त्यास सागोन आरंभ करविला. थोरले मातुश्रीचा कलाप विशेष आहे तुमचे येणे सत्वर जालें तरी उतम. नाहीं तर मूल तुम्हास येईल यैसे दिसतें. प्रतापगडची स्वारीस उभयेतां न जाऊ यैसे म्हणतात. परंतु दों चौ दिवसा जातील. बनलें तरी जेजुरीस येतील. मग आलंदीहि जवलच आहे. हा विचार आम्ही तर्कें मात्र लिहिला आहें. त्याहिमध्यें न कलें. प्रतिपदेचे दिवसीं रा बाबूजी नाइकाकडील वकील स्वारीस गेला तेथें काये बोलिला हे न कले. आम्हांस येऊन सांगितले की नाइकास नजरेस आणितो. राजश्री (नी) मान्य केले आहे. तुम्हीहि येकदा स्छलशुध करणे. आम्हीं हिकमत करून चोपदाराकडून अर्ज करविला की नाइक आले आहेत. भेटीस येतात, त्यास रागें रागे बोलिलें की तुजला कोणे सांगितलें? त्याणे आमचें नांव घेतलें. आम्हास परम क्रोधास येऊन बोलाविलें की तुम्ही बाबूजी नाइकास आणितां. तेव्हां आम्हीं विनंती केली कीं मजला काही विदित नाही. त्याचा वकील बाहेर आहे त्याणे आम्हाजवळ सांगितलें की आजी नाइकास यावयाची आज्ञा जाली. हे खरे की लटके ह्मणोन चोपदारास सांगोन मर्जीचा शोध घेतला. यैसें म्हणताच त्याच्या वकिलास बोलाऊ सिव्या दिल्हिया. पाच रिकीबदार पाठविले की नाईक सातारियास जाणें नाईकास न येणे ह्मणून सांगणें. वाटेस भेटलें, आलें असिलें

---

१ विरूबाईचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तरी माघारें नेणें. त्यास तें साताराहून निघालेच नवते. खैर जाली. परंतु आम्हावरी मर्जी फिरली होती परंतु जाबसालांत मर्जी बाहाल करून नारोपत वकीलच फजीत जाला. मलवडीकडे साबाजी घाटगे याची स्वारी जाली. मलवडीस वेढा बसला म्हणून बच्याबाईचें पत्र आलें ते दिवसी आपण जातों म्हणून गडबड केली. मग प्रतापजी पिपरे व पतकी याचे राऊत चवाण जाधव व डुबल यैसे दोनेंकसें रवाना केलें. ते तेव्हांच फिरून गेले. राऊत मलवडीस आहेत. त्यास बोलाऊं पाठविले आहे. आजी उद्यां येतील. राजश्री प्रतिनिधीवरी राग येविसी केला. त्याणीहि आतस्ते कागदपत्र पाठऊन निवांत केलेच. चिरंजीव राजश्री आबा आपणाजवळ आहे त्याचे काम खासगत आपणाकडील व जाधवाकडील करून आपण देतीलच. आणिकहि जाधवास दोन हातरोखे रात्री घेतले. मागाहून पाठवून देऊ. आपणांकडील विस्तारे वर्तमान कधी येणे होईल. श्रीमताचा निघावयाचा आवकाश कितेक आहे? उतरेकडील व शहरचे वर्तमान लिहिलें पाहिजे. वरकड वर्तमान याहून अधिकोतर राजश्री आपा आपणास लिहित असतील त्यावरून अवगत होईल. आपली पत्रें तीर्थरुप साहेबांकडे रवाना केली. आमची कामें करून येतों म्हणून लिहिले, रावताची समजावीश पूर्वीच केली म्हणून लिहिले, परंतु वरसापेक्षां तीचौ हजारास टोपी घातली. बरें रुणांबंध. रोजगाराचा मजकूर आपली पूर्ण कृपा आम्हांवरी येवढ्यास्तव सध्या फळ प्राप्त जाले. बरें पुढें आपणच आहेत. आमची कामेकाजे करून येतो म्हणून लिहिले तर आमचे कार्य थोर हेच कीं तुमची कृपा. त्यांत कामें यैसीं नाहीत कीं आपणांस व श्रीमंतास व राा बाबास संकट पडावें. सहजाची आरती सहजाचा गजर जाला तऱ्हीं उतम, न जाली तऱ्हीं त्याहून उतम. आपणां बहुत श्रम करावेसे नाहीत. येक गाव कृपा करून सरदेशमुखीचा मानुर तरफेंत दिधला तो तलबेमधें घेतला असे. त्याचा अनभव पाहून तोहि नजर करितो. चिंता न करावी. आमचे संकट यैसें नाही कीं संपूर्ण प्रांतांतील व गड कोट किले यांच्या सबनिश्या कारखांननिशा पाहिजेत यैसे नाहीं. येक तुमच्या लोभाचे मात्र भुकेले आहोंत. पुरातन आसामी आहे तिचा जीर्णोद्धार व दासोपंताचा मजकूर ठिकाण न लागे तेथे दुसरा मजकूर काये ? आतां आपण सत्वर प्रसंगास यावें. येजमान बहुत स्मरण करीत आहेत. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असू दीजे हे विनंती. सेवेसी खंडो सिवदेव साा नमस्कार विनंती.

¶*This letter appears to be written by Nagoram Meghashyam to some one, informing him of the details of Shahu's last days and of his sick wife Sagunabai.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 89] [*2-2-1749*]

श्रीशंकर

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामी वडिलांचे सेवेसी

आपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता माघ वा ११ गुरुवार मुा जांब नजीक जराडा पावेतो वडिलाचे आशिर्वादेकरून सुखरूप असो विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसे नसावें. सदैव पत्र पाठऊन लेकराचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर राजश्री शुक्रवारीं खेडाहून तिरपुटीस आले. आम्ही शनवारी जांबास आलों. त्याजपासून यथेंच मुकाम आहे. त्यास कारण हेच कीं बाईसाहेबांस बरें वाटत नाहीं. दोन तीन सिकारी राजश्रीबराबर केल्या; यास्तव काही ज्वर आला म्हणून येथें दोन तीन दिवस राहणे जाहलें. आणिक दोन तीन दिवस होईलसें वाटते. पुढें मग जाणार. तूर्त आम्हास निरोप लवकर होईलसा दिसत नाहीं. दाहावीस रोज स्वारीस लागतील. राजश्री येसवतरायाच्या मते आपण कारभारी राजश्रीचे बरे करावे. आमच्या उपरोधास कारण हेच कीं आपल्या मार्फतीनं कर्जाचे रोा ठहरले नाहींत व दोन तीन मजकूर आपल्या वेगळे जाहले यास्तव राजश्री देवराव तर मध्यम व राजश्री येसवतराव बरेच आहेत. सर्वाहून चांगले आमच्या मतें खरे असे विष्णुपंत बोलतात बुधीपुरःसर आर्ज करितात. वरकड सुकाल! सुकानंद व देवराव मुलापासून सेवटपावेतो लटके कल्पनेने बोलतात. तीर्थरूपासी आमची पैज पडली आहे तरी महमद हुसेनाची झोंबी लावावी. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao to Bhausaheb, informing him that he would be required to halt at Jamb for some days due to the queen's indisposition brought on by the exhaustion in moving with the hunting party of the King.*

No. 90] [*24-10-1748*

छ १२ जिलकाद नकल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दर्याजी नाईक जासूद राजश्री स्वामीचे हुजरातीस जासुदांचा नाईक आहे, त्याचे नाइकीतील जासुदजोडा नवाब निजामनमुलुक याचे लस्करातून बातमी घेऊन आजी छ ९ जिलकादी आला ते वर्तमान दर्याजी

---

१ हें पत्र, पत्र नं. ५५ नंतर वाचावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाईक याणी राजश्री स्वामीपासी च्यार घटका रात्रींस दरबारास गेलो तेव्हा सांगितले कीं राजश्री प्रधानपंताची व नवाबाची मुलाजमत जाहाली. नवाबानी च्यार लक्ष रुपये यास खर्चास दिल्हे. येकूण तीस उंठ खजाना राजश्री प्रधानपंताचे घरास आला. मागून आणिक येतच आहे. सौ मातुश्रीबाई-साहेबांचे वर्तमान राजश्री प्रधानपंतास श्रुत जाहाले, त्याजवरून ते व राजश्री पिलाजी जाधवराऊ बसोन विचार केला आहे कीं हजार स्वारानिसी सडे स्वारीनिसी माहाराजाचें समाधानास्तव दर्शनास येणार म्हणोन वर्तमान सांगितले. स्वामीस कलावे यास्तव लिहिले आहे. भेटी जाहालियाचे वृत स्वामीकडे लिहिले. पुढे कांही आले असले तरी सविस्तर लेहून पाठविले पाहिजे. येथे कांही कागदपत्र आला नाहीं. बातमीचें वर्तमान जबानी मात्र आले. विदित जाहाले पाहिजे. सदरहू वर्तमान बातमीचें सांगितले तेव्हा आम्ही दरबारीच होतो. आपले काने श्रवण केले. परंतु सत्यमिथ्ये न कले; तरी तिकडे कागदपत्र आले असल ते लिहिले पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*News letter from Satara to Sadashivrao Bhau, after the death of Queen Sangunabai on 25th August 1748. It seems the Peshwa met the Nizam in the summer of 1748 on his return to Poona from the North.*

No. 91]

श्री

समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री सदासिवराव चिमणाजी यासी आज्ञा केली यैसीजे. तुम्ही विनंतीपत्र पाठविले तें हुजूर प्रविष्ट जाले. रविसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहे; स्वीकार करून उतर पाठवणार स्वामी समर्थ आहेत म्हणून लिहिले ते विदित जालें. तील शर्करायुक्त पाठविले ते पावले. स्वामीनी स्वीकार केला आणि हे आज्ञापत्र सादर केले असे. वरचेवर विनंतीपत्र पाठऊन स्वामीस संतोष पाववीत जाणें. जाणिजे. बहुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा.

¶*Shahu accepts the Sankranta greetings sent by Sadashivrao Bhau.*

+ येथून पुढील अक्षर खुद्द शाहूच्या हातचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 92] [*19-1-1756*

श्री

राजश्री जावजी गवली गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीो बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सुा सीत खमसैन मया व अलफ. तुम्हाकारणे शंक्रमणाचे तील शर्करायुग्त पाठविलें आहेत. तरी घेऊन पावलियाचे उत्तर पाठविणे. जाणिजे छ १६ रबिलाखर बहुत काय लिहिणे ?

श्री
राजा शाहु नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव प्रधान.

मोर्तब
सूद.

¶*Peshwa Nanasaheb sends Sankrant greetings to Javaji Gawli.*

No. 93] [*About 1745 ?*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायेत चैत्र शुद्ध १३ त्रयोदशी पावेतों जाणून स्वकीय लेखन करणें विशेष. राजश्री त्रिंबकराव यांचे कारभारी आम्हांजवळ बागेच्या मोटा चालवावयासी परवानगी मागत होते त्यास आम्ही सांगितलें कीं बागेंत केळी व उंस, वांगीचीं झाडें व मीरशेंगाचीं झांडें आहेत तीं वाळलीं तरी कार्यास येतील. वरकड झाडें आहेत तीं कांहीं महिना दिडा महिन्यांत मरत नाहीं. तशाहीमध्यें मरतीलच ऐशीं असतील त्यांस नेहमी दोन पखाला लाऊन पाणी घालणें म्हणोन आज्ञा केली तें आइकिलें नाहीं, आणि सातारियास लिहून पाठविलें, बहुत उत्तम केलें! बाग वाचऊन शहर पाणियां (वाचोन ?) हैराण करावें हें तों कार्याचें नाहीं. (कारण) सरकारच्या पखाला देखील (संगमावर) पाणियास जातात ऐसें आहे. नदींत पाणी नाहीं याजकरितां हा बंदोबस्त आम्ही केला आहे. मोटा चालत्या केलियानें पाणियाकरितां आकांत होईल ऐसें आहे. हें खरें अप्रमाण ऐसें चित्तांत आलें असिलें तरी कोणी शाहाणा माणून(स) पाहावयासी पाठवावा.

---

१ पेठे ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाणियाचे पुढें कजिये होतील मारामार होईल तें कांहीं आमच्यानें आइकवणार नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. हें चित्तास न ये तरी आम्हीच सातारियास येतों. येथें लोकांची हैराणगत पाहावणार नाहीं. प्रजन्य पडेल न पडे हें कांहीं निश्चय कळत नाहीं; याजकरितां याप्रमाणें केलें आहे. आपल्या चित्तास येईल त्याप्रमाणें लिहून पाठवणें त्याप्रमाणें करूं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. राजश्री अंताजी नारायण[1] यांसी बंदोबस्त करावयांसी सांगितला त्याप्रमाणें त्यांहीं केला हें आशीर्वाद.

¶*Radhabai complains to Nana about Trimbakrao (Pethe ?) using water for his garden, when the whole town was suffering for want of drinking water.*

No. 94]

पैवस्ती छ २९ जमादिलावल

श्री

चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यासीं प्रति मातुश्री राधाबाई अनेक आसीर्वाद. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते उतम समई पावोन परम समाधान जाहाले. यैसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवित असिले पाहिजे. यानंतर आमची इछा आहे की तुम्ही घरास लौकरच यावे. दूर देशास गेलेत आहा. याजकरितां सौ गोपिकाबाई येणार यैसे यैकतो. (तरी) तुम्हीहि देशास आले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Janardan, it appears, has accompanied the Peshwa on some distant expedition. Radhabai writes to him expressing her wish that he should return home soon.*

No. 95]

श्री

श्रियांसह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत छ १३ रमजानपावेतो जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. चिरंजीव राघोबा व जनोबा यास पुणियास पाठविणार; त्यांस येथे आमचे करमणुकेकरिताच पाठविणार असिला तरी येथे आमची

---

१ चिमाजी आपाचा फडणीस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करमणूक होतच आहे. अगत्यच पाठविले पाहिजेत ऐसे नाही. तशाहिमध्ये तुमचे चितात पाठवावे यैसे असिले तरी पाठवावे. बहुत काये लिहिणे, हे आसिर्वाद.

¶Radhabai writes to the Peshwa that he need not send Raghoba and Janoba to Poona specially for her diversion.

No. 96]

श्री

चिरंजीव राजश्री नाना यासी मातुश्री राधाबाई आसीर्वाद उपरी: येथील कुशल ता। भाद्रपद वद्य चतुर्दशी जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही आपली कोणे गोष्टीविसी आबल होये ते न करणे. खाऊन जेऊन सुखरूप राहाणे. येथील मजकुराची काही फिकीर न करणे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे, हे आसीर्वाद.

¶An affectionate letter written by Radhabai to the Peshwa, her grandson, in which she entreats him to take care of his health and not to worry about anything.

No. 97]

श्री[1]

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यासीं राधाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जाणे विशेष. चिरंजीव राजश्री बाबूराव दादाजी सान्यें याजविसी पूर्वी तुम्हांस हटकिले होते. त्यास, तुम्हीं बोलिला कीं आसामी व तैनात जे आहे ती करारच आहे. नेमणूक मात्र त्याचीं हरकोठे करून देऊ. त्याजवरून हाली यास तुम्हाकडे पाठविले आहेत; तरी याची नेमणूक हरकोठें करून देणें. अनमान न कीजे. बहुत काये लिहिणे हे आसिर्वाद.

¶Radhabai writes to the Peshwa that a certain Baburao Dadaji Sanye should be appointed to some remunerative post.

No. 98] [*3-7-1746*

श्री

श्रियांसह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील क्षेम ता। आशाढ वद्य ११ येकादसीपावेतो येथास्थित असे विशेष.

---

१ हें व पुढचीं २ पत्रें, पत्र नं. ५४ नंतर वाचावीं.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस पुणियास लोहगडीहून आणणे, म्हणोन पूर्वी पत्र लिहिले होतेत. त्यास राजश्री माहादाजीपंत याणी आम्हास पत्र पाठविले की, बहुता दिवसी आली आहेत; दोन महिने मूळ न पाठवावे; त्याजवरून आणिली नाही. आता अष्टामास लागला नाही तों पुणियास आणितो. अष्टमांगल्य करावें लागते. आपले येणे श्रावणमासात होईल की काय ते लिहिणे. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

¶Radhabai writes to the Peshwa about bringing Umabai to Poona from her father's house at Lohagad.

No. 99] [*22-7-1746*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ताा श्रावण वद्य १ प्रतिपदा मंगळवार पावेतो जाणून स्वकीय लेखन करणे विशेष. बहुत दिवस पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही; तरी सदैव पत्री कुशलवृत लिहित असावे. चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस पुणियास आणावयासी मूळ आज पाठविले. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

¶Radhabai writes to the Peshwa that arrangements are made to bring Umabai to Poona from the house of her parents.

No. 100] [*11-10-1746 ?*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद. उपरी, येथील कुशल ताा छ ६ शौवालपावेतो जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते पावले. तेथे लिहिले की, सौभाग्यवती चिरंजीव उमाबाई जात्या शरीरे अशक्त आहेत. याजकरिता लेकुरवाली बाइको मेळऊन ठेवावी म्हणोन कितेक तपसिले लिहिले ते कलले. कोणे गोष्टीविसी प्रतिकूळ आहे यैसे नाही. सर्व अनकूळच आहे. लेकुरवाली बाइको मिलेल; पाहोन ठेविली आहे. यानंतर सौभाग्यवती आकाबाई यांस व सौभाग्यवती उमाबाईची मातुश्री यांस आणावयासी पालख्या पाठविल्या आहेत. लोहगडास धोडभट दात्ये पाठविले आहेत. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶Radhabhai writes to the Peshwa that, as desired by him, the services of a good elderly woman have been procured so that she will be helpful to Umabai when she (probably, as it appears from the letter, with her new-born child) comes to stay in Poona.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 101] [*23-12-1746*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ पोष वद्य शष्टीपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी दोन पत्रे पाठविली ती पावली. उमाबाईसहवर्तमान त्वरेनें येणे म्हणोन आज्ञा. त्यावरून उमाबाई व जानकीबाईसहवर्तमान पौष वद्य सप्तमी मंगलवार ते दिवसी येकविसां घटकानंतर सुमुहूर्तें निघोन श्रीजेजुरीवरून सातारियासी येतों. स्वाम म्हणतील की, जेजुरीस जावयासी कारण काये? तरी सौ॥ उमाबाईच्या मातुश्रीनी, उमाबाईस व मुलास बरे वाटत नव्हतें तेव्हा नवस केला होता. यास्तव श्रीजेजुरीवरून त्यास घेऊन येतो. घोडी व उंठे व पालखिया वगैरे सामान सर्व येथे मिळाले. राऊत दुर्जनसिंगाचे पनास समागमे घेतले. शृत जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Ramaji Vishwanath writes to the Peshwa that he, along with Umabai (Sadashivrao's wife) and Jankibai, is coming to Satara* via *Jejuri without any delay.*

No. 102] [*11-5-1747*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशळ तागायेत वैशाख शुध १३ सोमवार शायंकाळ प्रहर दिवस पावेतों यथास्थित असे विशेष. पत्र पाठविले ते आताच पावोन लेखनार्थ अवगत जाहाला. चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस घेऊन जेजुरीस यावे म्हणौन लिहिलेत. ऐशास मूल लाहान, उनाळे दिवस, याजकरितां बाहेर काढितां येत नाही. आमचा मजकूर तरी, तुम्ही जेजुरीस आलियानंतर आलो तरी येऊ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Radhabai writes to her grandson Nanasaheb that, as desired by him, it is not advisable for Umabai, with her child, to undertake a journey to Jejuri, the days being very hot.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 103]

श्रीशंकर

तीर्थस्वरूप मातुश्री
बाई वडिलांचे सेवेसी

अपत्येंसमान त्र्यंबकराऊ विस्वनाथ सा नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून ता श्रावण सुध दसमीपावेतों समस्त सुखरूप असों विशेष. वडिलांनी पत्र पाठविले ते पावोन बहुत समाधान जालें. तेथे आज्ञा जे "पूर्वी सौभाग्यवती रखमाबाईस पाठऊन देणे म्हणून लिहिले. हली प्रजन्य बहुत याकरितां पुणियामध्येंच ठेवावी यैसी तजवीज केली आहे; तर तुम्ही तेथेच ठेवणे" म्हणून आज्ञा केली त्यावरून राहाऊन घेतली आहेत. काही चिंता नाही. बहुत ल्याहावे तर आपण वडील आहेत. कृपा लोभ निरंतर असों दीजे हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath writes that Rakhmabai has been detained at Poona owing to rains.*

No. 104]

श्री

चिरंजीव सौ जानकीबाई याप्रति सौ गोपिकाबाई आसीर्वाद. उपरी: येथील क्षेम ता माघ वद्य दशमी मुकाम ठाणे जमखंडी श्रीकृष्णातीर प्रांत कर्नाटक येथे सुखरूप असों विशेष. तुम्हास दाहापाच पत्रें पाठविली, परंतु येकाहि पत्राचे उतर आलें नाही. तरी यैसे न करणे. सदैव अपणाकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. इकडील वर्तमान तरी, कर्नाटक प्रांती जाणार आहेत. अधिकोतर ल्याहावे यैसे नाहीं. तुम्हास वाकी व मूद वगैर पा त्याचे उतर आले नाही. तर उतर पाठवणे, हे आसीर्वाद.

¶*Gopikabai writes to Jankibai asking her to send replies to her letters and further inquires whether she received the ornaments sent for her.*

No. 105]

श्री

चिरंजीव सौ जानकीबाई यांसी प्रति सौ गोपिकाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ता वैशाख वद्य द्वितीया नजीक धारवाड येथे समस्त सुखरूप असो विशेष. तुम्हाकडून कागद सर्वदा येत असतात परंतु तुमचे खासा पत्र सुखसंतोषाचे येत नाही; यावरून अपूर्व भासते. तरी सर्वदा पत्र पाठऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कुशलार्थ लिहून संतोषवित जावे. वरकड चिरंजीव दादा याचे जेवणास व फरालास जपत जावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे आसीर्वाद. सौ मातुश्री मावसीबाई नमस्कार. लोभ असो दीजे.

अपत्ये विस्वासराव व माधवराव व कृष्णा याचे सां नमस्कार. आसीर्वादपत्र येऊन संतोषवीत गेले पाहिजे हे विनंती. हेच गोदावरीबाई व गोदूबाई टोकेकरी याचे आसीर्वा(द). लोभ करीत जावे.

¶Gopikabai asks Jankibai to take care of her husband's (Raghunathrao's) health, paying special attention to his diet.

No. 106]

श्री

चिरंजीव सौ जानकीबाई यासी प्रति सौ गोपिकाबाई आनेक आसीर्वाद. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणे विशेष. तुम्हाकडून फार दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सदैव पत्रे पाठऊन वर्तमान लिहित असिले पाहिजे. पंधरा दिवसाआड येथे पत्रे सरकारची येतात आणि आपणास पत्रे लिहावयास अवकाश होत नाही. तस्मात येथे आम्हाजवल होता तेव्हा आपली माया मुलालेकरावर वाटली गेली होती. आता तेथे दादावरच माया राहिली. इकडील विसरलासे दिसते. परंतु ऐसे नसावे. येकायेकीच मित्रपणास अंतर न पडावे. बहुधा विस्मरणेकडून होत असेल ते स्मरणेकडून करावे. बहुत काये लिहिणें, लोभ असो द्यावा, हे आसीर्वाद. बो जिऊबाईचे आसीर्वाद.

¶Gopikabai cleverly and mildly rebukes Jankibai, who is at this time away with her husband Raghunathrao, for not having written to her for a very long time.

No. 107] [*17-8-1757*

पौ छ २६ सफर

श्री

चिरंजीव सगुणाबाई यासी प्रति सौ गोपिकाबाई आसीर्वाद उपरी. येथील ता भाद्रपद शुध त्रितीयापर्यंत समस्त सुखरूप असो विशेष. तुम्हाकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाही तरी वरचेवरी सविस्तर लेहून पाठवित जाणे व आपली शरीरप्रकृति लिहित जाणे. तुमचे माहेरची सर्व सुखरूप आहेत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आम्ही कर्णाटकाहून आशाढ वद्य अष्टमीस पुणियासी आलो. कलले पाहिजे. तुम्ही सर्व यात्रा करून लौकर येणे. आमची शरीरप्रकृति उतम आहे. काही कालजी न करणे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Gopikabai informs Sagunabai of her arrival from Karnatak and asks her to return as soon as her pilgrimage is finished.*

No. 108]

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री भाऊ यासी प्रति सौ गोपिकाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ताा छ जिलकादपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी ऐसे न करावे. सदैव पत्र संतोषाचे पाठवींत असिले पाहिजे. आम्ही सर्व येथे खुशाल असों. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

¶*Gopikabai writes to Sadashivrao of her health.*

No. 109]

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री दादा यासी प्रति सौ गोपिकाबाई आसीर्वाद उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशल ताा पौष शु ९ पावेतो मुकाम तुंगभद्रा वर्तमान उतम असे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येत नाही. तर स्मरणपूर्वक सदैव पत्रे पाठवावी. आपणास शंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेंत. स्वीकार करावा. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Gopikabai sends Sankranta greetings to Raghunathrao.*

No. 110] [*1761 ?*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री दादासाहेब यांसी प्रती आशिर्वाद उपरी येथील कुशल ताा छ १ रमजान पावेतो मुकाम नांदूर यथास्थित असे विशेष. माघ वा १० पुण्याहून निघालों ते दर मजल मुकाम मजकुरी आलों. उदईक सिनरचा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मुकाम परवा दारणा सांगवीस जाऊं. त्यानंतर आपला निरोप येईल त्याप्रमाणें करूं. वरकड वर्तमान लक्ष्मण आपाजी यानी लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद.

¶*Gopikabai (?) writes of her arrival at Nandur.*

No. 111]

श्री

राजश्री नारोपंतनाना स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. तांब्याचा पेला १ येक पाठविला आहे. हा श्रीमंत सौ बाईसाहेबांस पाणी प्यावयास द्यावा. येविसीं श्रीमतानी ल्याहावयास आज्ञा केली त्याजवरून लिहिले असे. बहुत काय लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

मुगदलाचा लाडू पाठविला आहे. हा भक्षून पाहावा. याजप्रमाणें करीत जावा येविसी विनंती करावी. श्रीमंतानी दाखल्यास पाठविला आहे म्हणून बाईसाहेबांस सांगणे. हे चिठी वाचून दाखवावी हे विनंती.

लक्ष्मीबाई व जानकीबाई यांसहि दाखवावी. हे विनंती.

¶*The Peshwa has sent from Karnatak a small copper pot for his wife Gopikabai. He has also sent a sample of some sweet preparation, the like of which, he desires, should be eaten by her.*

No. 112]

पो छ २९ जमादिलाखर सितैन

श्री

चिरंजीव राजश्री भाऊ यांसी बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले. रविसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते घेउन श्वीकारिले. रा॥. छ २९ जमादिलाखर बहुत काये लिहिणे हे असिर्वाद.

¶*Nanasaheb sends to Bhausaheb his Sankranta greetings.*

1722

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 113] [*About August 1748*

श्री.

पुा तीर्थरूप राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिले कीं तीर्थरूपाच्या मर्जी प्रो बहुत खबरदारीने संभाळून आहों म्हणून. ऐशियास यापरते दुसरे अधिकोत्तर काय आहे? स्वामीनी तीर्थरुपाच्या मर्जी प्रो वर्तणूक केली हे वर्तमान तीर्थरूप नानास्वामीस श्रवण होतांच बहुत स्वामीवर संतोष होतील. स्वाम वर्तताात ते बहुत उत्तम आहे. याउपर आपण कांहीं कारभार हिसेबकितेब पाहात असतात की नाहीं हे ल्याहावे. घोडी फेरावयास जात असतो म्हणून लिहिले तर बहुत उत्तम. एका दिवसा दो दिवसां खामखा जात जावें. रावता मोडूं नये म्हणजे सा * * तें माणूस घोडी फेरीत जावीच क * * * येथील वर्तमान साप्रत धाकटीबाई (स) बहुत बरे वाटत नाहीं. याजकरितां राजश्री ब (हुत) कष्टी आहेत कारभार विचार नाहीं. दुसरे नवाबाचे वर्तमान राजश्रीस कळले त्यावरून बहुतसे दीक आहेत. कळले पा सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana Purandare to Raghunathrao, advising him in an affectionate tone to respect Bhausaheb and obey him implicitly.*

No. 114]

श्री.

आसीर्वाद उपरी. काल तीर्थरूप राजश्री नाना स्वामीनी बोलाविले होते. चांदण्यात बसले होते. फलाराची संविधा जवल ठेविली होती. रिकाम्या गोष्टी बोलता पुसू लागले की तुमची प्रकृति कोण्या प्रकारची? पुसिलें यांचा भाव काय की त्यास आमची प्रकृति ठाऊक नाही यैसे नाही तथापि हे खरे सागतात किवा लटके सागतात हा भाव पाहावा म्हणुन पुसिलें. आम्ही हा भाव जाणून यथास्थित ज्या प्रो सागावयाची त्या प्रमाणे सांगितली. उगेच होते. हे आसीर्वाद.

¶*The writer (Janardan ?) refers to an idle inquiry from Nanasaheb and says how he tried to answer it.*

No. 115] [*26-1-1748*

श्री.

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री नाना यासी प्रति आनुबाई अनेक आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ताा माघ शुध ८ भोमवार पावेतो

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण स्वारीस गेल्यादारभ्य (जा) सुदा-समागमे पत्र पाठविले ते उतमसमई प्रविष्ट होऊन लेखनान्वये चित आनंदोदित जाहले. यैसेच सर्वदा पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. संक्रमणाचे तीलसह शर्करायुक्त पाठविलेत ते पावले. चिरंजीव सौ जानकीबाई व सगुणाबाई व बयाबाई सर्व सुखरूप आहेत. राजश्री मुरारजी घोरपडे याकडे आपण पत्रे पाठविली होती त्यांचा मजकूर काही कलला नाही. याकरिता तिकडील वृत ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ असो द्यावा, हे आसीर्वाद.

हेा चिरंजीव राजश्री भाऊ व दादा व बाबा व विश्वासराव व माधवराव यासी अनेक आसीर्वाद. लिखितार्थ परिसोन लोभ असो दीजे हे आसीर्वाद.

¶*Anubai (wife of Vyankatrao Ghorpade) accepts the Sankranta greetings sent by the Peshwa, her nephew, and inquires of him regarding the news about Murarrao Ghorpade.*

No 116]

श्री.

श्रियासह चिरंजीव राजश्री दादा यासी प्रति मातुश्री जानकीबाई अनेक असीर्वाद. उपरी : येथील कुशल ता। जेष्ठ शुध ९ नवमीपावेतो मुकाम जाफर-नगर येथ सर्व सुकरूप जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेषे. बहुत दिवस जाले, हास्तआक्षरे पत्र येऊन संतोश जाला नाही तेनकरून चिंता लागली अहे ते कागदी कोठेवर ल्याहावी? तर सविस्तर आपणाकडील बरवेपणाचे वर्तमानलेखन करून चिंता निवारे औसे (ऐसे) केले पाहिजे. यानंतर आम्ही या प्रांती वाऱ्यापा(व)सांत दिवस कोठपर्यंत घालावे? याचा काये विचार केला तो लेहून पाठवणे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे, हे असीर्वाद.

सेवसी विठोबान चरनावर मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार.

¶*Jankibai asks Dada to send her a detailed letter for which she says she is waiting for a long time. The writer and the addressee have to be determined.*

No. 117]

[आरंभीच्या एकदोन ओळी फाटलेल्या.]

अखडितलक्ष्मीअलकृत राजमान्य श्रीो समसेर बाहदर सलाम. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणे विशेष. हिकडील मजकूर तरी पूर्वी

१. हें पत्र येथें नज़रचुकीनें छापलें गेलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोन च्यार वेला लिहिला आहे त्याजवरून कललाच असेल. पोटाची बेगमी नाही; हिकडे उपास केले ऐसे असोंन श्रीमतापासी मुजराहि नाही. बरे असों सांप्रत तुम्हाकडील वर्तमान कलत नाही * * * * * * * * * * * * * * कीर आहो आमचे * * * * तुमचे हे समजोन जे करणे ते करावे. बहुत काये लिहिणे. लोभ तो आहेच हे किताबत.

¶*Samsher Bahadar complains of shortage of money.*

No. 118]

छ १ जमादिलाकर

श्री.

वडिलाचे सेवेसी समसेरबहादर विज्ञापणा. येथील क्षेम ताा छ १७ माहे जमादिलौवल वडिलांचे आसीर्वादे यथास्थित असे विशेष. माहाराजाचे असीर्वाद-पत्र आले त्यात आज्ञा जे इतके दिवस लागावयास कारण काये लवकर येणे. त्यास सेवकास काही पैका न आला याजमुले लोकास द्यावयास उसीर लागला. अथपर दर मजल सडा होऊन आठादिवसा सेवेत येऊन हजर होतो. चरण द्रिष्टी पडतील तो सुदिन. सेवेसी श्रत होये हे विज्ञापना.

¶*Samsher Bahadar to the Peshwa, explaining the delay in his departure being due to lack of funds. He says he would arrive in a week.*

No. 119]

श्री.

राजश्री भाऊ साहेबाचे सेवेसी

श्रीमंतप्रतापकुसुमविकसितैकवसंत, जयेजयेकिरणसमरारितमोहरण श्रो आनंदराव निंबालकर दंडवत विनंती. उपर, येथील क्षेम ताा छ २ सफर जाणोन निजानंद लेखन केले पाहिजे. विशेष कृपा करोन वरदकरवर्णमये पत्र पाठविले तें पत्र कृपापात्रास * * त्र जाहलें. पत्रार्थ कीं पत्र न येण्यामुलें सस्नेह चित्त रुसव्याचा भाव दिसतों. यैसियास आपण पूर्ण कृपेनें व वर्ण वयानें व व्यावहारिक रीतीनें व सम्यकमतिनें व उत्तम द्रछतीनें असील प्रकारें आम्हास श्रेष्ठ व तीर्थरूप असतां समान प्रतिपद नसतां रुसावियास निवास चितांत कैंचा होईल? यास्तव हे कल्पना या देहाविशई आपल्या प्रसन्न चितांत नंसावी यैसा मन्मनोभाव * * * रात्र

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करिता म्ह *

* * * * *

* * * * *

हिले म्हणोन कृपालेखन यैसियास लेखनानुरूप योग घडला परंतु श्रीमत कृपाकवचामुलें मगज्ननी स्पर्श किंचित होऊन वाम बाहूस विकार जाला होता तो मंगलरूप जाला हे विनंती.

¶*Anandrao Nimbalker to Bhausaheb, in his peculiar style expresses surprise as to how he could think of his being angry with him.*

No. 120] [*3-6-1759*

पौ छ ७ जिलकाद ऊर्फ
आशाढ शुध ९ नवमी सुा
सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
गोसावी यासीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीो माहाराव जानोजी जसवंत निंबालकर कृतानेक दंडवत विनंती. उपर, येथील कुशल जाणोन स्वानंदलेखन करावे. यानंतर नूतन झाडे आंबियाची लाविली त्यास फळे अली ते सेवेसी पाठविली असेंत. पसंद पडावया योग्य नाहीत परंतु नूतन वस्तू श्रेष्ठास नजर करावी यास्तव प्रेषण केली असेत. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker sends to the Peshwa some mango fruits.*

No. 121]

श्री

श्रीमत राजश्री नाना साहेब
गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीों आनंदराऊ निंबालकर कृतानेक दंडवत विनंती. उपर, येथील कुशल ताा छ १४ माहे साबान जाणोन निजानंद लिहीत असिले पाहिजे. याउपर कृपा करून पत्र पाठविले, प्रविष्ट होऊन संतोश जाहला. बरा वाईट हवाला ईस्वरावर घातला तर इतक्या लांब विना परीक्षा केल्याखेरीज आंबे पाठविले कीं काये म्हणोन लिा. यैसियासी येथेंपि परीक्षा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

केली तर जेथ बहुशा लक्षंशा आंबे येतांत तेंथ परीक्षा करूनहि पाठविले तरी मान्येत्येस येणे कलतच आहे. ज्या गावी झाडे नाहीत त्या गावी जे झाड असल तेच तेथ मान्ये. याजकरिता संदेहपद घातले की बरा वाईट ईस्वर जाणे. आम्ही तो बदरीफलन्याये पाठवितो. कलावे कृपा असो दीजे हे विनंती.

¶Anandrao Nimbalker sends to the Peshwa some mangoes—the best that he could get in his village.

No. 122]

श्रीआईआदिपुरुष

सेवेसी विज्ञापना आजी श्रीच्या उछाहाचा प्रारंभ. याजकरिता प्रातकाली कूच करून किणये दाखल जालों. तों राजश्री बाबूराव सदाशिव काली निरा नरसिंहपुरीहून कूच करून आस्तमानी ताथवडीस राहावयासी आले होते. आजी प्रातकाली तेथून निघोन किणयेस तेहि आले. त्यांची आमची भेटी जाली. आजी येथे राहावयाचा आग्रह त्यांस केला. परंतु उद्या मोहुर्त नाही. सुमोहुर्त करून साहेबाचे दर्शण जाले पाहिजे. याजकरितां राहावयाचा बहुतसा आग्रह न करिता निरोप दिला. च्यार दिवस यात्रेचा उछह जालियानंतर पुढे साहेब आज्ञा करितील तेणे प्रो वर्तणूक होऊन येईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The Pratinidhi writes to Shahu about his visit with Babuji Naik of Baramati.

No. 123]

२

तते भट येथें राजदरबारी आले आहेत ते विरुधकर्म केले आहे. त्याचा फलादेश त्यास प्राप्त होऊन फजीत होऊन माघारे जातील तर तुम्ही नवाबास अर्ज करणें कीं वेदशास्त्रश्रुतिस्मृति सिष्टसंप्रदाय यास विरुध कर्म हे केले आहे ते फजीत पडावे. पुढें याप्रो उत्पात न करणें केलिया कार्यास येणार नाहीं. याप्रो विसाजी मोरो यास ताकीदपत्रें घेऊन पाठविणें.

¶This fragment of a letter, written by Sadashivrao Bhau, refers to matters regarding some religious rite.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 124]

श्री

नानासाहेब होम करितात. कोणासी बोलत नाहीत. भाऊसाहेबापासून येखादी वळ लेहून पत्र रवाना करणे तर करावे. बगाजीपंतापासून थैली घ्यावी आण रवानगी करावी.

¶*This letter refers to the Peshwa Nanasaheb as practising some sacrificial rite.*

No. 125]

श्री

श्रियांसह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ता॥ भाद्रपद वद्य ५ पंचमी पावेतो जाणून स्वकीय लेखन करणे विशेष. नवरात्राची घटस्तापना करावी लागत्ये; त्यास, याविसी राजश्री गणेशभट व रामभट करवे यास पूर्वीच पत्र पाठविले आहे. परंतु प्रतिउतर आले नाहीं. तरी तेथे स्तापना कराल की येथे करावी? जेथे स्तापना होईल तेथे गोंधळ घालावा लागतो. वार्षिक आहे, याजकरिता काये ते पत्र पावताच प्रतिउतर पाठवावे. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

¶*Radhabai inquires of the Peshwa where the annual Navaratra-worship should be performed—whether at his residence or her own.*

No. 126] [*1761* ?

छ २१ रावल
श्रीगणपती उछाहाची बिदाई लोकास रुो
७३२ हरदास
८ त्रिबक गोसावी उपासनी
१० राघोबा गोसावी शहरकर याचे बधू लक्ष्मण गो
४ गिरमाजी गोसावी पैठणकर
७ राघोबा गोसावी संगमेस्वरकर
४ त्रिंबक गोसावी औरंगाबदकर
५ रामचंद्र गोसावी सिवराम गोसावी यांचे सिष्य
१ आत्माराम गोसावी औरंगाबादकर
६ मोरोबा गोसावी बालंटे
४० माहादोबा गोसावी भुते चांभारगोंदेकर देखील भाऊ
४० सिवराम गोसावी सेवगावकर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

२५ त्रिंबक गोसावी बावडे चांभारगोदेकर
२२ कासिनाथ गोसावी
१५ सदासिव गोसावी पैठणकर
२० रामाजी गोसावी माहालमोहीकर
२५ माहादेव गोसावी देखील भाऊ मदन गोपाल याचे भाऊ
१८ रामकृष्ण गोसावी आष्टीकर
६ चिंतामण गोसावी भिंगारकर
७ बापू गोसावी अरणीकर
१० दिगांबर गोसावी
८ उमाकांत गोसावी बीडकर
१८ कृष्णाजी गोसावी गोगटे
७ रामाजी गोसावी खडालेकर
२५ श्रीपत गोसावी टाकलीकर विठोबा गोसावी याचे भाऊ
४ नारोबा गोसावी पैठणकर
५ गोविंद गोसावी वा जोगाईचे आंबे
५ खंडोबा गोसावी चांदेकर
५ मुकुंद गोसावी पंढरपूरकर
५ सखाराम गोसावी मुंगीकर
५ दिनानाथ गोसावी पैठणकर
५ सुभाभट तेलंग गोसावी
१४ सदासीव गोसावी सगमेस्वरकर
७५ कासिबा गोसावी बालंटे
२० दामोदर गोसावी बालजोशी यांचे पुत्र
३ हरबाजी गोसावी रासीनकर
५ गंगाधर गोसावी गोगटे
४ विठोबा गोसावी पुणतांबेकर
१० माहादेव गोसावी माहादेवकर
१० निा राघोबा गोसावी
५ मुरार गोसावी
५ लीलाधर गोसावी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

४ रामाजी गोसावी बीडकर
५ जगजीवन गोसावी पंढरपूरकर
५ पांडरंग गोसावी रामदासी शहरकर
३ रामया
३ सांभासिव
१ श्रीनिवास
३ दादोबा गोसावी तिसगावकर
३ नारायेण गोसावी बनवडीकर
४ माहादेव गोसावी करदीकर
१० गोसावी बोलवावयासी शागीर्द होते त्यास
५ वेकाजीपंत
५ विठलपत
१२ शकर गोसावी तलेगावकर
८ ता। सदासीवपंत
४ माहादेव गोसावी माहादेवकर
४ तेलंग नाव लागले नाही

८

सुमार
[५१]

७३२
५२६ कलावतिणी
[संख्या सुमार १०६ असून त्यांना १ ते ८१ पर्यंत बिदागी मिळाली आहे
१८५ गवई व नटवे [इसम सुमार ४४ जास्तीत जास्त रक्कम रु।। १२]
९० गुरव [सुमार १७ इसम जास्तीत जास्त रु।। १०]
१५ कर्णेकरी आ।। १० दर १॥ प्रो। ता। चिटको मल्हार वैद्य
[या सर्वांच्या नावें जामदारखान्यांतील लहान मोठ्या किमतीचे कापडहि खर्ची पडिले आहे]

¶*This paper contains a list of customary gifts of cash to be made on the occasion of the Ganapati festival at the Peshwa's palace.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 127] [*30-12-1759*

छ ९ जमादिलाखर
सितैन गुरुवार

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर कृतानेक त्रिकाली सास्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ माहे जमादिलौवल पावतों सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान श्रीमंत माहराज व सौ बाईसाहेब वडगाव पनालागडने करवीरास आले. माहराजांस दुष्ट ग्रह होता निवारणारार्थ पुष्य पुत्थ नवमीस गजदान केलं. किरकोल दानधर्म पांचच्यार हजार रुपयेचे वित दिलं. स्नानदान व देवधर्म पुराणश्रवण करोन येथास्थित धर्मवासनेंत अहेत. राजश्री भगवंत आपाजी माहयात्रेस गेलेनंतर राजकारण आथवा हुजूर दरबारची काहीं गुंज्यायेस पडत नाहीं. त्यांचे आगमन होयेपावतों मार्गप्रतीक्षा करितात असें दिसतें. मनोली संस्थान सुलतानराव सिंदे यांस प्राप्त व्हावे याकरिता राणोजी सिंदे स्वामीकडें पाठविले आहेत. त्यांची बोली उरकोन स्वामीचे आज्ञेवरोन संस्थानास त्या [अपूर्ण].

¶*Anandrao Giridhar writes from Kolhapur to the Peshwa about the charities, which amounted to some thousands of rupees, given and religious rites observed by the Chhatrapati of Kolhapur in order to counteract the influence of an evil star.*

No. 128] [*Before 1753*

पो छ २९ रमजान

श्री.

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद. उपरी : येथील कुशल ताा २६ रमजान पावेतो जाणून स्वकीय लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. दयाराम पुरोहित गडमुक्तेश्वर याणी गंगोदकाच्या कावडी सुमार ९ पाच पाठविल्या त्या आम्ही येथे घेतल्या. त्याचे पत्र आले ते व अजुरदार यैसे पाठविले आहेत. याची रवानगी केली पाहिजे. येथे काही दिल्हे नाही. तेथे आपण यांची बिदाई करावी, हा आसीर्वाद.

¶*Radhabai writes to Nana that she has received ten pitchers, containing the holy water of the Ganges, sent by Dayaram Purohit from Gad Mukteshwar.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 129] [*24-4-1758*

पौ छ २ रमजान.

श्री.

राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ
स्वामी गोसावी यासी,

विनंती. उपरी : हरिद्वाराहून सत्रा कावडी आल्या त्या पुण्यास रवाना केल्या आहेत. त्यास कावडी तेथे पोहचल्यावरी चिंतो विस्वनाथ याजकडे देऊन माफजतीने ठेऊन सत्रा कावड्यांस व दोन बा॥ ब्राम्हण आहेत यास अजुरा मागिल सिरस्तेप्रमाणे दफ्तरी रुजू पाहून त्याप्रमाणे अजुरा देणे. रा॥ छ १५ शाबान सु॥ समान खमसैन मया व अलफ. यांखो॥ राजश्री माहादाजी अंबाजी यास कावडी ३ तीन आल्या त्या सरकारात घेऊन पुण्यास रवाना केल्या आहेत; तरी चिंतो विस्वनाथ यांजकडे देऊन तिही कावडीचा अजुरा सिरस्तेप्रमाणे देणें. छ मजकूर. हे विनंती.

¶*This letter refers to pitchers, containing holy water of the Ganges, having been brought down to Poona from Haridwara.*

No. 130] [*29-3-1760*

श्री.

राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी यांस

विनंति उपरी. तुलेपैकीं मोहरा पांच हजार रुपयाच्या सुमारें तीनशे सत्तावीस ३२७ दर १५।॥। येकूण रुपये ५००१।।।–।. स्वार दिमत बहिरजी बाबर याजबरोबर पाठविल्या आहेत. तर गरीब अनुत्पन्न असे व असेच असोन ज्याचे घरी लग्न मुंज इत्यादिक प्रयोजन ज्यास कर्तव्य असेल असे ब्राम्हण पुण्यांत असतील ते अथवा आसपास जे आढलतील त्यास शंभर रुपयेपर्यंत येकास, याप्रमाणें धर्मादाव करणे. रवाना छ ११ साबान सुरसन सितैन मया व अलफ.

केवल दरिद्री पाहून लग्न मुंजीस देणे हे विनंती.

त्याची नांवनिसी पाठवणें. वैशाख शुधास वाटणे म्हणजे वद्य पक्षांत लग्ने होतील खरेखुरे लग्न होत नाहीं हे तहकीक करून देणे हे विनंति.

¶*Baburao Ram is ordered to distribute as charities Rs. 5,001 to worthy Brahmins whose qualifications are described.*

+ येथून अक्षर नानासाहेबाचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 131] [*31-3-1752?*

श्री.

श्रीमंत राजश्री नानां यांस आशीर्वाद.

श्रीमंत राजश्री भाऊ यांप्रति

आश्रितांत:पाती पांडुरंग जोशी कृतानेक आशिर्वाद विनंती. श्रीस यावयाचे होते परंतु मजल लांब याकरिता येणे न जाहाले. यौशियास श्रीस अभिषकादिक सर्व लिहिल्याप्रमाणे करवितो. आपण मुहूर्ताविशी लिहिले त्यास उदईक उतमच आहे. परंतु चंद्रबळ नाहीं ताराबळ मात्र आहे परंतु घरास गेले तर कार्यास येईल. आपणास तर अष्टम चंद्र व ताराबळहि नाहीं यास्तव सर्वथैव जावयास कामास नये. प्रतिपदेस शनिवारी अश्विनीवर उभयथासहि चंद्रबळ व ताराबळ आहे. मुहूर्ताचा विचार याप्रमाणे आहे. याउपर जसे आपले विचारास येईल तसें करावे. कालिंगणे दोन पाठविली आहेत ती घ्यावी. श्रीदर्शन करून जावें हे उतम आहे. बहुत काय लिहिणे. कृपावृधि असो द्यावी हे विनंती चैत्र वद्य १२ प्रहर ४.

¶*Bhausaheb is informed regarding the most auspicious time to undertake a journey, by one Pandurang Joshi, an astrologer in the Peshwas' service.*

No. 132] [*21-1-1746*

श्री.

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना याप्रति कासीबाई आसीर्वाद. येथील कुशल ताा माघ श्रुध दशमी भोमवार पावेतो मुकाम भामोडे सुखरूप असो विशेष. तुमचा निरोप घेऊन स्वार जालो तो काली संध्याकाली येथे आलो. आजिचा दिवस येथे मुकाम जाला. सारी तयारी आजिच्या दिवसात करून उदईक वैधृत टाळून कूच करून पुढे जातो याउपरी काही गुंता नाहीं. कलले पाहिजे बहुत काये लिहिणे. हे आसीर्वाद.

¶*Kashibai intimates her son Nanasaheb of her arrival at Bhamode.*

No. 133] [*30-1-1746*

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री माहादोबा स्वामीगोसावी यासी पो कृष्णराऊ माहादेव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल माघ वद्ये पंचमी गुरुवार जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. हतणीविसी श्रीमंत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्री नाना याणी लिहिले त्यास अम्ही आल्यापूर्वीच चिरंजीव रा त्रिंबकजी माणकर कूच करून राजश्री मल्हारजी होलकर यांजकडे गेले त्याबराबर हतीण गेली. नाहींतर त्याचे पत्रापूर्वीच रा केली असती कलले पाहिजे. आम्ही आजी सुक्रवारी माघ वद्ये पंचमीस स्वार होऊन मातुश्री ताईकडे गेलो. घरी आठ दिवस राहिलो होतो. मातुश्री कूच दरकूच गंगेवर गेली. अमची त्याची भेट कोठे होईल हे न कले. तर्फाचा हिसेब कितेब राजश्री बालाजी नारायेण यास समजाविला. कलले पाहिजे. मागे केलेले रीतीने सर्वांचा सांभाल करीत गेले पाहिजे. सर्व भरंवसा आपला आहे. कृपा लोभ आसो दीजे हे विनंति+

¶*Krishnarao Mahadeo writes to Mahadoba Purandare about an elephant which Nanasaheb wanted to have. He accompanied Kashibai in her pilgrimage to Benares.*

No. 134] [*16-2-1746*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री माहादोबा स्वामी गो पो कृष्णराऊ माहादेव नमस्कार विनंती येथील कुशल फालगुण शुध सतमी मुा बाबरे पा फुलमरी जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपला निरोप घेऊन निघालो ते चासेस येऊन आठा दिवसानी सरंजाम करून स्वार होऊन फालगुण शुध प्रतिपदा सोमवारी गंगेचे मुकामी तीर्थरूप मातुश्री ताई याजवळ पावलों तेथोन दुसरे दिवसी मातुश्रीचा कूच जाला त्यांसमागमे मजल दरमजल जात असो. राजश्री गोपाल केशव यासी बाबरेचे मुकामपर्यंत बराबर घेऊन तेथोन निरोप देऊन चासेस पाठविले असें. चिरंजीव बालास आपणाजवल ठेविले असें. समागमे घेतलें नाहीं. चासेस अहेत. आपण चिरंजीवास आपणासंनिध्य न्यावयाचा विचार चितात अणून त्याचा सरंजाम इतलाखी राउताचा करून देविला पाहिजे. सरंजामी राऊत अम्हासमागमे चाकरीस मातुश्रीबराबर अहेत. चिरंजीवाचा सज जैसा चितात येईल तैसा करून अपल्यासमागमेच असो द्यावें यैसा अमचा मनोदय आहे; आणि पूर्वीहि येतद्विशई जे विनंती करणे ते केली आहे; आणि आपणहि मान्य केले आहे; यास्तव स्मरणार्थ पुन्हा लिहिले असे. वरकड आम्हाकडील कारभाराविसी चासेहोन जे लिहितील त्याचे निभावाचे साहित्य होय

+ कृष्णराव महादेव जोशी चासकर, बाजीरावाची बायको काशीबाई इचा भाऊ, तिला घेऊन काशीयात्रेस गेला तेव्हांचें पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते करीत असावे. अम्हास सर्व प्रकारे पुढेमागे अवलंब आपणावेगळा दुसरा अहे येसी वाट नाहीं. याकरिता विस्तार लिहिता नये. नवाबाकडे श्रीमंताची व अमची पत्रे गेली होती त्याचे उतर अपणाजवल काय अले असेल ते चिरंजीव बालाचे पत्री लेहोन पाठवावे. तेथोन अम्हास पत्रार्थ लेहोन पाठवितील याकरिता अगत्य जाणून लिहिले पाहिजे. जागिरेचा बंदोबस्त आपण चिती धरिल्याप्रा कर्तव्य तो केला पाहिजे. येविसी अम्ही चिंता करावी येसे नाहीं. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती+.

¶*Krishnarao Mahadeo is accompanying his sister Kashibai on her pilgrimage to Benares and is therefore asking Mahadoba Purandare to look to his affairs at Chas.*

No. 135] [*17-2-1746*

श्री

राजश्रिया विराजित रामचंद्रजी
व राजश्री गंगोबा यासी

प्रती कासिबाई आसिर्वाद उपरी. येथील क्षेम ता फालगून सुध अष्टमीपर्यंत मुा श्रीप्रयाग यथास्थित असे विशेष. मला संकट पडले आहे. कैसे म्हणाल तर माझ्या चितात कासीत दोनच्यार महिने राहावे. परतु हे उभयता मला बलेच वोढून काढितात. वरकड वर्तमान राजश्री मल्हारजी होलकर व रा जयाजी सिंदे याचे पत्री लिहिले आहे त्यावरून कलेल. माझे जाणे कासीस होये ते गोष्ट करणे. बहुत काय लिहिणे, हे आसिर्वाद.

¶*Kashibai to Gangoba and Ramchandra Baba, asking permission to stay longer at Benares.*

No. 136] [*9-3-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी सेवक कृष्णराऊ माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता फालगुन वद्य चतुर्दसी वास्तव्य बऱ्हानपुर स्वामीच्या कृपेनें उतम असे. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलो ते सुरक्षित

+ बाजीरावाची स्त्री काशीबाई इला घेऊन तिचा भाऊ कृष्णराव महादेव चासकर काशीस जात आहे, त्याचें पत्र महादोबा पुरंदऱ्यास,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथपर्यंत पावलों. आजी येथून स्वार होऊन पुढें गेलों. तीर्थरूप मातुश्री ताईचें शरीर बहुत सूक्ष्म जाहलें आहे यास्तव मजली लाहान कराव्या लागत आहेत. स्वामीच्या पुण्येकरून सीघ्रच श्रीस पावतों. अम्ही येरुलीं असतां अजम सैदलष्करखां यानी पत्र लिहिलें कीं तुम्ही नवाबाची आज्ञा न घेतां जातां हे उतम नाहीं. पुढें तुमची जागिर कैसी राहील? ऐसा कितेक प्रकारें शब्द लाऊन लिहिलें होतें, त्यास अह्मी उतर लिहिलें कीं यात्रेस जाणें प्रस्तुत जाहलें. नवाब दूर राहिले; उतरप्रत्योतरास समये न राहिला. यास्तव्य श्रीमंत राजश्री पंतप्रधान यानी नवाबास आमच्या तैनातीविषई लिहिलें आहे. नर्मदेपर्यंत जाबसाल येईल. जागिर व मुलुक अह्मी सर्वहि श्रीमंताचे स्वाधीन केला आहे ऐसे उतर लिहिले. विदित असावें. आम्ही निघतेसमई तांतड जाहाली याजमुलें खर्चाची बेगमी विशेष न जाहली. थोडीबहुत जाहली ते केली. पुढे स्वामीस आनकूल पडल तर समाचार घेतला पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री बाबास नमस्कार विनंती. सविस्तर वृत येजमानपत्रावरून कलेल. मागे सर्वाविसी भरोसा तुमचा आहे स्वामीचे भरवसियावर आह्मी बेफिकिर आसो कृपा आसो दीजे हे विनंती

¶*Krishnarao Mahadev Joshi Chaskar, brother of Bajirao's wife Kashibai, to the Peshwa, communicating his arrival at Burhanpur on a pilgrimage to Benares.*

No. 137] [*9-3-1746*

छ ३० रालावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक कृष्णराव माहादेव सा नमस्कार विनंती. येथील कुशल फालगुण वद्य चतुर्दसी रविवार मुकाम गोपालपूर सरकार हाडें प्रा चिपानेर जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालो ते मातुश्री

+ बाबा म्हणजे माहादोबा पुरंदरे. मातुश्री ताई ही कृष्णराव महादेवाची बहीण, बाजीरावाची बायको काशीबाई.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ताई व आम्ही येथपर्यंत सुखरूप आलों पुढ मजलदरमजल जातच आहू. स्वामीस कलावें म्हणोन लिाालें असे. घरी मुलामाणसाचा परामर्ष करीत असिले पाहिजे. आम्ही ल्याहावेसे नाहीं. सूचनार्थ लिहिले आसे. बहुत काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

राजश्री बाबास नमस्कार विनंती. येजमानपत्रावरून कलो येईल. मुलामाणसांचा सांभाल करीत आसिले पाहिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo informs the Peshwa of the arrival at Gopalpur of both himself and Kashibai.*

No. 138] [*22-8-1746*

श्री

राजश्री मल्हारजी होलकर व
राजश्री जयाजी सिंदे यास

प्रति कासीबाई आसिर्वाद उपरी. येथील कुशल तागायेत भाद्रपद बहुल त्रितीया भृगुवासर मुकाम श्रीविश्वनाथनगरी जाणून स्वकीये कुशलार्थ लेहून पाठवणे विशेष. तुम्ही पत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन साकल्यार्थ कलों आला. यैसेच सदैव वर्तमान लेहून पाठवीत जाणें. इकडील वर्तमान राजश्री आबाजी शंकर सांगता कलो येईल. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे आसिर्वाद.

¶*Kashibai writes a complimentary letter to Malharji Holkar and Jayaji Sindia.*

No. 139] [*14-12-1746*

श्री

राजश्री मल्हारजी होलकर व
राजश्री जयाजी सिंदे यासीं

प्रति कासीबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल तागायेत पौष शुध चतुर्दसी इंदुवासर मुा बाहादुरपुरा गंगातीर श्रीसंनिध जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. श्रीहून निघोन गयेस जाऊन तेथील यात्राविध संपादून पौष शुध चतुर्थीस कूच करून मजलदरमजल मुकाममजकुरी आलों. येथून येका दों रोजा सत्वरच निघोन प्रयागास माघस्नानास जात आहो. तुम्हांस कलावे म्हणून लिा असे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्हाकडून आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी साकल्य लेहून पाठवणे. चिरंजीव राजश्री नानाकडीलहि वर्तमान लिहित जाणे. छ १२ जिल्हेज बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे आसीर्वाद.

¶Kashibai, who is on a pilgrimage, writes from Bahadurpura to Malharji Holkar and Jayaji Sindia that she will leave for Prayag in a couple of days.

No. 140] *[28-3-1747*

श्री

तीर्थस्वरूप जिऊबाई

सासबाई वडिलांस

आपत्येसमान कासीने क्षेम विनंती उपरी: येथील कुशल तागायेत अधिक चैत्र बहुल चतुर्दशी मंदवासर मुा सिरोज जाणून स्वकीये कुशलार्थ लेहून पाठवीत असावे. उदईक येथून स्वार होऊन मजल दरमजल कांकरे नर्मदातीरी येतो. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

गंगाभागिर्थी गोदा ईस आसीर्वाद. चिरंजीव सौभाग्यवती वज्रचुडेमंडित गोपिकेस आसीर्वाद. लोभ असों दीजे हे आसीर्वाद. चिरंजीव विस्वासराऊ व माधवराऊ यांस आसीर्वाद.

¶Kashibai writes to Jiubai (?) from Sironj that she would leave that place the next day. She sends her blessings to Godubai, Gopikabai, Vishwasrao and Madhavrao.

No. 141] *[19-6-1747*

श्री.

श्रीमंत राजश्री रामचंद्रबावा स्वामी गोसावी यासी. पो विसाजी दादाजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागायेत जेष्ट बहुल अष्टमी भृगुवासर मुा श्रीविश्वेश्वरनगरी जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. मातुश्री ताईच्या पत्रावरून साकल्यार्थ वर्तमान कलो येईल. येथपर्यंत मातुश्री ताई व समस्त यात्रा सुखरूप आली. पुढे गयेस जावे तरी वेदशास्त्रसपन्न रा दीक्षिताच्या मतें आजी गेल्याने वाटेने चिकट फार. निभाव उंटाचा माणसाचा होणार नाही. दोन तीन महिने येथे राहोन मग आस्विन मासी गयेस जाणे. त्यावरून पुढे गेलो नाही. तूर्त श्रीमध्येच राहिलो आहो. आपणास कलावे याजकरितां लिहिले असे. सदैव पत्र पाठवीत आसिले पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶Visaji Dadaji writes from Benares to Ramchandrababa of the programme of Kashibai's pilgrimage.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 142]

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री रघुनाथपंत यांसी प्रति बालाजी बाजीराऊ आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ता। छ २० सवाल जाणून स्वकीये लिहित जाणें विशेष. तुम्ही छ १८ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कललें. मातुश्रीबाई श्रीकृष्णास्नानास येणार त्यास खर्चास पाहिजे तेविसीचा मजकूर लिहिला तो साद्यंत कलला. ऐसियास मातुश्रीस तूर्त खर्चास रुपये १५०० दीड हजार पावेतों तुम्ही देऊन रवानगी करणें. आणखी खर्चास मातुश्रीस पाहिजे ते आम्ही येथून देऊं. तेथें तुम्हापासी ऐवजहि नाही; यास्तव लिहिल्याप्रा। देणे हे आसीर्वाद.

¶*This letter, written by the Peshwa to Raghunathrao, refers to the projected trip, probably to Mahuli, of Kashibai to bathe in the holy waters of the Kistna.*

No. 143]

श्री

श्रीमंत राजश्री सदासिवपंत
गोसावी यासी

आश्रित कृष्णंभट करवे अनेक आसीर्वाद विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वानंदलेखनाज्ञा करीत असिलें पाहिजे. यानंतर चिरंजीव गंगाधरभट यासीं आपण पत्र लिहिलें कीं, सौभाग्यवती गोपिकाबाई याचें श्रीच्यें यात्रेस जाणें प्रस्तुत राहिलें; तुम्ही पत्रदर्शनी येणें, म्हणून लिा. त्यास पूर्वी आपलें पत्र आले त्याजवरून वरसईहून चिरंजीव श्री यात्रेस गेले. वरसईहून आम्हास पत्र आलें. हरिहरेश्वरास पावले असतील. जासूद आम्ही तेथें रवाना करावा तो केला नाही. सौभाग्यवतीचें जाणें राहिलें हे परस्पर त्यास कलेल. उपरांत तेच येतील. तथापि त्याचे प्रयोजन असिलें तर मनुष्य पाठवावे. बहुत काये लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnambhat Karve acknowledges the receipt of a letter from the Peshwa which contained the news of Gopikabai's plan to go on a pilgrimage having been abandoned for the present.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 144] [*10-3-1757*

श्री

तीर्थरूप राजश्री भाऊ

वडिलांचे सेवेसी

अपत्यें सगुणेनें नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ फालगुन वद्य पंचमी मुकाम झासीं येथास्थित असें विशेष. वडिलांचे आसीर्वादपत्र छ ९ रबिलाखरचें आले ते पावोन वर्तमान कललें. श्रीप्रयागचे मुकामीहून पत्र पाठविलें होतें त्यावरून वर्तमान कलेल. माघस्नान करून प्रयागीहून माघ वद्य सप्तमीस निघालो ते झासीस फालगुन सुध चतुर्दशीस आलों. वडिलांची आज्ञा मथुरेस जावयाची आली होती. त्यास, त्या प्रांती धामधूम जाली, याकरितां परभारें झासीस आलों. सांप्रतहि जावयाचा हेत आहे, याजकारितां तीर्थरूप राजश्री दादाकडे पत्र लिहा आहे. आज्ञा जाली तरी जाऊन; न जाली तरी देशास येऊन. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sagunabai, wife of Janardan Bajirao, writes from Jhansi to Bhausaheb that she did not go to Mathura as the country round about it was being invaded by the armies of Ahmadshah Abdali.*

No. 145] [*13-4-1757*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना

वडिलांचे सेवेसी

आपत्ये सगुणेनें नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ छ २३ रजबपावेतो मुकाम वोंकारेश्वर मानधात सुखरूप असो विशेष. छ ८ जमादिलोवली कृष्णा-तीरचे मुकामचे पत्र लिहिले ते छ १ रजबीं सिरोंजचे मुकामी पावले. समाधान जाहाले. दिलीकडे गडबड जाहाली आहे. मथुरेस येकंदर न जाणे म्हणोन आज्ञा. त्यास, अंतरवेदीतून पत्र लिहिले त्याजवरून श्रवण जालेच असेल. त्याउपरांत झासीस आलो. चहुकडील बातम्या आणून मथुरेस जावे हा निश्चय होता तों फारच अनिवार पठाणाची फौज, दिलीत वर्तुळाकार करून मथुरा मारिली; आण आगरीस फौज पठाणाची आली, हें अकस्मात वर्तमान आल्यानंतर तमाम झासीतील प्रजा परागंदा जाहाली. तमाम संस्तानिक राजे दतियेकर वगैरे याच्या मुलकात जागाजागा चोऱ्या होऊ लागल्या. तीर्थरूप राजश्री दादा इंदुरी आले होते. मथुरेस जाणे तों सहजच राहिले. झासीस आठ पंधरा दिवस राहावे तरी दिवसेदिवस पठाण फारच शेर जाहाला. राजश्री अंताजी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

माणकेश्वर व नारो शंकर व समसेरबहादर व गोविंद बलाल याचे चिरंजीव पठाणापासुन विसा कोसावर राहो लागले. पठाणाची दौड फार हे जाणून दोन च्यार दिवस झासीस राहोन निघोन दरमजल सुरोजेस आलो. तेथे वडिलांची आज्ञा आली की मथुरेस न जाणे. त्याजवरून निघोन उजनीस त्रिरात्र राहोन येथे आलो. येथील तीर्थविध जाहाल्यानंतर त्रिंबकास जाऊन देशास येऊ. येथून कूच उदईक करून चवथे पाचवे दिवसी बुऱ्हा (न) पुरास जाऊ. येथून कासिरीच्या घाटे घाट चढून येवलियावरून नासिकास जाऊन तेथून पुन्हा सविस्तर वर्तमान सेवेसी लेहून पाठऊ. सेवेसी विदित होये. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Sagunabai, who is at this time on a pilgrimage in Northern India, writes to the Peshwa about the capture of Mathura and other places by the armies of Ahmadshah Abdali during his third invasion of India (Dec. 1756–April 1757). She has therefore cancelled her plan of going to Mathura and has already begun her homeward journey.*

No. 146] [*1757?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत दादा स्वामीचे शेवेसी

विनंती. रुो आणावयासी माणसे गयेस पाठविलीं तो पठाणाचे कूच जाहाले. आम्हास घेऊन गेला तो गयेस रुा आणावयासी पाठविले होते ते रुा घेऊन येत होते ते सुमारशाचे ठाणे सनावद म्हणून आहे तेथून धावणे निघोन रुा मारून नेले उपाय नाहीं. आठरोज लस्करात होतों मागती लस्कर गयेवर आले तेव्हां बाकी राहिली ती दिली आणि सुटोन आलों. तेव्हा सुमारशा राजा गया चौकी घेऊ लागला. तेव्हा खापरास सवानऊ कमी असेल त्यास सवाआठ सवा-सात याप्रमाणे घेऊन चिठिया दिल्हा, तेव्हां गयावर्जने जालीं. तेथून निघू लागलो, तेव्हा मागती आटकाविलें की सकट सवानऊ रुा खापरास व पावणेदोन दर्शनीस या प्रमाणे भरून द्या तेव्हा जाऊ देऊं, तेव्हां देणे पडिलें ते कोच देखील भरून दिल्हे आणि निघोन केकोचेस (?) आलो तेथे मागती खापरास अर्धा रुा व दर्शनीस तीन आणे याप्रमाणे तेथें घेतले. ऐसे सरासरी पचतीस हजार रुा आजमासें घेतले. तेथून निघोन पुढें आलों. दाउदनगरी पावला दर जीवास घेतला. पुढें आलों त्यास कासीचे राज्यानें जात्ये समई दर जीवास अर्धा रुा येत्येसमई अर्धा रुा येकूण च्यार हजार रुा याणे घेतले, व लोकानी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कोणी एक सणग कोणी दोन सणगे घेतली होती व देसची कोणापासी एक दोन सणगे होती त्याची जकाती म्हणोन हजार रुा घेतले. ऐसे वर्तमान जाहले. त्यास पठाणाने यात्रेपासून रुा घेतले हे वर्तमान स्वामीस कळल्यानंतर आपण पत्रे रा रामनारायण सुभा याणे व पठाणास पाठविली आहेत ती त्याकडे पाठवितों. तेथून उत्तरे आली म्हणजे स्वामीकडे पाठऊन देऊं. सारांश की यंदा यात्रा बहुत श्रमी जाहली ती पत्री लिहितां पुरवत नाहीं. यास सर्व अभिमान स्वामीस आहे जे गोष्टीनें नक्ष राहे तो अर्थ केलियानें उत्तम आहे. येकून यात्रेस रुा बासष्ट हजार रुो यात्रेस पडिले. त्याची यादी आलाहिदा लिहोन पाठविली आहे. त्यावरून विदित होईल. बासष्ट हजारांत आमचे आंगावर दाहा हजार पडिले, वरकड यात्रेनें दिल्हे. स्वामीची पत्रे आली आहेत याजवरच रुा माघारे येतील ऐसे न कळे. कागदीपत्रीं कार्य होईल हा भरोसा नाहीं, त्यास स्वामी समर्थ आहेत. जे गोष्टीनें रुा माघारे येत आणि स्वामीचा नक्ष राहे तो अर्थ जाहल्याने सर्वास संतोष आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. विशदे लिहावे ऐसे नाहीं. समस्त यात्रा सुखरूप आहे. बहुत काय लिहिणे? लोभाची वृधी करावी हे विनंती.

¶*Letter to Raghunathrao very likely about the pilgrimage of Sagunabai (1757).*

No. 147]

श्री

श्रीसहस्रायु चिरंजीव राजश्री रघुनाथपंत दादा याप्रति येसूबाई याचे आशिरवाद उपरी. येथील कुशल जाणोन आखाड वा १३ श्रीवाराणसी सुखरूप असो विशेष. आपण पत्र पाठविले पावोन वृत्त कळो आला. गयेचे मार्गी आम्हास बहुत प्रकारे कस्ट जाले ते श्री जाणे. कामदारखान याणे चौकी यात्रेपासून आम्हापासून सवानव रुो दर आसामीस घेतले साडेतीन हजार रुो बाकी राहिले. त्याविसी रा विश्वनाथभट वैद्य यासी धरून नेले. ते रुो मागाहून पाठविले ते मानपूरचे गढीहून सिपाई येऊन रुा घेतले. कारकून जखमी बहुत केला. माणसें मारली. फिरून साडेतीन हजार रुा कामदारखान यांसी दिल्हे; तेव्हां वैद्य सुटोन आला. त्यावर सुमारशाहा राजा याणे फिरून चौकी घेतलीन तेव्हां गयावर्जने जाहालीं. येतेसमई कोच येथें अडविलें. रुा तो कोच सुधां मुरारपुरी दिल्हे असतां दरमाणसीं अर्धा रुा घेतला. मार्गी दाउदनगर वगैरे येथेंहि चौकी पडली तरी वर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गगा उतरता जातां येतां येक रुपया माणसी घेतला आणि जकात नवी सणगे याची घेऊन च्यार महिने सणगे नेसली होती त्याची जकात नंदराम कासीचा फौजदार याणे घेतलीन; ऐसा आमचा सारे जात्रेपासून घेतलीन; त्यासी आलो ते-समई श्रीमंत पेशवे यांची पत्रें बरोबर होती ती त्यास दिली परंतु मानली नाही. आपण हली पत्रे पाठविली तीहि पावतील तेव्हां हकीकत कळेल. वरकड देशी जातेसमई आपणाकडून राउताचा सरंजाम जाला तरी उत्तम. नाही तरी जाते-समई हेच हाल असेत. याकरितां राऊत कार्तीक मासीं पाठवावे. बहुत काय लिहिणे हे आशिरवाद. आम्ही देशी जाऊन तो पदार्थ करावा हे आशिरवाद.

¶*Yesubai complains to Raghunathrao of the harassment to which she and others of her party of pilgrims were subjected by Kamdarkhan to pay the pilgrim-tax.*

No. 148]

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री दादा यासी प्रति आसीर्वाद. उपरी: येथील कुशल माघ शुध त्रयोदसीपावेतों यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविलें ते पावले. वर्तमान विदित जालें. हिंदुस्थानात गेल्यावरी प्रयागचा किला घेऊन आपण भागीरथीस घेऊन जाऊ म्हणून लिहिलें, हे श्रवण करून बहुत हर्ष जाला. तरी ईश्वरसतेकरून प्रयाग मुक्त जाला म्हणजे आम्हास घेऊन जावे. भगवंत तुमच्या मनोदयानरूप कार्यसिधी करो. आम्ही हेंच इछितों. वरकड आपणाकडील वर्तमान सदैव लिहून पाठवित जावें. बहुत काय लिहिणे, हे आसीर्वाद.

¶*This letter is addressed to Raghunathrao, probably by his mother Kashibai. She expresses her gratification at the assurance from Raghoba that he would take her to Prayag after having freed that place from the enemy's control.*

No. 149]

श्रीनिवासप्रसन्न

श्रीमत अखंडित उमाप्रसन्न
राजपूजित राजेश्री नाना स्वामीचे
सेवेसी

सो कृष्णाजी अनंत कृतानेक नमस्कार. उपरी: कैलासवासी चिमाजीराव आपाचे वर्तमान येकून मनास परम क्लेश जाले; हे बहुत लोकाचे दौर्भाग्य. सकल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पृथ्वीचे छत्र होते. श्री इछेस येत्न नाहीं. आता त्याठाई आपण आहा. आम्हा सर्वत्राचे सवरक्षण करून वडिली केली कीर्तिस अधिकोतर होये ते केले पाहिजे. विशेष काये लिहू हे विनंती.

¶*Krishnaji Anant Phadnis (Nana Fadnis' 'cousin) sends to Nanasaheb his condolences on the death of Chimaji Appa.*

No. 150] [*24-9-1749*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २२ सवाल मो लोहगड स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री जनार्दनपंत यांसी आठ पंधरा दिवस ज्वर येत होता. त्यास एकाएकी सन्निपात होऊन भाद्रपद बहुल सप्तमी गुरुवारी सा घटिका रात्रीस देवआज्ञा जाहली. ईश्वरे मोठा अनर्थ केला. होणारास उपाये नाहीं. तुम्ही यावयाचें कराल तरी न येणे, वसईस जाणें, म्हणून आज्ञा. त्यास श्रीमंत राजश्री जनार्दनपंत स्वामीस कैलासवास जाहाला, येणेकरून खेद जाहाला तों पत्री लिहिता न ये. स्वामी विवेकी आहेत. विवेकेकरून खेद दूर केला पाहिजें. आम्ही आज्ञेप्रमाणें वसईस जातों. सेवेसी विदित जाहाले पाहिजे. श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao expresses his condolence at the sad news of the premature death of Janardan Ballal communicated to him by Sadashivrao and assures him to proceed to Bassein directly as per orders.*

No. 151]

श्री

सेवेसी विज्ञापना विशेष. श्रीमंत राजश्री जनार्दनपंत यांस कैलासवास जाहला म्हणून आज्ञापत्री वर्तमान लिहिलें त्यावरून बहुत खेद जाहला तो विनंतीपत्रीं लिहितां येत नाहीं. स्वामी वडील आहेत. सर्व प्रकारें विवेकावर घालोन दुखाचे परिमार्जन करतील येविशी सेवकानी विस्तारे ल्याहावे एसे नाहीं. विदित जाहालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav Phadke offers condolences to the Peshwa on the death of Janardanpant.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 152] [*13-5-1752*

पै छ २० रजब

श्री

राजश्री त्रिबंकराव मामा स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. चिरंजीव दादाकडील वर्तमान जलद येत नाहीं. तर अवरंगाबादेऊन वगैरे वर्तमान आणून लिहून पाठवणें. रघोजी बावासी मोगलासी सदृख जाहला किंवा नाहीं? मातुश्री ताई मामामुले कष्टी असतील. तुम्ही नित्य जाऊन शांतवन करीत जाणें. आमचे विल्हेची (?) इमारतीची कामे जरूर करणें. छ ९ रजब हे विनंती.

¶*An autograph letter of Sadashivrao to Trimbakrao Mama, asking news of Dada and advising the addressee to offer consolation to Tai who had lost her brother Krishnarao Chaskar.*

No 153] [*1748*

श्री

पुा तीर्थरुप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनती. धाकटे बाईस येक दोन दिवस कपाल दुखत होते. ज्वर येत होता. थोडे थोडे दुखणें होते. त्यास साप्रत दोन च्यार दिवस अतिशय ज्वर येतो कपाल दुखतें. काही बोलवत नाही. बहुत हैरान आहेंत. वैद्य म्हणतात कीं वेथा लौकर उलगडसी दिसत नाही. त्यास फारच घाबरी होऊ लागली. आणि उतार न पडे तर स्वामीस यावे लागेल. तूर्त तो नाही. परंतु बाईचे शरीराचे कलेना. वैद्य म्हणतात की काहीं सुधे दिसते थैसे नाही. याजवरून लिहिले आहे. आम्ही प्रत्यह जात असतों. बहूतच गलाटली आहेत. ईश्वर काय करील हे पाहावे. हे विज्ञापना.

¶*Purandare reports to Bhausaheb the serious illness of the queen Sagunabai). The doctor has declared her to be beyond cure.*

No. 154]

श्री

तीर्थरूप राजश्री रघुनाथपंत स्वामीचे सेवेसी.

अपत्यें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ३ सफर भानुवासर दीड प्रहर रात्रपर्यंत येथास्थित असे. विशेष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीनी रा॥ सिवाजी कृष्ण कारकून यासमांगमे पत्रें पाठविलीं तीं आजीच घटकाभर रात्रीं पावलीं. सौभाग्यादिसंपन्न मातुश्री गोपिकाबाई प्रसूत जालिया-उपरी कांही ज्वराची भावना प्राप्त जाली आहे त्यामुलें अन्नोदकास अंतर पडतें. वरकड वैद्यांकरवी उपाय करवावे तर नाजूक दिवसांत भलत्याकडून औषध द्यावयाचा भरवंसा पुरत नांही. तीर्थस्वा॥ राजश्री नानाच्या चितांत होते कीं राजश्री दताजीपंत वैद्य यांजकडून औषध देवावे असें होते. याकरितां लिहिलें आहे. तर मारनिलेस पाठऊन देणे. राजश्री स्वामीचे आज्ञेचा गुंता असिला तर राजश्री स्वामीस विनंती करून आज्ञा घेऊन सत्वर रवानगी करणे म्हणून स्वामीनी लिहिलें. त्याजवरून स्वामींची पत्रे येतांच आम्हींच दताजीपंताचे घरास जाऊन विनंती केली. त्यानी उतर केले कीं तेथें न जावें तर आणिक कोठे जावें? अवश्यमेव जाऊं परंतु राजश्री स्वामीची आज्ञा घ्यावी म्हणून त्याजवरी तेथून येऊन तसेच दरबारास गेलो. प्रहरभर रात्र जाली. राजश्री स्वामीस दोन तीन वेल विनंती केली. राजश्री स्वामी बोलिले कीं वाड्यांत पुसोन मग सांगू येसें बोलिले. त्यास वाड्यातील जाबसाल काये तो उदईक कलेल. परंतु स्वामीनी तीर्थरूप मातुश्रीबाई यांचे पत्र सै॥ मातुश्रीबाईसाहेब वाडा पहिला यांस येक पत्र दताजीपंतास पाठऊन द्यावयाविषीं सत्वर पाठऊन द्यावें. तें पत्र येई तोंपावेतो दताजीपंतास वाड्यातील आज्ञा जाली तर रवानगी करीतच आहों. तथापि वाडियांतील गुंता पडलाच तर साहित्यास मातुश्रीचेंहि पत्र असावें. यास्तव सत्वर पाठवावें. स्वामीनी दतोंपतास पत्र पाठविलें तेहि त्यास प्रविष्ट केलें. विदित जालें पाहिजे. येथील भावनाहि वरचेवरी लेहून पाठवीत जावी. सेवेसी श्रुत होये वित्नापना.

¶*Malhar Tukdeo to Raghunathrao, informing him that he is trying to persuade the King and the Queen to spare Dattajipant, physician, and send him to treat Gopikabai.*

No. 155]

श्री

पुा॥ राजश्री अंताजी नारायेण स्वामी गोसांवी यांसी विनंती. उपरी, बदन कवीस्वर वैद्य यांणी औषधें तांब्याचे पत्रें वगैरे सांगितलें त्याप्रमाणें तयार करविलें. परंतु औषधें तयार होत तो दिसगत लागेल. यास्तव औषध तयार करून पाठवावें किंवा यैसेंच पाठऊन द्यावे ते आज्ञा करावी, त्याप्रमाणे वैद्यांची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
रवानगी करू, म्हणौन लिहिलें ते कललें. ऐशियास, वैद्यास सांगून औषध लौकर तयार पंधरा दिवसाआलीकडे करऊन त्यास पाठवणे. विलंब न लावणे, हे विनंती.

¶*This is an order for some medicine intended perhaps for Madhavrao.*

No. 156]

श्री

श्रियांसह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद. उपरी: येथील कुशल ता॥ आशाढ वद्य चतुर्दसी पावेतो यथास्थित असे विशेष. पत्र पाठविले ते पावले. चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाई यांस काहाली जाली, परंतु ईस्वरे आरोग्य केले. येका वैद्याने औशध दिल्हे होते ते लागले. पथ्य कठीण, त्याजमुळे प्रहरभर वायू जाहाला; परंतु सांप्रत उतार आहे. ते वोखद टाकविले. अत:पर दोहोचहू दिवसी प्रकृत पूर्ववत होईल म्हणोन लिहिलेत, तेणेकरून चितवृतीस समाधान जाहाले. औशध घेत होती ते टाकविले; फार उतम गोष्ट केली. अत:पर ते औशध घेऊ न देणे. तुमच्या युक्तीस येईल त्याप्रकारचे औशध बाबा वैद्याकडून देवणे. तुम्ही येथे होता याजमुळे लौकर उपाय करून प्रेत्न केला; नाही तरी कसे होते? याउपर याप्रकारचे औशध येकवार घेऊन द्यावे. वरकड थोरले वाडियातील कजिये बहुतेक वारले? भेट जाहाली म्हणोन ला॥; तरी युक्तीने कारभार विल्हेस लाऊन लौकर येणे होये ते करावे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Radhabai writes to the Peshwa Nanasaheb expressing her gratification at the gradual improvement of her daughter Bhiubai who was suddenly taken ill.*

No. 157]

श्रीशंकर.

गंगाजान्हवीसमान मातुश्री राधाबाई बहिनी यासि प्रति सिऊबाई क्षेम विनंती उपरी: येथील कुशल श्रावण शुध ९ पावेतो जाणून स्वकीये श्वानंद त्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विषेश. कृपा करून पत्र पाठविले ते उतमसमई पाऊन समाधान जाले. लिहिले की, सौभाग्यादिसंपन रकमाबाई का॥ पुणियात रो॥ त्रिंबकराऊ यांचेथे आहे. नित्ये समाचार घेत जाणे. आलस न करणे. तरी,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हास ते तेथे असता नित्ये तेथे जाऊन भेटी घेतलियावाचून समाधान कैसे वाटेल? नित्ये समाचार घेत आहो. त्याहिवरी आज्ञा आपली. कोन्हेविषीं कालजी न करावी. पुण्ये तुमचे समर्थ आहे. येविसी बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनती.

¶*Shiubai to Radhabai saying that she would visit Pethe's and inquire about Rakhmabai's health as desired by her.*

No. 158]

श्री

सेवेसी विज्ञापना. येथे नवाबाचे सरकारांत भरमणा मणून वैद्य प्रमाणिक आहे. मातुश्री कासीबाई यांचे पायाचे दुख निश्चयेपूर्वक बरे करीन मणतो. त्यास, पायास निश्चयेपूर्वक बरे करील. संदेह नाहीं. भावना लिहिली पाहिजे. तेणे प्रो साहित्य घेऊन येईल. नवाबास पत्र की, भरमणा वैद्यास अगत्य पाठऊन देणे मणून लिहिलिया हे पाठविताहेत. अम्ही सांगाते घेऊन येतो. बहुत प्रमाणिक, नानाप्रकारचे रोग दूर करितो. खर्च लागेल तो देऊन घेऊन या मणून आज्ञा आलिया अगत्यरूप आणितो. बहुत काये लिहिणे. हा विचार रा कृष्णराव यासहि लिहिला आहे. विनंती करितील. हे विज्ञापना.

¶*The writer asks the permission of the Peshwa to bring an expert physician, in the service of the Nizam, to treat Kashibai who is suffering from some pain in the leg.*

No. 159] [*18-12-1760*

पो छ ९ जोवल
मार्गसीर्ष सन इहिदे
छ १९ जावल मुदतीची
वरात लिहिणे.

श्री

राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी कैलासवासी मातुश्री ताई यांच्या अस्ती रा कृष्णाजी माहादेव चिपलोणकर याजबा श्री महायात्रेस पाठविल्या. त्यास यैवजाची * * वी करून मारनिले * त * * * तीस यैवज दिल्हा होता. यैशास नेमणुकेप्रमाणे यैवजाचा खर्च होऊन जाजती ऐवज लागला तो * * * ७३१२॥. सात हजार तीनसे पावणे तेरा रुपयें तूर्त देविले असेत तरी देण्याचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हिसेब आलाहिदा पाठविला आहे. त्यास मागे यैवज तसलमातीस खर्च लेहून दिल्हा आहे. तो दप्तरी रुजू पाहून त्यांचा व हाली यैवज देविला आहे यांचा जमाखर्च उगऊन सदरहू यैवज पावता करणें. रा॥ छ २३ रौवल सुा॥ इहिदे सितैन मया अलफ हे विनंती. दो महिनियाने देणे हे विनंती.

¶*Baburao Ram Fadnis is informed of the arrangements that were made to pay off the expenses for taking to Benares the remains of Kashibai.*

No. 160] [*21-12-1740*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी. विनंती. सेवक मंबाजी पानसरे हावालदार व कारकून दिा॥ श्री सुा॥ किले प्रतापगड सा॥ दंडवत व आनुक्रमे सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १२ माहे सवाल सन इहिदे आर्बैन पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. स्वामीच्या शरीरास सावकास नाही याजकरिता श्रीचा आंगारा मलवट पाठविला आहे. घेऊन स्वीकार केला पाहिजे. श्री आरोग्य करील. सर्वज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Mambaji Pansare sends to the Peshwa the sacred ashes from the temple of the Goddess at Pratapgad, hoping that they will cure the latter of his illness.*

No. 161]

पौ॥ छ १२ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

पो॥ कृष्णराव बापूजी सा॥ नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ छ ८ जादिलाखर स्वामीचे कृपाकटाक्षे यथास्थित असे विशेष. दोन आज्ञापत्रे, श्रीमंताची मर्जी कसी आहे, ते लिहून पाठवणे म्हणूत आली. सनाथ जाहालो. प्रस्तुत प्रकृत बरीच आहे. हकीमजीचे औषध घेत असतात. आज पांच सा दिवस पाचन दिल्हे. आज रविवारी ढाल दिल्हा असे. बहुत प्रमाणिक वैद्यक शास्त्रात आहे. तूर्त तो थोडासा गूण दिसतो. पुढे होईल वृत ते लिहून पाठवीन. कृपा कीजे हे विनंती.

¶*Krishnarao Bapuji to Bhausaheb informing him of the improvement in the Peshwa's health by the treatment of a hakim.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 162] [*9-6-1760*

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री कृष्णाजी गोविंद गोसावी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सुा ईहिदे सितैन मया व अलफ. तीर्थरूपाचे शरीरप्रकृतीचे वृत कलले पाहिजे. त्यास तुम्ही सदरहू वर्तमान वरिचेवरी दररोज लेहून डाकेबराबरी पाठवित जाणे. जाणिजे छ २४ सवाल आज्ञाप्रमाण.

¶*Raghunathrao writes to Krishnaji Govind that the news about the Peshwa's health should be communicated to him daily.*

No. 163] [*28-6-1761*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे कृतानेक विज्ञापना ताा छ २४ माहे जिल्काद पावेतों सेवकाचें व मामले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें ते * * * आज्ञा की श्रीमंत नानासाहेब जेष्ठ वद्य शष्टीस कैलासवास केला हें वर्तमान ऐकोन परम खेद जाहाला तो पत्रीं कोठ-पर्यंत ल्याहावा. सेवक लोकांचे व जनांचे प्राक्तनानसार घडोन आलें. आपले तालुकियाचे किले व ठाणेयाचा उतम प्रकारे बदोबस्त तुम्ही जाऊन करणें म्हणोन आज्ञा. तरी आज्ञेप्रमाणे सेवक किलोकिलां जाऊन जाग्याचा बदोबस्त उतम रीतीने होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ranoji Balkawade sends to Dadasaheb his condolences for the death of Nanasaheb.*

No. 164]

श्री

पुा विनंती की आमचा कामांस ना नाही. सहसा अनमान करावयाचा नसता रुा अद्याप न दिल्हे. सेवेसी कलावे. घड्यालाचा मजकूर तर येथून येक घड्याल पा आहे व येक जवाहिरखान्यापैकी व येक खरेदी करून. याप्र-माणे सरकारचे पत्रच आपणास आहेच त्यावरून कलेल. येथून घड्याल खादीच्या रुमालांत बांधोन पाठविले आहे. अद्याप ल्याहावयाचे निश्चयात्मक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
नाहीं. जे कलले ते आज्ञेप्रो लिहितो. राजश्री कृष्णराव व भिकाजी नाा यास वगैरे पुसतच आहे. काही कोणी सांगत नाही. या मुकामी बहुत चिखल जाहला. परवा शुक्रवारीं येथून कूच्य व्हावे असे आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter contains some reference to clocks.*

No. 165]
छ २१ साखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानके साष्टांग नमस्कार, विज्ञापना. तागायेत छ १५ रविलाखरपावेतों स्वामीचे कृपेंकरून ये प्रांतीचे व सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. मोमबत्या मुंबईहून हजार रुपयांच्या खरेदी करून दर मोमबत्ती येक गज लांब प्रमाणें पाठवणें म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणें मुबईस प्रेत्न केला, तेथें मिळत नाहीं. दवणेस येका फिरंगियाकडे होत्या त्याचा प्रेत्न दवणकर कपितान अजम मतेस वियेरंदसित्व बंदरें यासी लिहून करून वजन पकें ·।३॥३।१० दरमणे कचें पंधर पैसी देा बारदान व ठाव मेहनत रुपये २५॥।= प्रमाणें सासें बावीस रुपयाच्या सुमार ७३२ सातशें बत्तीस कारड १६ सोळा भरून बराबर कुसाजी माली जासूदजथे भिकाजीनाा पाठविल्या आहेत. दर मोमबती लांब दीड हात पावणेदोन हात आहेत. सेवेसी श्रुत होये, व गुलाब सिसे पाल फत्ते रहिमान पैदास्तपैकी सरकारांत सुमार ४८ अठेतालीस येाा कारड १२ बारा पाठवविलें आहेत. जाब सादर करणार स्वामी समर्थ आहेत. मोमबत्याचे कारडांमध्यें खालींवरत्या खादीचे फडकें घालून कापूस घालून निघेनिशी पाठविलें आहेत. कापड हात १०४ येकशेंच्यार लागलें आहे. विदित होये. कांचेचें भिंगें पंचरंगी व आरशाचीं भिंगें मागाहून माणसें आणून रवाना करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshao to the Peshwa saying that as per his instructions he is sending candles and some glassware. He says that he could not get them at Bombay, therefore had to write to the Portuguese Governor at Daman for them.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 166] [*9-11-1760*

पौ छ २८ राखर
कार्तिक चिठी लिहिणे

श्री

राजश्री बाबूराऊ राम स्वामी
गोसांवी यांसी

विनंती उपरी : बा देणे कापड आख :

२० कृष्णा सोनार निा रत्नशाला याणे दसरियाचे दिवसीं रुप्याची फुले करून उडविली सबब बकसीस.

६० खंडोजी व सेटी जड्या याणे प्रभावलीचे व मुगूट जडाव देवाचा केला सबब बकसीस.

येकून असी आंख देविले असेत. पावते करणे. रा छ ३० रावल सुरु इहिदे सितैन मया आलफ.

¶*Some cloth is ordered to be given as a reward to one goldsmith and two jewellers for their certain workmanship.*

No. 167]

श्री

सेवेसी विज्ञापना. पंचपात्रें रुप्याचीं ३ तीन दीडसे तोल्याची करविली आहेत ती व चोपदारांस काठ्या रुप्याच्या दोनसें भार रुप्याच्या करविल्या त्या व राजश्री माधवराऊ याजकरितां वाले घागऱ्या सोन्याच्या हलक्या जोड २ ऐसे करविले आहेत ते आज्ञेप्रमाणें घडविले आहेत. तयार जाहालियावर सेवेसी पाठऊन देतों. हे विज्ञापना.

¶*The writer says that the two pairs of anklets for Madhavrao and some other articles of silver, which the Peshwa had ordered him to get prepared, will be sent as soon as they were ready.*

No. 168]

श्री

पुरवणी राजश्री अंताजी नारायेण
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी. चिरंजीव राजश्री विस्वासराव यांचे कमरेचे मोज घेऊन पाठविले आहे त्याप्रो गोप सोन्याचा तयार करून पाठवणे म्हणोन जासुदांजवल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पत्रे दिली त्यांत लिहिले आहे; परंतु मोज पाठविले नव्हते याकरितां हाली डांके बराबर मोज गोपाचें चिरगुटाची धांत पाठविली असे. तर घेऊन मोजाप्रमाणे गोप तयार करऊन पाठऊन देणें. जाणिजे. रा छ १३ सफर बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Antaji Narayan is supplied with the measurement of the waist of Vishwasrao and is asked to send a gold-chain to suit that measurement*

No. 169]

श्री

पुरवणी राजश्री अंताजी नारायेण
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी: हरबाजी भिवाजी यांजबराबर हतीचे दांत दोन पाठविले आहेत. यापेक्षा कोठीस दात थोर असिला तर त्याचे माचवे च्यार पंलगाचे करऊन पाठवणें. यापेक्षा दांत कोठीस मोठा नसिला तर दोन दांत पाठविले आहेत याचेच च्यार माचवे बहुत बेश करऊन पाठऊन देणे. जाणिजे. रा छ २९ मोहरम हे विनंती.

¶*Antaji Narayan is asked to get prepared certain fittings of a bedstead, out of the ivory specially sent for that purpose.*

No. 170]

श्री

पुरवणी राजश्री अंताजी नारायेण
स्वामी गोसावियांसी

विनंती उपरी. छपरपलंगाचे माचवे रंगावयासी दिले आहेत. तयार जाले म्हणजे आठा दिवसात पाठऊन देतो म्हणौन लिहिलें. त्यास माचव्यास साधाच रंग देऊन तयार करून येका पलंगाचे सामान पत्र पावताच पाठऊन देणे. रंग बेरंग न करणे. साधाच रंग करऊन तयार करून पाठवणे. जाणिजे. रा छ १२ सफर लटके काम न वाढवणे. सांधे बलकट करणे हे विनंती.

¶*Antaji Narayan is asked to send immediately the fittings of a bedstead after getting them painted.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 171]

श्री

राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ
स्वामी गोसावी यासी,

विनंती. उपरी: सरकारांत सांबरी विजार दोन राजश्री गोविंद बलाल बुंधेले याणी दिल्या आहेत. त्या जिराईतखान्याकडे आहेत. त्याचे प्रयोजन लागले आहे तरी दोन विजारा व येक सांबरी कातडे ऐसे सत्वर पाठऊन देणे. छ २८ सफर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Trimbakrao Vishwanath is asked to send the two trousers, made of elk skin, presented by Govind Ballal Bundhele.*

No. 172]

[*21-12-1747*

श्री

राजश्री अंताजी नारायेण स्वामी गोसांवियांसी

विनंति उपरी. खासे चिलखत व चिरंजीव राजश्री भाऊचे व राजश्री महादाजी अंबाजी याचे यैसी तीनी चिलखते तयार करविली आहेत ते व टोप व बिन्या मुलामा करावयास दिल्या आहेत त्या तयार करवून व जिरे परशराम जिनगर याजवल तयार करावयास दिल्हे आहेत त्यास जिरे तयार जाहाले असिले तरी परशराम जिनगर याजसमागमे सत्वर पाठऊन देणे. तयार जाहले नसिले तरी जिरे परशरामास येथे पाठऊन देणें म्हणजे येथेच तयार करील. मडल्याचा दुपटा हिरवे पट्टूचा अभ्रा आहे तो दुपटा पाठऊन देणे व खर्ची चिलखते जिरायत-खानापैकी सुमार १० दाहा पाठवणे. येणेप्रमाणे सत्वर पाठवणे व गोसजी कारंजकर व श्रावणजी कारंजकर यास लौकर पाठवणें. पालपडतंल सुधा तयारी-निसी पाठवणे. खाशा चिलखतांस रुप्याच्या कड्या व खजीने व वाद्या व घुंड्या तयार करऊन पाठवणें. सदरहू लिहिल्याप्रमाणें सत्वर रवानगी करणे विलंब न लावणें. रा छ २९ जिल्हेज सुरु समान आर्बैन मया अलफ हे विनती.

¶*Antaji Narayan is asked to get ready three coats of mail, one for the Peshwa himself, another for Bhausaheb and a third one for Mahadaji Ambaji, and to send them at once.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 173]

श्री

चिरंजिव राजमान्य राजश्री रघुनाथपंत यासि प्रति बालाजी बाजीराऊ आसीर्वाद उपरी: येथीस कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. फरासखानापैकी सामान: -

सेतखाने चौकीसुधा	बिचोंबा अथवा डेरियातील
२	पमेदार राहुटी
राहुट्या आठ गजी नव गजी	१
२	जाजमे
दाल[1] सुती गज सुमार	२
५०	

येकून दोन सेतखाने चौकीसुधा व [2]बिचोबा अथवा डेरियातील पमेदार राहुटी व राहुट्या दोन व जाजमे दोन व दाल गज पंनास येणेप्रो ताबडतोड पाठऊन देणे. याखेरीज पारादोज[3] असामी १ येक पाठऊन देणें. रा छ २ रौवल बहुत काय लिहिणें, हे आसीर्वाद.

¶*The Peshwa asks Raghunathrao to send three small tents, two floor-cloths and some other articles from the Faraskhana.*

No. 174]

श्रीशंकर

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

आपत्ये त्रिंबक सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १० रबिलौवलपरियेंत स्वामीच्या असीर्वादेकरून यथास्तित असें विशष कातगोल्या उतम करऊन पाठवावयाची आज्ञा होती, त्यावरून कातगोल्या सरस करून सेवेसी पाठविल्या आहेंत. पावलियाउपर उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv writes to Bhausaheb that he has sent the prepared catechu* (कातगोळ्या) *as desired by him.*

---

१ झालर. २ बिनखांबी लहान तंबू. ३ चांभार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 175] [*23-6-1761*

पौा छ २२ जिलकाद

इसने सितैन

श्री

सेवेसी विज्ञापना येथील वर्तमान ताा छ १९ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यानी स्वामीकारणे मुरंबा आंब्याचा घागरी सुमार ३ तीन व आवल्यांचा घागर १ येक येकून च्यार घागरी बहुत उतम चांगला आपण सेवावा यैसा हेतु धरून, तयार करून हुजरियांबराबर पाठविला आहे. व इरसाल आंबे डाल्या ७ सात येकून तीनसे आंबे उतम म्हणोन पाठविले आहेत. येतद्विषईं श्रीमंत महाराज मातुश्री साहेबाचेंहि पत्र स्वामीस आहे त्याजवरून विदित होईल. उतर पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Tarabai sends as a present to the Peshwa three hundred mangoes of excellent variety and two kinds of jams specially prepared for him.*

No. 176] [*23-12-1764*

पौ छ १८ रजब सन

खमस पौष

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

पोष्ये बालाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा पौष्य शुा १ मुा संगमनेर जाणऊन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राहुरीची बोरे इरसाल डाली १ येक पाठविली आहे ते प्रविष्ट होईल. उतर द्यावयाची आज्ञा करावी. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Balaji Mahadev sends to Nana a basketful of excellent berries (Jujube-fruits) got from Rahuri.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 177]

श्री

तीर्थरूप राजश्री नाना ता
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

अपत्यें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी: येथील कुशल ता छ २ रजबपर्यंत येथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २६ जा. खरचे पत्र पाठविलें तें छ १ रजबी पावलें. तेथे लिहिले कीं, गुलाब जांब व लेवफले[1] राजश्री स्वामीनी आणविल्यावरून वसईहून आणून पाठविले आहेत. लव तों नासले; गुलाबी जांब मात्र शाबूत आहेत. आधीं राजश्री स्वामीस विनंती करणे, मग गुजरानणें म्हणून आज्ञा; आज्ञेप्रमाणे प्रथम राजश्री स्वामीस विनंती केली मग नेऊन गुजरानले. बराबरचा हुजरियाहि रूबरू होता त्यास मात्र रागास आले. बोलिले कीं पहिले फालगुन मासीं आले तेहि असेंच नासोन आले. सांप्रत आले त्याचीहि तीच गत जाली. मेणकापड लाऊन वाटेने बहुत माफजतीने[2] आणावें तें न केले, यैसे बोलिले. तर आणिक लव व गुलाबजांब वाटेने बहुत माफजतीने येऊन शाबूत येत यैसे करावें. विदित जालें पाहिजे. सदरहू मेवा तिघे कामाठी घेऊन आले.

१ करिया
१ बंडगा
१ चवडा वलद मलिया
—
३

जथे महाराये दिा बसाणा सदीवाल. या तिघांस कोठीपैकीं पोटगी तिरोजा मागत होते. परंतु स्वामीनी पत्रांत कांहीं लिहिलें नाहीं. तथापि न द्यावें तर पाऊस फार; वाटेनें काये खातील, यैसे जाणून तिरोजा कर्णीक वजन पके ४४९ नऊ सेर कोठीपैकीं व दालीस पोतांपैकी रुा ४≡ तीन दुवल दिल्हे आहेत सेवेसी कलावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶Malhar Tukdev reports to Bhausaheb and Nanasaheb how Shahu was displeased as the fruit sent from Bassein did not reach him in good condition. The writer, therefore, adds that the fruit should be again sent, this time with greater care, so as to reach the King in good condition.

---

१ एकप्रकारचें फळ. २ साम्भाळणीनें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 178]

नकल

श्री

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री बालाजी बाजीराव प्रधान यांसी श्रीविस्वेस्वर नगरीहून नारायेण दिक्षित कृतानेक आसीरवाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. यानंतर राजश्री कृष्णराव माहादेव श्रीस आले. आमचे घरी ब्राह्मणभोजन दों ती स्थली होत आसते. त्यास भांडियाची विपत्यें ; तेथे पितलेचे भांडे मिलतें परंतु केवल कार्याचे नाही. च्यार मास भांडे टिकत नाही हे अनुपत रावमजकुरानी पाहिली, तेव्हा पनास दागिने भांडी त्याणी मान्ये केलीं कीं उतम भांडी खोटीची कल्याणीहून सदृढ आणऊन पुण्यास पावती करितों तेथून तुम्ही आणवणें. याप्रमाणें मान्यें करून आपल्या गुमास्तियास कागद लिहून मुजरद माणसें पाठविली आहेत यास्तव आपणास पत्र लिहिले आहे. तर सदरहू भांडी राऊ मजकूर पुण्यास आणून देतील तर आपण चितावर धरून श्रीस भांडी पोहचत ते केले पाहिजे. आपण चितावर धरतील तर सहजात अनायासे भांडी प्रविस्ट होतील म्हणजे भांडियाची विपत्ये वारतील. तेथे पुण्यास भांडी आलियावर आपल्या विचारास ज्या प्रकारे येईल त्या प्रकारे पावती केली पाहिजेत. येविसी बहुत काये लिहिणे. कृपालोभ असो दीजे हे आसीरवाद. श्रावण वद्ये १०.

बो राजश्री माहादाजी आंबाजी यांसी कृतानेक आसीरवाद. लिखितार्थ परिसीजे आणि भांडी सत्वर प्रविष्ट होत ते कीजे. कृपा असो दीजे हे आसीरवाद.

¶*Narayan Dikshit Patankar asks Peshwa Balaji Bajirao to send him at Kashi fifty good brass-pots from Kalyan for the use of Krishnaji Mahadev.*

No. 179]

श्री

राजश्री जनार्दन बलाल स्वामी गोसावियासी

विनंति उपरी. श्रीदेवदेवेश्वरीं पुजेस गेलो तेथे रामभट द्राविड याणी पाऱ्याची गोली खडकपात्राची[1] संपुष्टांत घालून नजर केली ती जिन्नसखान्यात असेंल तिचा शोध करून पाठऊन देणे. जरूर शोध करून पाठविणे हे विनंति.

¶*Janardan Ballal Fadnis is asked to send the ball of mercury presented by Rambhat Dravid at the Parvati temple.*

---

१ गेंड्याच्या शिंगाचें केलेलें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 180]

श्री

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवसी

आपत्यें त्र्यंबक सदासिव कृतानेक सां नमस्कार विनती. येथील वर्तमान ता फालगून सुध पूर्णमा स्वामीच्या कृपावलोकनेकडून येथास्थित आसे विशष श्रीमंतानी सातारांहून वाडियाचा नकशा आणविला होता. तेथील गवडियानी नकशा करून पाठविला. परंतु श्रीमताच्या ध्यानास आलें नाही. त्यावरून श्रीमतानी आज्ञा केली कीं सातारियासी शाहाणा माणूस पाठऊन वाडियाची नकशा पाहाणे. त्यावरून भिकाजी नाईक गौंडे यासी सातारियासी पाठविले होते. नकशा करून आणिला आहे तो बजिनस सेवेसी गौडे मार निवेदन करिता विदित होईल. पुढे आज्ञा कर्तव्य ते करावी सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Bhausaheb, sending a good plan of the Satara Palace.*

No. 181]

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी विनंती. सेवक जिवाजी गणेश व रघुनाथ शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १३ सवाल-पर्यंत स्वामींचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील इमारतीच्या कामाची वगैरे कामाची हजिरी लेहून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. कुरणात दोनसे पसतीस कामाठी पाठविले आहेत त्यामुले आठक्या सोलक्या चालत होत्या त्या राहिल्या. छकड्याचे धोंडे रमण्यावर जात होते ते च्यार दिवालीचे पायावरी आणोन ते काम चालते केले. प्रस्तुत रमण्याचे काम राहिले आहे त्यास कानडे बडेर दगडवाले व माती खणावयाचे यांस स्वामीनी कौल देऊन आणविले होतें ते जवल आले आहेत. त्याचे शंभर गाडे धोंडे आणावयाचे आहेत म्हणून त्याचे जमातदार आले होते त्यानी सांगितले. दोचौ रोजी येणार आहेत. याप्रमाणे त्याजपांसी सामान असिले तरी बेगमी पोख्ती जाली म्हणजे रमण्याचे काम जलदीने चालेल. माती खाणावयाचे वडेर येथें आले, त्यांस च्यार दिवालीचे उत्तरेचा पाया खणावयास लाविले आहेत. धोंडे आणावयाचे बडेर आले तर धोंड्याची बेगमी होईल. परंतु गाडेयांचे टोणग्यास वैरण विकत घेऊन चारावी लागेल. तेव्हा त्यांचा टिकाव कैसा होईल पाहावा. मातुश्री ताईचे विहिरीचे काम चालीस लाविले आहे. दोन अडीच थर धोंडियाचे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बसले. बंगल्याचे दुसरे खणचे मधील घरचे छतेचे काम चालत आहे. तख्ते जडिले. चहुकडील दाशिये तयार जाले. मधील दांडे व फुले जडीत आहेत. सविस्तर शेवेसी विदित व्हावे याजकरितां लिहिले असे हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh and Raghunath Shivram to the Peshwa informing him of the progress of the building-work on the Parvati hill.*

No. 182] [*20-7-1745*

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक जिवाजी गणेश व रघुनाथ सिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपावलोकरून श्रावण शुक्ल तृतीया मंदवासरपर्यंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपाळू होऊन छ ७ जमादिलाखरचे पत्र सादर केले ते पावोन अत्यंत समाधान जाले. कर्तव्य कार्ये मनात आणिली आहेत ती येका दो वर्षात करावी म्हणून लिहिले. ऐसियास, स्वामी पुण्यपुरुष; जो अर्थ ध्यानात तो अविलंबे भगवत्सतेकरून सिधीस जाईल, यदर्थी संदेह आहे ऐसे नाही. यानंतर इमारतीचे वर्तमान साद्यंत पूर्वी शेवेसी लिहिले होते त्यावरून श्रवण जाले असेल. आलीकडे बंगल्याचे पूर्वेकडील उजवे हातचे हौदाचे काम चालीस लाविले होते. तो हौद ज्यातप्राय आहे. खजान्यास आलीकडे च्यार थर बसले; लौकरच भुईबराबर तयार होईल. राजश्री माहादाजीपंत बाबाचे दिवाणखानियाचे कामास आरंभ केला आहे. खांब व तुलया चढल्या. काम जलदीने चालत आहे. लौकरच सिध्द होईल. वाडियांतील पूर्वेची पागा जायां जाली होती. याजमुले ते मोडून पूर्वेकडे गजभर जागा व पश्चिमे(क)डे तीन गज जागा घेऊन दुहेरी पागा केली. तेहि काम फार करून जाले. किंचित राहिले आहे ते सत्वरच होईल. कवडीच्या पागेचे पंचवीस खण तयार केले. सेवेसी विदित जाले पाहिजे. स्वामीचें आगमन होऊन चरणांबुजाचे दर्शनाचा लाभ चितषट्पदास संतोष होईल तो सुदिन आहे. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Jivaji Ganesh and Raghunath Shivram report to the Peshwa the progress of some building-work going on, probably in Poona.*

1760

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 183]

पो छ २९ जाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती ऐसीजे. तल्याचे खणण्याचे काम येके सोईने चवकसीने उन्हाला आहे तो खणवणें म्हणौन आज्ञा केली. ऐशास तल्यात पेरु आहेत. त्याचे दक्षणेकडे व पस्चमेकडे काम लाविले आहे. तीनसे पाच सात आधीक याप्रा गाढवे व टोणगे कामावर आहेत व पावणे दोनसे बेलदार व त्यांच्या बायेका येशा आहेत. जेथे खणीत पहिले आले, पाण्यास भुई लागली, तेच ठिकाणी तूर्त काम चालते. उन्हाला आहे तो तेथे पाणी पन्ह्यांने[1] लाऊन देऊन बोली माती काढितो. टेकें[2] आहेत ते पुढे पावसाल्यात निघतील. याप्रा चालत आहे. मजुरीची माणसे गावगना पैका देऊन करार केली आहेत. दोनशे माणूस ते लाऊन निकडीने काम करितो. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विनंती.

¶*Report to the Peshwa as to how the construction of the water-reservoir was going on.*

No. 184]

श्री

विनंती उपर चिठी पाठविलीत ती पावली. मजकुर कलला. त्याप्रोच आम्हासहि रात्री पत्र आलें. आतां तुम्हास लिहिणार होतो तों तुमचीच चिठी आली. ऐशास थोर दान असेल तेथे धोत्रजोडे वगैरे कांही अधिक किमतीचे सुमार पाहून द्यावे. भुयसीसहि कांहीं नेमिल्याहून जाजती करावे लागतील व गयावर्जनाचाहि ऐवज निघाला पाहिजे. ब्राम्हणांचा मजकूर तुम्ही लिा प्रो च करावा. याद त्याजकडे देऊन त्याचे हातें करावें इतकेच. वरकड साक्षर तुम्ही ब्राम्हण नेमिले ते चालवावयाचे नाहींत. तुम्ही तृतीये प्रहरी वर यावें. धणीकडेसहि जाऊन याप्रों समजाऊ. कुशाबांचे गांवींहि खबर नसेल. हे विनंती.

¶*This and the following ten papers refer to the obsequies of Raja Shahu (vide Introduction, last para.)*

---

१ लहान झरा.

2 Mounds of earth.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 185]

श्री

यादी ब्राम्हण आसामी

किल्यावरील

१ जान जोसी हुका चिलीम सरपोस सुद्धा
१ राघोबा जोसी काठी १
१ बाल जोसी तबक १
१ विनायकभट खरखंदाज व चिमटा
१ जनार्दन जोसी पीकदाणी
२ कीता असामी
  १ पुराणीक धणीकडील
  १ विद्यार्थी तीफुला

२

७

आंगातुक

१ बालंभट ओगले सुरई
१ रामकृष्णभट तस्त
१ गोपालभट तुलपुले अस्ताव.
२ वाडीकर
  १ गुलाबदाणी
  १ ——————
    दाहाचा विषय नेमावा.

२

६

असामी

१२

सदरहू दाने नेमिलियाप्रमाणें बारा आसामीची नांवें यादीस ल्याहावीं. पुराणिकास कांहीं पाहून योजावें.

याखेरीज भूमीदानास आा.

१ नारायणभट पंडित
१ अनंताशास्त्री गडबोले
१ बापुभट कुंभारे माहुलीकर
१ नारायण भट गोखले

एकूण जमीन चावर

१

४

येणेप्रमाणे यादीस ल्याहावे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 186]

श्री

विनंती उपर यादी पा ती पावली. उतम पाहून माहादानांत तुम्ही योजिलेतच आहेत तेव्हां उत्तम आहे. दाहा पंधरा दानें अमानत राहूं घ्यावीं, समयीं एकाधा उतम ब्राम्हण आल्यास लावावयास येईल. पंडितराव यांजकडील अर्थ असेल तो आपा पुराणीक यास आणून त्यांचे हातें द्यावा हे विनंती.

No. 187]

श्री

विनंती उपर. ऐवज आला म्हणोन लिा ते कललें. फार उतम जाहले. समयीं कामावर पडला. आमचें लिहिणें फारच निक्षूण गेलें होतें कीं हा पक्ष घालघसरीवर न्यावयाचा नाहीं. परिछिनपणें लिा होतें. ऐवज आला. उतम जालें. यांत गयावर्जन भूयसी देखील आटपावे. उदेक याद ब्राह्मणांची आधीं वाकनिसावरोबर देऊन प्रातःकालींच वर पाठवावी आणि दानाचेंहि काम सकालच फार उसीर न होतां उरकावयाचें. तुम्ही उसीर करूं नये. प्रातःकालींच वर यावें. हे विनंती.

No. 188]

श्री

विनंती उपर कापड व किल्यावरील ब्राह्मणांची याद पा आहे व दिक्षितांकडील साक्षर ब्राह्मण ल्याहावे. हे विनंती.

No. 189]

श्री

विनंती उपरी. कारखान्याकडे पालखींत घालावयासी न्याहाली व पलंगपोस पाहिजे, त्यास याची तर्तूद करून देवावी. तकीये मात्र येथें आहेत कललें पा हे विनंती.

No. 190]

श्री

विनंती उपरी हतीचा वगैरे माहादानाचे ब्राम्हण सिध्ध जाले कीं नाही लिा. आपदागिरास ब्राम्हण वरचा आगांतुक आहे. हे विनंती.

---

१ गादी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 191]

श्री

विनंती उपर. गाई खिलारपैकीं सोईवार पडत नाहीं, तेव्हां खरेदी घ्याव्या. हे विनंती. आमचा जाव पुणेयाहून आला कीं उत्तरकार्य कालानरूप चांगलेच करूं. हे विनंती.

No. 192]

श्री

विनंती उपरी. कड्याचा दर सवाचवदा निदान साडेचवदा लिहिला. त्यास कडीं आमचीं नाहीं. लोकांचे दागिने आहेत. आम्ही आपणास पैका मागत नाहीं. ज्याचे दागिने त्यास द्यावे लागतात. याजकरतां कडींच पाठवावीं म्हणजे ज्यांचीं त्यांजकडे पाठऊन देऊं. त्यांचींहि एक दोन पत्रें आलीं, याजकरता कडीं आणऊन पाा द्यावीं. बहुत काये लिहिणें हे विनंती.

No. 193]

श्री

विनंती उपर. जोड्या च्यार येथें करूनच पाा आहेत. बाकी दोन खालीं नवीं मोत्ये घेऊन कराव्या. वीस रुपयांत दोन जोड्या मोत्यें घ्यावी. हे विनंती.

No. 194]

श्री

विनंती उपर तुम्ही लिा ते कललें. तुम्ही कराल तें आमचे विचारास हावीं. येईलच. परंतु त्यांणीं एक घोडी माहाराजांस द्यावयाची केली होती. तत्राप सोईस येईल तसें करावें. मान्य आहे. हे विनंती.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh